मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

नवभारत

वर्ष १८ वे] जून १९६५ [अंक ९

वार्षिक वर्गणी ९ रु.] [किरकोळ अंक १ रु.

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष अठरावे

अंक नववा

नवभारत

जून

१९६५

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक

वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,
'गणेश भुवन' २७६, तेलंग रोड, माटुंगा–मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमरावदाडी, मुंबई २
फोन नं. २३५५४

प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला

(१)	धर्मकोश– व्यवहारकाण्ड भाग १ ते ३			किंमत
		साधी बांधणी ...	... ...	८०·००
		कापडी बांधणी ...	... ...	१०४·००
(२)	धर्मकोश - उपनिषत्काण्ड भाग १ ते ४			
		साधी बांधणी ...	... ...	१५०·००
		कापडी बांधणी ...	... ...	१८२·००
(३)	धर्मकोश– संस्कारकाण्ड भाग १ ला		....	४५·००
		कापडी बांधणी ...	....	५३·००
(४)	मीमांसादर्शन	... ...	... ...	३०·००
(५)	मीमांसाकोश ... भाग १ ते ६			२३०·००
(६)	कौषीतकिब्राह्मणारण्यकविषयकोश		... ...	६·००
(७)	बौद्धागमार्थसंग्रहः	....	... ...	२०·००
(८)	हिंदुधर्माची समीक्षा (लक्ष्मणशास्त्री जोशी)		...	५·००
(९)	वैदिक संस्कृतीचा विकास	...	.. ...	६·००
(१०)	नवमानवतावाद	...	... ...	२·५०
(११)	मानवाचा आदर्श ...	...	... ...	३·००
(१२)	चार्वाक– इतिहास आणि तत्त्वज्ञान			
		(प्रा. सदाशिव आठवले)	...	३·००
(१३)	गीता-प्रवेश (डॉ. गो. वि. देवस्थळी)		...	२·५०
(१४)	महाराष्ट्रांतील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना			
		(श्री. चा. अ. दाभोलकर)	....	२·००

अनुक्रमणिका

प्रभाकर पुजारी

" दुसरा पेशवा "

" दुसरा पेशवा " या नाटकात एका असामान्य नेत्याच्या जीवनाची शोकान्तिका वि. वा. शिरवाडकरांनी विलक्षण सामर्थ्याने चित्रित केलेली आहे. नाटकाच्या सुरुवातीपासून अखेरीपर्यंत इतिहासाशी जातिवंत इमान राखून एक अनेकांगी आणि प्रभावी नाट्य त्यांच्या प्रतिभेने अचूक हेरलेले आहे. एका आंतरिक प्रेरणेने ते त्या नाट्याकडे खेचले गेले. "कौंतेय" नाटकाच्या प्रस्तावनेत त्यांनी असे उद्‌गार काढलेले आहेत की ' पहिल्या बाजीरावाप्रमाणेच कर्णाच्या चरित्रातील शोकान्त नाट्याचेही गाढ आकर्षण मला कित्येक वर्षांपासून वाटत आलेले आहे ' दीर्घकाळ-पर्यंत लेखकाच्या अंतःकरणाला व्यापून टाकणारे हे नाट्य प्रकट होताना अनेकांगी रूप घेऊन अवतरले. विभूतिपूजेच्या एकांगी साच्यातून जर ते प्रकट झाले असते तर निःसत्त्व आणि निर्जीव बनले असते. पण शिरवाडकरांनी नायकाच्या व्यक्तिचित्रणावर अवास्तव सद्‌गुणांचा तकलुपी लेप देऊन त्याच्या भोवतालच्या इतर कर्तबगार व्यक्तींना खुजे बनवलेले नाही किंवा विपर्यस्त स्वरूपही दिलेले नाही. नाटकातील प्रत्येक महत्त्वाच्या व्यक्तीला नाटककारांनी न्याय दिलेला आहे; प्रत्येक अटीतटीच्या प्रसंगाचे सापेक्ष महत्त्व काटेतोलपणाने जोखलेले आहे. "दुसरा पेशवा " ही एका नेत्याच्या–हिंदू नेत्याच्या–जीवनाची शोकान्तिका आहे.

शोकांतिकेसंबंधीच्या कल्पना व दुसरा पेशवा

कोणतीही श्रेष्ठ जिवंत कलाकृती रूढ साहित्यशास्त्रीय चौकटीत ठोकून बसवणे हे चुकीचे आणि अन्यायाचे ठरते. ब्रॅडलेच्या Shakespearean Tragedy विषयीच्या सिद्धान्ताला वेदवाक्याप्रमाणे मानून टीका-लेखनाचे कर्मकांड उभे केले की मग त्या कर्मठ वृत्तीला जिवंत नाट्य जाणताच येत नाही. नियमात आणि चाकोरीत बद्ध होणे हे चैतन्यतत्त्वाला कधीही मानवत नाही. म्हणूनच शोकान्तिकेचे रूढ सिद्धान्त न स्वीकारता " दुसरा पेशवा " या नाटकाचा गाभा हेरणे आवश्यक आहे. शेक्सपियरच्या शोकात्मिकेमध्ये नायकाचा मृत्यू अटळ असतो. त्याच्या विशिष्ट जीवनाचे ते अपरिहार्यपणे होणारे पर्यवसान असते. त्याच्या शोकात्म जीवननाट्याचे ते भरतवाक्य असते. त्याचा मृत्यू शोकात्म जीवनावर सतत आपले सावट धरताना दिसतो. तो आत्मीयतेने मरणाला सामोरा जातो. "दुसरा पेशवा" या नाटकातील पहिल्या बाजीरावाचा मृत्यू हे काही त्याच्या शोकात्म जीवनाचे अटळ पर्यवसान नाही. मरणाचे स्वागत करण्यावाचून गत्यंतर नाही अशा अगतिक परिस्थितीने त्याला घेरलेले नाही. बाजीरावाच्या जीवनातील संघर्षातून त्याचा मृत्यू ओढवलेला नाही. हे ऐतिहासिक सत्य नाटककारांनीही अव्हेरलेले नाही. ऐतिहासिक सत्याशी इमान राखूनच शिरवाडकरांनी इतिहासातील एका शोकात्मिकेचे हृद्य दर्शन घडवलेले आहे. बाजीरावाची शोकात्मिका त्याच्या मृत्यूत नसून जीवनात आहे. ती एका पराक्रमी पुरुषाच्या जीवनातील शोकात्मिका आहे. समाजाविरुद्ध दंड थोपटून उभे टाकणाऱ्या एका असामान्य व्यक्तीची, शत्रूला चळचळा कापायला लावणाऱ्या एका जेत्याची, राष्ट्रजीवनात आपल्या जीवनाची आहुती टाकणाऱ्या एका हिंदू नेत्याची ही शोकात्मिका आहे. बाजीरावासारखा पराक्रमी जयिष्णु लोकाग्रणी आपल्या जीवनातच पराभूत झालेला आहे, अगतिक बनलेला आहे, गुलाम बनलेला आहे. तरीही मृत्यूजवळ जाताना एक अपूर्व झळाळी त्याच्या जीवनाला लाभलेली आहे. आयुष्याच्या अखेरी अखेरीला कोसळलेला बाजीराव मृत्यूजवळ एवढा उंच गेलेला आहे की पूर्वी कधीही त्याला ती पातळी गाठता आलेली नव्हती. प्रामाणिक निष्ठांच्या संघर्षातून निर्माण झालेल्या या नाटकातील नाट्याचे बीज कोणत्याही एका प्रसंगात, एकाच व्यक्तीत किंवा एका कृतीत गवसणार नाही. त्या नाटकातील व्यक्तींच्या भावना, त्यांच्या निष्ठा, त्यांच्या भोवतालची परिस्थिती,

त्यांचे समाजातले विशिष्ट स्थान, एकमेकांसाठी तळमळणारी त्यांची अंतःकरणे, एकमेकांसाठी त्यांनी केलेला त्याग या साऱ्यांच्या एकात्मतेतून त्या नाट्याचा उद्भव झालेला आहे.

बाजीरावाचे जीवन व मन

ऐन उमेदीच्या काळापासून ते आयुष्याच्या अखेरीपर्यंत बाजीरावाला सतत संघर्षाला तोंड द्यावे लागलेले आहे. असामान्य आणि पराक्रमी माणसांच्या वाट्याला येणारे ते एक सनातन दुर्दैव आहे अशा व्यक्तींभोवती विलसणारे कर्तृत्वाच्या तेजाचे वलय हे पुष्कळ वेळा अतिसामान्यांच्या द्वेषाची दाहकता पोटी धारण करीत असते. निष्प्रभ ठरलेल्या बरोबरीच्या लोकांच्या मत्सराच्या झळा नेहमी त्या व्यक्तींना वेरून टाकतात. त्यांच्या प्रत्येक विजयाबरोबर त्यांच्या भोवतालचे वातावरण अधिकाधिक विषारी बनत जाते. पराक्रमी आणि कर्तबगार व्यक्तीच्या जीवनातील अगदी लहानशा छिद्राचा सतत वेध घेत राहून त्याचे सारे जीवन उध्वस्त करण्यासाठी ते विषारी वातावरण आसुसलेले असते. तक्षकाप्रमाणे अगदी क्षुल्लक कीटकात आपले विनाशकारी भयंकर स्वरूप दडवून अखेरच्या आघातासाठी ते प्राणपणाने प्रतीक्षा करीत राहते. त्या विषारी वातावरणात महात्मेदेखील कापरासारखे जळून जातात.

बाजीरावासारखा पराक्रमी माणूस जाणूनबुजून अशा विषाची परीक्षा घेण्यासाठी उद्युक्त होतो, तडफदारपणे समाजातील हीन प्रतिगामी प्रवृत्तींच्या मस्तकावर पाय रोवून उभा राहतो, आपल्या समशेरीच्या बळावर सारा उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत करून आपल्यापुढे परिस्थितीला नमायला लावतो. आयुष्याच्या ऐन उमेदीत सामर्थ्याच्या बळावर बाजीरावाने सारे काही मिळवलेले आहे आणि आयुष्याच्या अखेरीला तो परिस्थितीच्या दबावाखाली दडपला जातो. मराठी मसनदीतला एक सर्वश्रेष्ठ योद्धा सतत पराभूत होत जातो. भटाभिक्षुकांच्या कोल्हेकुईपुढे त्याची सिंहगर्जना विरून जाते. साऱ्या मराठी मुलुखाचा अनभिषिक्त सम्राट एका सामान्य पण सुंदर आणि चतुर स्त्रीचा गुलाम बनतो समाजाची सारी बंधने तडातड तोडून टाकणारा एक धैर्यशील स्वकीयांच्या प्रेमरज्जूंनी जखडला जातो, अगतिक बनतो. आपल्यावर नितांत निष्ठा ठेवणाऱ्या सहनशील प्रेमळ पत्नीला आपण काहीच देऊ शकलो नाही या विचाराने एक उमद्या मनाचा पती पश्चात्तापाने पोळून निघाला. ज्या मोठेपणाच्या तेजात तो न्हाऊन निघाला त्याच मोठेपणाच्या दाहकतेत त्याला जळून जावे लागले. हिंदुधर्माचा ध्वज ज्याने साऱ्या भारतात फडफडत ठेवला त्यालाच खोट्या उपऱ्या धर्मभ्रष्टतेबद्दल प्रायश्चित्त घेण्याची सिद्धता करावी लागली. म्हणूनच एका महान शोकात्मिकेचा बाजीराव नायक ठरलेला आहे.

आसन्नमरण स्थितीत असताना ‘ हे मधुर आणि कठोर स्वप्न समाप्त झाले ! ’ असे स्वगत उद्‌गार जे बाजीरावाने काढलेले आहेत ते त्याच्या जीवनाचे निदर्शक आहेत. एके काळी माधुर्याने भरलेले त्याचे जीवन, पुढे पुढे कात टाकून कठोर बनत गेले. अखेरच्या क्षणी जीवनातील एक कटू सत्य त्याला जाणवले की ‘ जगाच्या व्यवहारात माणूस हा माणूस नसतो, तो केवळ एक विशेषण असतो.’ बाजीरावासारख्या समाजनेत्याला खाजगी जीवन नसते. ‘ पेशव्या ’पासून बाजीरावाला अलग होता येणार नाही. इतकेच नव्हे तर तो प्रथम पेशवा आहे आणि नंतर बाजीराव आहे. समाजनेत्याला समाजजीवनात वैयक्तिक भावनांची आणि आकांक्षांची आहुती द्यावी लागते. बाजीराव हा केवळ स्वतंत्र आणि सर्वतंत्र नाही, तो समाजाचा नेता आहे, राज्याचा आधारस्तंभ आणि पालनकर्ता आहे या कठोर सत्याची जाणीव बाजीरावाला शेवटी शेवटी होत गेली. बाजीरावाच्या उमेदीच्या जीवनात माधुर्य आहे, बेदरकारपणा आहे, पराक्रम आहे, सगळ्या बंधनांना झुगारून देणारा उद्दाम आवेश आहे, ज्येष्ठ मुत्सद्यांना निष्प्रभ बनवण्याएवढे बुद्धिचातुर्य आहे आणि छत्रपतींच्या अंतःकरणावर खोल ठसा उमटावा असे जातिवंत इमानही आहे. नाटकाच्या पहिल्या अंकात बाजीरावाचे दर्शन घडते ते अशा प्रकारचे. नाटकाच्या अगदी सुरुवातीलाच पंतप्रधान बाजीरावाची स्वारी वाजत गाजत साताऱ्याच्या वेशीतून आत शिरलेली आहे. आपल्या पराक्रमाने आणि मुत्सद्देगिरीने साऱ्या राष्ट्राच्या अंतःकरणावर त्याने स्वामित्व मिळवलेले आहे. अनभिषिक्त राजेपण त्याच्या पायावर लोळण घेते. निजामासारख्या आणि मोगलासारख्या तोफ-

खान्यासह सुसज्ज अशा मातब्बर शत्रूंना धूळ चारून बाजीरावाने शाहूचे आसन स्थिर आणि बळकट बनवले. एकाद्या दिग्विजयी वीराप्रमाणे साऱ्या भरतखंडात मराठ्यांचा जरीपटका मिरवीत हिंदुपदपादशाहीचा पाया घालण्याचे महान कार्य त्याने पार पाडीत आणलेले आहे. ' त्यांच्या म्यानातली समशेर इतकी शिकंदर आहे की वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादाशिवायही ते पाची खंड पृथ्वी पादाक्रांत करतील ! ' या शाहूच्या बाजीरावाविषयीच्या खोचक उद्गारातही त्याच्या जयिष्णू पराक्रमाची ग्वाही आहे. बाजीरावाने दिल्लीच्या सरदारांना धूळ चारून छत्रसालाचे रक्षण केल्याची वार्ता आल्यापासून पुण्यात त्याच्या नावाचा जयघोष चालू झाला. ' नवसांपेक्षा आणि घातलेल्या प्रदक्षिणांपेक्षा स्वारीची समशेरच त्याचे रक्षण करायला अधिक समर्थ आहे ' असा बाजीरावाच्या धर्मभोळ्या पत्नीलाही विश्वास वाटतो. बाजीरावाच्या समशेरीप्रमाणे त्याची बुद्धीदेखील धारदार आहे. सेनापती, सुमंत, सरलष्कर, भोसले, आंग्रे, दाभाडे झाडून साऱ्यांना त्याने आपल्या बुद्धिचापल्याने पराभूत केलेले आहे. ' पूर्वीच्या काळी मराठ्यांचे वैरी महाराष्ट्राच्या बाहेर असत, आज ते महाराष्ट्रातच फार निपजू लागले आहेत ' या प्रतिनिधींच्या खवचट उपरोधपूर्ण आरोपाला बाजीरावाने ' वैरी स्वतःच्या धर्मात, स्वतःच्या देशात, नव्हे स्वतःच्या घरातसुद्धा असू शकतात. शिवाजीमहाराज एवढे सांबाचे अवतार पण त्यांनाही परकीयांप्रमाणे स्वकीयांशीही लढावे लागले. दुसऱ्या छत्रपतींचा विश्वासघात स्वकीयांनीच केला ' असे झणझणीत उत्तर देऊन शाहूच्या दरबारातच त्यांना गारद केले. बाजीरावाचे सहकारी म्हणजे समाजाच्या खालच्या थरातील धनगर, गुराखी आणि पाणके असे उपहासाचे छद्मी उद्गार जेव्हा सरलष्करांच्या तोंडून बाहेर पडतात तेव्हा ' या धनगर-गुराख्यांनी या देशाचे महाराष्ट्र हे नाव सार्थ केले. हे धनगर, गुराखी आणि शागीर्द हातात समशेरी आणि भाले घेऊन सह्याद्रीच्या गुहांतून बाहेर पडले म्हणजे दिल्ली-लाहोरांचे शहरकोट भीतीने कापू लागतात आणि काबूल-कंदाहारांची सिंहासने भयभीत होतात ! ' असल्या प्रत्यक्ष कृतींची धार असलेल्या तीक्ष्ण युक्तिवादाने बाजीराव बैठ्या कारस्थानपटूंचे मर्मस्थान विदीर्ण करून टाकतो. बाजीरावाच्या तडफदार कर्तृत्वाला मस्तीचे राजकारण म्हणून डिवचणाऱ्या सुमंताला ' शत्रूला स्वतःच्या दाराशी नव्हे तर त्याच्या राहत्या घरातच पादाक्रांत केला पाहिजे ' असा अस्सल मुत्सद्देगिरीचा डाव टाकून तो नामोहरम करतो. 'तुमच्याबद्दल आम्हाला तिळमात्र अनादर नाही' असे उद्गार शाहूने काढावेत इतका प्रभाव ज्या बाजीरावाने अगोदरच आपल्या राजनिष्ठेने प्रस्थापित केलेला आहे तो बाजीराव ' स्वामींचा आशीर्वाद हेच सेवकाचे सामर्थ्य आहे ' असे विनयशील उद्गार काढून शाहूवर संपूर्ण विजय मिळवतो. आपल्या बुद्धिमत्तेने, मुत्सद्देगिरीने, पराक्रमाने, उदारमतवादाने सगळ्या क्षेत्रात त्याने आपले जेतेपण प्रस्थापित केलेले आहे.

विजय व पराजय

आणखीही एका बाबतीत तो विजयी बनलेला आहे. छत्रसालाचे रक्षण करून बुंदेलखंडातल्या एका छावणीत बाजीराव विश्रांती घेत असताना मस्तानी त्याच्या डेऱ्यात प्रवेश करते, लावण्याच्या क्षेत्रातील आपण सम्राज्ञी आहोत असा गर्व तिच्या ठिकाणी आहे, दख्खनच्या एका पराक्रमी पुरुषाला बरोबरीच्या भूमिकेतून सामोरे जाण्यासाठी घोड्यावर स्वार होऊन, कमरेला कट्यार बांधून मध्यरात्रीच्या काळोखातून एकाद्या वादळासारखी ती बाजीरावाकडे आलेली आहे. ' विश्रांतीपेक्षा सुद्धा स्त्री आपल्याला अधिक प्रिय आहे ' अशा मखमली शब्दातून ती बाजीरावाचे मर्मस्थान उघड करू पाहते. पण बाजीराव जेता आहे. ' ही उत्तरेकडची नाणी दक्षिणेकडे चालणार नाहीत, स्त्री म्हणजे विश्रांती असती तर मोगलांप्रमाणे मराठेही मोठमोठे जनानखाने घेऊन स्वारीवर निघाले असते ' असे एका लावण्यगर्वितेला त्याने निक्षून सुनवलेले आहे. त्या लावण्यसम्राज्ञीवरही बाजीराव विजय मिळवतो. त्याच्या तेजात ठिणगीप्रमाणे विलीन व्हायला ती सिद्ध होते. त्या रुपगर्वितेप्रमाणेच जगावर हुकुमत गाजवणारा मद्याचा प्याला बाजीरावाला एक क्षुद्र चाकर वाटतो, यःकश्चित गुलाम वाटतो. ' बाजीराव पेशवा जेता आहे, त्याला हा पेला जिंकू शकणार नाही ! छत्रपतींच्या या पंतप्रधानाला कोणीच जिंकू शकणार

अनुक्रमणिका

नाही !' हा बाजीरावाचा कर्तबगार अहंकार. नाटकाच्या संबंध पहिल्या अंकात घडणारे बाजीरावाचे दर्शन हे एका निरपवाद जेत्याचे आहे. प्रत्येक क्षेत्रात त्याने विजय संपादन केलेला आहे. भोवतालच्या सगळ्या क्षुद्र आणि प्रतिगामी प्रवृत्तींना टाचेखाली चिरडून त्यांवर तो विजयोन्मादाने उभा आहे.

पण जीवनातील कोणतेही तत्त्व कधीही निर्भेळ स्वरूपात आढळत नाही, कोणताही अनुभव निखळपणे एकविध नसतो. विजयाच्या पोटी पराजयाचे बीज असते. सुखाला दुःखाची किनार भिडलेली असते. उन्मुक्त स्वातंत्र्याला बंधनाचा शाप भोवतो. जीवन ही मरणांची मालिका बनते. पहिल्याच अंकात जीवनाच्या या गूढ संमिश्रतेचे दर्शन शिरवाडकरांनी घडवलेले आहे. बाजीरावाच्या पुढच्या पराजयाची बीजे पहिल्याच अंकात आपल्या अस्तित्वाची सूक्ष्मपणे जाणीव देताना दिसतात.

छत्रसालाच्या शत्रूंचा बाजीरावाने धुव्वा उडवलेला आहे. उत्सवाच्या जल्लोषाने तो विजय अधिकच गहिरा बनलेला आहे. पण नेमक्या विश्रांतीच्या वेळी बाजीरावाच्या अंतःकरणात कल्लोळ उठलेला आहे. विजयोत्सवानंतर तो कमालीचा उदासीन झाला. विजयाने त्याच्या नकळत पराजयाचे रूप धारण केले. मृत्यूची काळी छाया सगळ्या जीवनाला व्यापून राहिल्याचे त्याला तीव्रतेने जाणवू लागले. त्याच्यामधील नेतृत्व मधूनच उफाळून येते. त्याच क्षणी त्याच्या अंतरात्म्यातून अवचित एक हुंकार प्रकट झाला की ' या उत्सवात एका कंपनीकडून छत्रसालाने खुद्द पेशव्याचाही पराभव केला !' एका जेत्याने आपल्या अंतर्मनाला आपल्या आयुष्यातील पहिल्या पराभवाची कबुली दिली. पुढच्या काळात बाजीरावाने जेत्याच्या बेदरकारपणाने जे जे केले त्यातून पराजयाची एकेक पायरी ओलांडीत त्याला जावे लागले. मस्तानीपुढे तो प्रथम पराभूत झाला आणि त्या एका पराभवातून त्याच्या जीवनातले सगळे पराभव उफाळून बाहेर पडले. मस्तानीला जिंकणारा पराक्रमी बाजीराव तिच्यापुढे जित ठरला, गुलाम बनला. मस्तानीने त्याचे सारे वैयक्तिक व सामाजिक जीवन व्यापून टाकले. आपल्या भोवतालचे पाश बळकट होत चालले आहेत याची कल्पना येत असूनही बाजीराव मस्तानीच्या आकर्षणात अधिकाधिक बंदिवान होत गेला. 'मस्तानीच्या सौंदर्याचा, मस्तानीच्या सानिध्याचा मी गुलाम होऊ लागलो काय? होय ही गुलामगिरीच ! जिंकणारा जिंकला गेला, विजयाचा पराभव झाला, अभिमानाची मान नम्र झाली ! ' या स्वगत उद्गारात बाजीरावासारख्या नेत्याला जीवनातील एका मोठ्या पराभवाची जाणीव होत असलेली दिसून येते. उत्तरेकडची नाणी दक्षिणेकडे चालणार नाहीत असा धारदार आघात करणाऱ्या बाजीरावाला दारुण पराभवाची झळ जाणवू लागली. जेत्याच्या बेदरकार आवेशात मस्तानीसाठी त्याने समाजाला ठोकरले, आप्तस्वकीयांना बाजूला सारले आणि पत्नीच्या बरोबरीचे स्थान तिच्यासाठी शनिवारवाड्यात निर्माण केले. त्याच्या खाजगी आणि राजकीय जीवनावरही एका कंपनीचे अधिराज्य सुरू झाले. ' खरेच हरलो, तुझ्यापुढे मी हरलो ! हे अगदी त्रिकालाबाधित सत्य आहे ' हे एकेकाळच्या पराक्रमी जेत्याचे उद्गार आहेत. एका चतुर, लावण्यमयी पण सामान्य स्त्रीपुढे तो जित ठरला, गुलाम बनला. सुरुवातीला त्याला आपल्या दुबळेपणाची चीड येते पण पुढे पुढे मस्तानीच्या प्रभावापुढे अगतिक बनत गेला. जनानखाने बरोबर घेऊन स्वारीवर निघणाऱ्या मोगलांचा जहाल उपहास करणाऱ्या बाजीरावाला स्वारीवर जाताना मस्तानीच्या बरोबर येण्याच्या इच्छेपुढे मान लववावी लागली. बाजीरावाच्या आणि मराठी दौलतीच्या हितासाठी त्याच्यापासून दूर होण्याची इच्छा मस्तानीने प्रकट केली. आपल्यापुढे बाजीरावाने शरणागती स्वीकारू नये असे तिला तीव्रतेने वाटत असूनही तो तिच्यापुढे संपूर्ण पराभूत झाला हा क्रूर दैवदुर्विलास आहे. हे सगळेच आंधळ्या नियतीतून निर्माण झाले. ' मस्तानी जवळ नसल्यावर पराक्रम कुठचा आणि जीवन तरी कुठचे ! ' अशी बाजीरावाची अवस्था पूर्णपणे पराधीन बनली. मराठी साम्राज्याचे आपण पंतप्रधान आहोत ही पूर्वीची जीवनातील सर्वश्रेष्ठ श्रद्धाही आता दुय्यम बनली. त्याने आपले सर्वस्व मस्तानीला समर्पित केले. ' माझ्या शिरावरील साऱ्या जबाबदाऱ्या मी झुगारून देईन, मस्तकावरील मोठेपणाचा मुकुट कस्पटासारखा फेकून देईन पण मस्तानीला मी माझ्यापासून कधीही दूर करणार नाही ! ' हा बाजीरावाचा

अनुक्रमणिका

अंतिम निर्धार आहे. बाजीरावामधला जेता पराभूत झाला आणि मराठी दौलतीचा आधारस्तंभ असलेला मुत्सद्दी पेशवाही हतप्रभ ठरला. मस्तानीप्रमाणे मद्याचा पेला हा एकेकाळी बाजीरावाचा अंकित असतो, क्षुद्र चाकर असतो. पण आता तो मद्याचा गुलाम बनायला लागला. मद्याने बाजीरावाला पूर्णपणे आपल्या अमलाखाली आणले आहे. आप्तस्वकीयांच्या भिडेखातर काही दिवस बाजीराव मद्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो पण ते दिवस त्याला वैऱ्यासारखे जातात. तो अतिशय संत्रस्त बनतो आणि पुनः मद्याला शरण जातो. मस्तानीची इच्छा नसताना, तिची कसल्याही प्रकारची प्रतिकूल करणी नसतानाही तो बाजीराव असा पराभूत झालेला आहे. ही या नाटकातील Dramatic irony आहे.

भोवतालचे वातावरण

बाजीरावाच्या भोवतालचा समाज क्षुद्र, भेकड आणि बाजारबुणग्यांचा आहे. समाज ही एक फार विचित्र अशी शक्ती आहे. लहरी, चंचल समाजाला नमवण्यासाठी नेत्याच्या अंगी शुद्ध निरपवाद चारित्र्य तरी असावे लागते किंवा अमानुष हुकूमशाही क्रौर्य तरी असावे लागते. या दोन्ही गोष्टी बाजीरावाच्या ठिकाणी नाहीत. समाजाची दृष्टी संकुचित असते, वैगुण्यान्वेषी असते. समाजाची बंधने तटभिंतीसारखी बळकट असतात. प्रत्येक असामान्य व्यक्तीला समाजशक्तीशी झुंज द्यावी लागते. व्यक्तीच्या अंतःकरणातील जिवंत प्रगतिशील प्रेरणा आणि समाजाच्या ठिकाणी असणारी निर्जीव दगडी स्थितिप्रियता यांच्यामधला संघर्ष सनातन आहे. सॉक्रेटिस, येशू, सेंट जोन यासारख्यांची आहुती समाजाने घेतलेली आहे. अशा समाजाने बाजीरावाला असह्य यातना दिलेल्या आहेत. समाज बाजारबुणग्यांचा असला, स्त्रीलंपटांचा असला तरी तो आपल्या नेत्याच्या चारित्र्यावर निरर्गलपणे भाष्य करू शकतो; ज्या समाजासाठी तळहातावर शिर घेऊन बाजीरावाने प्राण पणाला लावले त्या समाजाने त्याच्याविरुद्ध काहूर उठवले. ब्राह्मण्य न पाळणारा धर्माचे काय रक्षण करणार असलया फसव्या युक्तिवादाच्या आवरणाखाली त्या समाजाने बाजीरावाच्या उत्तुंग कर्तृत्वाविषयीचा अकारण द्वेष लपवलेला आहे. बाजीराव त्याच्या भोवतालच्या समाजापेक्षा कितीतरी पुढे गेलेला आहे. समाजाच्या खालच्या थरातील इमानी शूरवीरांना बाजीरावाने आपले सरदार आणि एका निष्ठावंत कंचनीला आपल्या अंतःकरणात स्थान दिले. नेमके हेच समाजाला सहन झाले नाही. त्यातून तो हिंदू समाज आहे. परंपरागत रूढींची तीव्रतेने जपणूक करणे त्याच्या हाडीमासी खिळलेले आहे. बाजीरावाच्या खाजगी जीवनाविषयी त्याने केवढातरी मोठा कोलाहल माजवला. बाजीरावाने मस्तानीला शनिवारवाड्यात आणून ठेवले आणि त्या जेत्याच्या पायाखालचा एक दगड निखळला. तेवढ्याच संधीचा फायदा घेऊन समाजातील संधिसाधू व्यक्तींनी त्याच्या पायाखालची भूमी पोखरून काढली. एखादा जगज्जेता गांधीलमाशांच्या झुंडीपुढे पराभूत आणि अगतिक व्हावा तसे बाजीरावाचे झाले. मोगलांचा आणि निजामाचा थरकाप उडवणारा पराक्रमी बाजीराव भेकड, दुबळ्या क्षुद्र समाजापुढे पराभूत होऊन प्रायश्चित्त घ्यायला सिद्ध झाला. बाजीरावाची शोकात्मिका त्याच्या पराभवात आहे. समाजाने त्याला संत्रस्त बनवले. चितेवरल्या प्रेताप्रमाणे त्याने सारे निःशब्दपणे सहन केले. समाजापुढे स्वीकाराव्या लागणाऱ्या पराभवातून त्याचा जेतेपणाचा आत्मविश्वास कोसळत गेला, त्याचा अहंकार जमीनदोस्त झाला. विशाल अंतःकरणाच्या उदारमतवादी बाजीरावाचा समाजातील क्षुद्र प्रतिगामी व्यक्तींनी पराभव केला. मस्तानीपुढच्या पहिल्या पराभवातून हा दुसरा पराभव निर्माण झाला. बाजीरावाने जेत्याच्या भूमिकेतून जे जे केले त्यातून पराजयांची एक गुंतागुंतीची साखळी निर्माण झाली.

बाजीराव व चिमाजी

बाजीरावाच्या जीवनात सर्वात मोठा संघर्ष असा निर्माण झाला की ज्यात तो उन्मळून पडला. हा संघर्ष प्रामाणिक भावनांतून निर्माण झाल्यामुळे अधिक अटीतटीचा बनला. बाजीरावाच्या बेदरकार रंगेलपणापुढे न्यायनिष्ठुर चिमाजीच्या रूपाने चारित्र्यसंपन्नता आणि कठोर कर्तव्यनिष्ठा उभी ठाकलेली आहे. बाजीरावाच्या पेशवेपदाची जाणीव त्याच्यापेक्षा चिमाजीच्या ठिकाणी अधिक प्रखर आहे. त्याने परखडपणे बाजीरावाला ऐकवले की मद्यपानाच्या

आहारी जाणे हा व्यक्तिधर्माच्या दृष्टीने प्रमाद आहे. साऱ्या राष्ट्राच्या निष्ठेची, प्रेमाची व श्रद्धेची जबाबदारी पेशव्यावर असल्याची जाणीव सतत त्याने बाजीरावाला दिलेली आहे. देशाच्या राजकारणाचे आपण नेते असल्यामुळे आपल्या खाजगी जीवनाची चिकित्सा करण्याचा लोकांना काहीही अधिकार नाही अशी बाजीरावाच्या सैनिकी रांगडी मनाची धारणा आहे. पण नेत्याचे खाजगी आणि सामाजिक असे दुहेरी जीवन असू शकत नाही, देशाचा नेता हा केवळ राजकारणाचा नेता नसून समाजाच्या सर्वांगीण जीवनाचा नेता असतो या शाश्वत सत्याची पुरेपूर ओळख चिमाजीने बाजीरावाला करून दिली. चारित्र्यापेक्षाही चिमाजीची कर्तव्यनिष्ठेची भावना अधिक तीव्र आहे. बाजीरावासाठीही तो तिला मुरड घालायला तयार नाही. बाजीरावाने मस्तानीला शनिवारवाड्यात आणून ठेवले व तिला पत्नीच्या बरोबरीचे मानसन्मान दिले तरीदेखील त्याने एका अक्षरानेही विरोध दर्शवला नाही. पण बाजीरावाची पेशवा म्हणून कर्तव्यनिष्ठा ढळायला लागलेली पाहताच तो एका पराक्रमी जेत्याविरुद्ध, आपल्या भावाविरुद्ध झुंज द्यायला सिद्ध झाला. ' सर्व अनर्थाच्या मुळाशी मस्तानीच आहे. त्या एका जळत्या निखाऱ्याने पेशव्यांच्या घरात अग्नीचा कल्लोळ उठवला आहे ! ' असा चिमाजीचा प्रामाणिक निष्कर्ष आहे. बाजीराव धर्मबाह्य वर्तन करणार नाही अशी हमी त्याने आपल्या अधिकारात लोकांना दिली आणि बाजीरावाला त्याला मान्यता द्यावी लागली. चिमाजीच्या धगधगीत चारित्र्यापुढे नमण्याशिवाय बाजीरावाला गत्यंतरच उरत नाही. चिमाजीच्या चारित्र्यतेजाने बाजीरावाच्या रंगेलपणाला निष्प्रभ बनवून टाकले. स्वारीबरोबर मस्तानीला नेण्याची बाजीरावाची इच्छा पूर्ण होऊ शकणार नाही असे निर्भीडपणे चिमाजी त्याला बजावतो. शत्रूला धूळ चारण्याच्या धुंदीत बाजीरावाला मस्तानीचा विसर पडेल अशी त्याला खात्री वाटते. बाजीरावामधल्या पेशव्याची मान ताठ ठेवण्यासाठी त्याच्यामधल्या पराधीन रंगेलपणावर चिमाजीने आघात केला. कुलाच्या प्रतिष्ठेसाठी आणि मराठी दौलतीच्या हितासाठी त्याने मस्तानीला बाजीरावादेखत कैद केले. चिमाजीपुढेही तो पराभूत ठरला. मस्तानी बाजीरावाच्या जीवनात आल्यानंतरही त्याने विजय मिळवलेले आहेत पण त्यातील पराक्रम स्वयंभू नव्हता. मस्तानीच्या सहवासाशिवाय पराक्रम अशी त्याच्या विजयातही एक प्रकारची पराधीन अगतिकता आहे, या त्याच्या पारतंत्र्यावरच चिमाजीचा आक्षेप आहे. ' मस्तानीच्या संगतीत रावसाहेबांचा तोल अधिकाधिक सुटायला लागला आणि ती स्वारीवर जात असल्याने राजकारणही बिनसायला लागले ! ... मराठ्यांच्या राजकारणाची आणि रावसाहेबांच्या हिताची हानी व्हायला लागली म्हणूनच मस्तानीला अटकाव करावा लागला ' या त्याच्या उद्गारात त्याच्या कर्तव्यनिष्ठेबरोबरच बंधुनिष्ठा व देशनिष्ठा याही व्यक्त झालेल्या आहेत. राज्याचा हितकर्ता म्हणून चिमाजीने मस्तानीला अटक केली आणि धाकटा भाऊ म्हणून बाजीरावाच्या पायावर डोके ठेऊन त्याची क्षमा मागितली. पेशव्याने मान खाली घातली आणि थोरल्या भावाने क्षमा केली. मस्तानी, मद्य, समाज, कर्तव्यनिष्ठुर चिमाजी या साऱ्यांपुढे बाजीराव पराभूत बनला. त्याचा अहंकार कोसळत गेला, त्याचे जेतेपण विरत गेले, जीवनाचे मधुर स्वप्न कठोर होत गेले. ज्याने पूर्वी सगळ्या क्षेत्रात विजय मिळवले तोच नंतर सगळ्या क्षेत्रात पराभूत बनला. बाजीरावाच्या जीवनातली शोकात्मिका त्याच्या पराजयात सामावलेली आहे.

श्रेष्ठ मानव

बाजीराव सतत भ्रष्ट होत गेला असता, पराजयाने अधःपतित होत गेला असता तो महान शोकात्मिकेचा नायक ठरू शकला नसता, बाजीरावामधला 'माणूस' कोणत्याही परिस्थितीत नष्ट झालेला नाही हा त्याच्या जीवनातील सर्वात मोठा विजय ! हिणकसपणाचा एकही अंश त्याच्या व्यक्तिमत्वाला डागळू शकला नाही. जेत्याच्या उद्दाम भूमिकेत काय किंवा मरणशय्येवर असताना काय तो कधीही मानवतेला पारखा झालेला नाही. धनगर-गुराख्यांना त्याने सरदारकी दिली आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून तो सगळे जीवन जगला. मस्तानीला त्याने पायाची दासी बनवले नाही, आपल्या अंतःकरणात तिला स्थान दिले. आपल्या लाडक्या भावाचे मन दुखावले जाऊ नये म्हणून मद्य झुगारून देण्याचा अट्टोकाट

अनुक्रमणिका

प्रयत्न केला. बाजीरावापेक्षा चिमाजी अधिक कर्तबगार असल्याची कबुली त्याच्या उमद्या मनाने दिलेली आहे मस्तानीच्या भेटीसाठी कर्तव्यनिष्ठुर पण हळव्या चिमाजीचे मन दुखवायचे नाही असा मरणाच्या छायेत वावरतानाही त्याने दृढ निर्धार केलेला आहे. शिंदे-होळकरांच्या ऋणातून बाजीराव कधीच मुक्त होऊ शकणार नाही या कृतज्ञतेच्या भावनेने मरणाच्या दारी असताना तो भारावून गेला. बाजीरावाची पत्नी सततची दुखणेकरीण आहे आणि त्याच्यासारख्या रंगेल पतीला रिझवण्याएवढे रसिक चातुर्य तिच्या ठिकाणी नाही हे त्या दोघांच्याही जीवनातले मोठे दुर्दैव ! स्वारीवर असतानाही प्रत्येक पत्रातून आपल्या पत्नीच्या प्रकृतीची विचारणा करणारा बाजीराव मनाचा कोमल आहे. पत्नीविषयीचे कर्तव्य आपण पार पाडू शकलो नाही अशी अपराधी हळहळ त्याच्या मनाला तीव्र वेदना देताना दिसते. आपण सर्वांना काहीतरी दिले पण पत्नीपासून मात्र सारे हिरावून घेतले या विचाराने त्याचे मन जळत राहिले अखेरच्या क्षणी त्याला आपल्या पूर्वायुष्यातील विजयांची आठवण झालेली नाही; मस्तानीचीही स्मृती झटकून टाकून आपल्या सहनशील, मोठ्या मनाच्या, साध्वी पत्नीपुढे तो लीन झाला. ' होय तुझेच- फक्त तुझेच ऐकेन मी ! ' असा निर्वाळा त्याने आपल्या पत्नीला दिला. बाजीरावामधल्या मानवतेने जीवनाबरोबरच त्याचे मरणही उजळून टाकले. त्याच्या जीवनातील जय व पराजय त्याच्यामधल्या ' माणसा'-समोर हुजरे ठरले.

शोकान्त झाला तो बाजीरावामधील जेत्याचा ! जीवनातील प्रत्येक कसोटीच्या प्रसंगी तावून सुलाखून तेजस्वी ठरला तो त्याच्यामधला ' माणूस ' ! ' दुसरा पेशवा ' या शोकात्मिकेचा आत्मा असा तेजोमय आहे.

लेखकांना विनंति

(१) ' नवभारत ' मासिकासाठी पाठवावयाचे लेख कागदाच्या एकाच बाजूवर शाईने सुवाच्य लिहावे.

(२) लेखाची पोंच तावडतोब देण्यात येऊन त्यासंबंधी निकाल सामान्यतः एक महिन्यात कळविण्यात येईल. न स्वीकारलेला लेख परत करण्यासाठी अवश्य तो टपालखर्च पाठवावा.

(३) लेखाची मर्यादा सामान्यतः ४००० शब्दांहून अधिक नसावी. अनेक अंकातून लेखांक देण्यापेक्षा विशिष्ट मुद्यावर स्वतंत्र लेख लिहिणे बरे.

(४) आशयाला बाध न आणता लेखाची मर्यादा कमी करण्याचा अधिकार संपादकमंडळाला राहील.

(५) लेखाबद्दल अल्पस्वल्प मोबदला देण्याचे संपादकमंडळाने ठरविले आहे.

(६) अभिप्रायासाठी पाठवावयाच्या पुस्तकांच्या दोन प्रती येणे लवकर अभिप्राय देण्याचे दृष्टीने सोयीचे पडते.

(७) लेख, संपादकासाठी इतर काही मजकूर व अभिप्रायासाठी पुस्तके कार्यकारी संपादकांचे पत्त्यावर मुंबईस पाठविणे.

अनुक्रमणिका

श्री. मु. ग. पानसे

संहिता संपादन आणि डॉ. वि. भि. कोलते

(ज्योतिषरत्नमालेच्या निमित्ताने)

ज्योतिषशास्त्रात मुहूर्त हा तृतीय स्कन्द निर्माण करणारा ज्योतिषरत्नमाला नावाचा संस्कृत ग्रंथ विदर्भवासी श्रीपति भट्टाने रचला. मूळ संस्कृत ग्रंथ व त्यावरील मराठी टीका अथपासून इतिपर्यंत असलेली शके १६४३ मध्ये नकललेली एक पोथी मला उपलब्ध झाली. तेव्हा मुहूर्तस्कन्दाचा आद्य ग्रंथ आणि श्रीपतीची मराठी टीका या दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेऊन मी फक्त मराठी टीकेचे संपादन केले. याच ग्रंथाची मराठी टीका देणारी शके १३६९ च्या सुमाराची जी त्रुटित पोथी ५० वर्षांपूर्वी कै. वि. का. राजवाड्यांना मिळाली तिचा तुलनात्मक अभ्यासाच्या दृष्टीने पुष्कळ उपयोग झाला. विस्तृत प्रस्तावना जोडलेली ज्योतिषरत्नमालेची ही मराठी टीका १९५७ साली डेक्कन कॉलेजने प्रसिद्ध केली. या प्रस्तावनेची छाननी करणारा एक लेख डॉ. वि. भि. कोलते यांनी ' विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६३ ' या नियतकालिकात लिहिला आहे.

डॉ. कोलते हे महानुभाव पंथाचे गाढे अभ्यासक, पोथ्यांच्या आधारे महानुभावीय मराठी ग्रंथाच्या संहिता सिद्ध करणारे चिकित्सक संपादक आणि मराठीचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. अशा अनुभवी ज्येष्ठ पंडिताने या ग्रंथाची दखल घेऊन ज्या उपयुक्त सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. ही मराठी टीका अभ्यासकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल मला धन्यवादास पात्र ठरविले, जुन्या गद्य ग्रंथात भर टाकल्याबद्दल माझे अभिनंदन केले आणि मी केलेले संपादन बऱ्याच प्रमाणात समाधानकारक आहे असे मत दिले. यासाठी डॉ. कोलते यांना धन्यवाद.

प्रस्तावना वाचताना डॉक्टरसाहेबांना काही गोष्टी खटकल्या. काही उणीवा दिसल्या. तेव्हा साधनसामुग्रीचा उपयोग " आपल्या अनुमानाला उपोद्बलक होईल अशा रीतीने केला. संशोधकाच्या निर्लेप व विशुद्ध दृष्टिकोणातून केलेला आहे असे वाटत नाही " असा आक्षेप घेऊन " हा पुरावा मराठी ग्रंथकर्त्यासंबंधींच्या आपल्या गृहीतप्रमेयाला विरुद्ध असल्यामुळे त्याकडे त्यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष केले असावे, असा संशय आल्यावाचून राहात नाही" असे म्हटले आहे. शिवाय ठिकठिकाणी "हे अभिप्राय माहीत नाहीत असे कसे बरे म्हणावे ?" "वास्तविक या समस्येची त्यांना कल्पना आहे," " जणू असेच सूचित केले आहे." अशा प्रकारची विधाने करून माझ्याबद्दल संशय व्यक्त केला आहे संशोधनातील सचोटी आणि वस्तुनिष्ठ विचारसरणी आक्षेपार्ह ठरवून माझ्या प्रस्तावनेत विश्वसनीय असे फारसे काही उरत नाही असा वाचकाचा ग्रह व्हावा या धोरणाने हा लेख लिहिलेला असल्यामुळे त्यातील महत्त्वाच्या मुद्यांचा सविस्तर परामर्श घेणे आवश्यक आहे.

डॉ. कोलते यांच्या मुद्यांचा परामर्श

डॉ. कोलत्यांनी प्रस्तुत लेखाचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात मराठी टीकेचा कर्ता श्रीपती नाहीच हे दाखविण्याचा प्रयत्न आहे. अर्थात याला विशेष महत्त्व दिल्याने त्याचा बराच विस्तार केला आहे. लहानशा दुसऱ्या भागात काही चुका व उणीवा दाखविल्या आहेत.

मराठी टीका श्रीपतीने लिहिलेली आहे हे राजवाड्यांचे प्रमेय प्राचीनतेच्या दृष्टीने सोयीचे वाटल्यामुळे मी गृहीत धरले असा त्यांच्या विवेचनाचा सूर आहे, वस्तुतः राजवाड्यांनी म्हटले म्हणून खरे असे मी कोठेच मानलेले नाही. आणि केवळ सोय पाहून काहीही पत्करले नाही. डॉक्टरसाहेबांची विचारसरणी मात्र ध्यानात रहाण्यासारखी आहे. राजवाड्यांचे प्रमेय अनेकांनी निःसंदिग्धपणे मान्य केले नाही हे सांगून लगेच महाराष्ट्र सारस्वताच्या दुसऱ्या आवृत्तीत "श्रीपतीनेच स्वतः ही टीका लिहिली" (पृ. २०) असे निश्चयात्मक विधान कै. वि. ल. भावे यांनीं केले होते

हे खरे आहे अशी कबुली डॉ. कोलत्यांनी दिलेली आहे. परंतु पुढे तिसऱ्या आवृत्तीत कै. भाव्यांचे मत-परिवर्तन झाले असे मानून त्यांचे "असंस्कृतज्ञ व साधारण बुद्धीच्या ब्राह्मणांकरता ज्योतिष, वैद्यक वगैरे शास्त्रां-संबंधी सुलभ रचना-उदाहरण श्रीपतीच्या रत्नमाले सारखे ज्योतिष ग्रंथ किंवा त्यांची भाषांतरे" (पृ. ३२) हे विधान संदिग्ध असल्याचे कबूल करूनही डॉ. कोलत्यांनी त्यावर सावधगिरीचा शिक्का मारला आहे. आणि हे भाषांतरसुद्धा श्रीपतीनेच केलेले असावे असा यातून अर्थ काढला तरी त्यावरून श्रीपतीने रत्नमाला ग्रंथ मूळ 'मराठीत लिहिला' असे भावे यांना अभि-प्रेत होते असे सुतरां म्हणता येत नाही" हा युक्तिवाद केला. पण तो योग्य नव्हे. कारण श्रीपतीने रत्नमाला ग्रंथ मूळ मराठीत लिहिला असा कधीच कोणाचा दावा नव्हता. याप्रमाणे वर उद्धृत केलेल्या संदिग्ध वाक्या-वरून आणि मराठी भाषेची पूर्वपीठिका सांगताना रत्न-मालेचा मुळीच उल्लेख केला नाही या अभावात्मक पुराव्यावरून भावे यांचे मत स्पष्ट होत नाही काय ? असा प्रा. कोलत्यांचा सवाल आहे.

१९१५ साली विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चर्स देताना कै. हरिभाऊ आपट्यांनी राजवाड्यांचे प्रमेय स्थैर आणि ऐकांतिक म्हणून अस्वीकार्य ठरविले. तो उतारा देऊन डॉ. पां. दा. गुणे यांनी विविध ज्ञान विस्तारातील एका लेखात (सन १९२२ पृ. ४५७) राजवाड्यांच्या मताचा परामर्श घेतला तो डॉ. कोल-त्यांनी सविस्तर उद्धृत केला. कै. बा. अ. भिड्यांचे मतही डॉ. गुण्यांसारखेच होते. तेव्हा "आपटे, डॉ. गुणे व भिडे यांच्या या प्रश्नावरील मतानंतर, विशेषतः डॉ. गुणे यांच्या सविस्तर विवेचनानंतर राजवाड्यांचे मत निकालात निघाल्यासारखे वाटणे स्वाभाविक होते." असे खोलात न शिरल्यामुळे डॉ. कोलत्यांना वाटणे साहजिक आहे, पण तसे झाले नाही. आधी रा. भि. जोशी आणि नंतर वि. पां. दांडेकर, बी. लक्ष्मीकांत, डॉ. तुळपुळे ही मंडळी राजवाड्यांच्याच पक्षात राहिली.

हरिभाऊंची सूचना उचलून धरण्याकरता डॉ. गुण्यांनी थोडा जास्त विचार केला व आपली मते धारदारपणाने मांडून वि. ज्ञा. वि. मधील लेखात राजवाड्यांवर कडाडून हल्ला चढविला. डॉ. गुणे हे जुन्या पिढीतील ख्यातनाम भाषाशास्त्रज्ञ असल्यामुळे डॉ. कोलत्यांनी त्यांच्या प्रत्येक वाक्यावर विश्वास ठेवला आहे. आणि त्यांच्या विधानांना पुष्टी मिळेल असा पुरावा जमवून आपला लेख तयार केला आहे. म्हणून डॉ. गुण्यांचा लेख प्रा. कोलत्यांच्या मताचा खरा पाया ठरतो.

ज्योतिषरत्नमालेच्या टीकेसंबंधी डॉ. गुणे यांचा मुख्य आक्षेप असा की "प्रकरणे जेथे संपतात तेथे ही टीका आपलीच आहे हे दाखविणारे "स्वोपज्ञ प्राकृत टीकायां" सारखे शब्द श्रीपतीने योजले नाहीत. म्हणून त्याच्या टीकाकर्तृत्वाचा पायाच कच्चा आहे. सर्वच स्वोपज्ञटीकांमध्ये असा स्वकर्तृत्वाचा निर्देश असतो असे डॉ. गुण्यांनी गृहीत धरले आहे. परंतु ते खरे नव्हे. संस्कृतमध्ये अशा काही स्वोपज्ञटीका आहेत की टीकेवरून मूळ ग्रंथ रचणारा ग्रंथकार व त्याचा टीकाकार एकच व्यक्ती आहे हे ओळखणे अशक्य असते. अशा वेळी परंपरागत मत मान्य करावे लागते. मम्मटाने काव्यप्रकाश लिहिला. त्यातल्या परिकरा-लंकारापर्यंतच्या कारिकांवरील 'वृत्ति' मम्मटानेच रचिली हे सर्वमान्य आहे. ही वृत्तिरचना स्वोपज्ञ आहे असे मम्मटाने सांगितले नाही तरी तिचे कर्तृत्व अद्याप निर्विवाद आहे. भर्तृहरीकृत वाक्यपदीयटीका, भट्टोजी दीक्षिताची सिद्धान्तकौमुदीवरील प्रौढमनोरमा यासारखे आणखी काही ग्रंथ आहेत. त्यामुळे स्वोपज्ञ-तेचा उल्लेख नसल्यामुळे पाया कच्चा ठरविणारा दावा मान्य होण्यासारखा नाही.

संस्कृतमधील स्वोपज्ञटीकांमध्ये ग्रंथकार आपण स्वतः टीका केल्याचे निरनिराळ्या प्रकाराने सांगतात. 'अभिधानचिन्तामणि'वरील टीकेत "स्वोपज्ञनाम-मालाया विवृतिं विदधाम्यहम्" असे सांगून हेमचन्द्राने – डॉ. गुण्यांच्या अपेक्षेप्रमाणे – प्रत्येक कांडाच्या शेवटी स्वोपज्ञतेचा निर्देश केला आहे. अप्पय दीक्षिताने 'विधिरसायना'च्या सुरवातीला" ... निर्मितं विधिरसायनं मया । पद्यरूपमनतिस्फुटाशयं तत्सुखाव-गतये विविच्यते ।। असा तृतीयान्त उल्लेख केला तर 'कारिकावलि'वर 'सिद्धान्त मुक्तावलि' व्याख्या लिहिताना "निजनिर्मितकारिकावलीमतिसंक्षिप्त

अनुक्रमणिका

चिरंतनोक्तिभिः । विशदीकरवाणि ...'' असे विश्वनाथ पञ्चानन सरळ सांगतो. पण तर्कदीपिकेच्या शेवटी '' अन्नंभट्टेन कृता स्वकृततर्कसंग्रहस्य दीपिका ... '' याप्रमाणे स्वतःचा निर्देश अन्नंभट्टाने अगदी तिऱ्हाईत-पणे केलेला दिसतो. (हे समाप्तिदर्शक वाक्य तर्कदीपिकेस मागाहून जोडलेले असण्याचा संभव आहे).

येथे असा एक आक्षेप घेतला जाईल की टीकेत कर्त्याच्या ठिकाणी टीकाकाराचे नाव आलेले नाही, आणि श्रीपतीच्या टीकेत तर तो ' मी श्रीपति रत्नाचि माला रचितो, '' मी श्रीपती सांगैन, '' ' म्यां श्रीपतीने येथे स्पष्ट केला ' असा स्वतःचा नामोल्लेख करतो. टीकेत आपले नाव देण्याची स्वोपज्ञ टीकाकारांची साधारणतः पद्धती नाही. म्हणून ही टीका श्रीपतीची नसावी. पण हेही तितकेसे बरोबर नाही. कारण विश्वनाथ पञ्चाननाने '' विष्णोर्वक्षसि विश्वनाथकृतिना सिद्धान्तमुक्तावली । विन्यस्ता ... '' असे आपले नाव लिहिले आहे. याच्या पुढे जाऊन ज्यो० र० मा० च्या मराठी टीकेला तंतोतंत लागू पडणारे उदाहरण ' भव्य-कुमुदचन्द्रिके'चे आहे. राजकवी पंडित बिल्हणाने ज्याची स्तुती केली त्या आशाधराने ' सागर धर्मामृत ' नामक ग्रंथ लिहून त्यावर ' भव्यकुमदचन्द्रिका ' ही स्वोपज्ञटीका रचली. तिच्या शेवटच्या भागात आशाधराने आपली सविस्तर माहिती देताना म्हटले आहे : '' सोऽहमाशाधरो रम्यामेतां टीकां व्यरीरचम् । धर्मामृतोक्तसागरधर्माष्टाध्याय गोचराम् ॥ १८ ॥ '' हा उल्लेख श्रीपती प्रमाणेच कर्तरीप्रयोगात स्वतःचे नाव देणारा आहे.

संस्कृतमधली ही उदाहरणे पाहिल्यास असे दिसते की कर्मणि प्रयोगामध्ये स्वकर्तृकत्वाचा तृतीयान्त उल्लेख येणे हे जसे बाधक नाही, तसे मूळ ग्रंथांत ग्रंथकाराचा नामनिर्देश असो वा नसो. टीकेत तो आपले नाव देतो. आशाधराच्या बाबतीत हे मान्य होत असेल तर श्रीपतीच्या बाबतीत का होऊ नये ? डॉ. गुणे किंवा डॉ. कोलते यानी या स्वोपज्ञटीका पाहिल्या असत्या तर त्यांना हा प्रश्न पडला नसता. मराठी भाषांतर असलेले भव्यकुमुदचन्द्रिकेसहित आशाधराचे सागार धर्मामृत १९१४ साली राजवाड्यांनी ज्यो० र० मा० प्रसिद्ध केली त्याच वर्षी-कोल्हापूर येथे छापून प्रसिद्ध झाले होते. पण ते डॉ. गुण्यांच्या अवलोकनात आले नसावे.

टीकांच्या बाबतीत आणखी एक शंका उपस्थित होण्यासारखी आहे. ती म्हणजे प्रत्येक ठिकाणी ' ही टीका ' आहे असे स्पष्ट म्हटले आहे. पण श्रीपतीने मी टीका लिहितो असे सांगितलेले नाही. म्हणजे टीकेत, टीका, व्याख्या, वृत्ती वगैरे सारखा एखादा शब्द यावयास पाहिजे अशी अपेक्षा असते. भट्टोजि दीक्षिताचा ' शब्दकौस्तुभ ' पाहिला तर तो पाणि-नीच्या अष्टाध्यायीवरचा टीकात्मक ग्रंथ आहे. पण त्यात त्याने '' समर्प्य लक्ष्मीरमणे भक्त्या श्री शब्द-कौस्तुभम् । भट्टोजिभट्ट जनुषः साफल्यं लब्धुमीहते ॥ ५ ॥'' एवढेच म्हटले आहे. त्यात टीका वगैरे शब्द नाही.

याप्रमाणे उपलब्ध असलेल्या आनुषंगिक गोष्टी लक्षात न घेता '' प्रथम पुरुषी उल्लेखाच्या सुताने संस्कृत ग्रंथाचा व त्यावरील मराठी टीकेचा लेखक स्वतः श्रीपतीच होय या सिद्धांताच्या स्वर्गाला जाणे सुतरां अशक्य होय '' अशी घोषणा करून ज्यो. र. मा. वरील मराठी टीका श्रीपतीची नव्हे तर कोणा एका अनामिक लेखकाने केलेले भाषांतर आहे. हे डॉ. गुण्यांचे प्रमेय डॉ. कोलत्यांनी उचलून धरले आहे. डॉ. कोलत्यांनी आपले विधान ठाम समजुतीने केले असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की निर्णायक पुरावा हाताशी नसल्यामुळे अनुषंगिक माहितीवरूनच अनुमान सिद्ध करावयाचे आहे. उपलब्ध माहिती-प्रमाणे श्रीपतिभट्ट वऱ्हाडात राहणारा तेव्हा त्याची मातृभाषा मराठीच असली पाहिजे. त्याच्या मामाने-पुष्पदन्ताने-जैनपंथाची दीक्षा घेतल्यावर महापुराणा-सारखी अप्रतिम साहित्यरचना अपभ्रंशात केली. तो महाकवि म्हणून लौकिकास चढला. अपभ्रंश ही संस्कृत -प्राकृतच्या मानाने लोकाना जास्त परिचित आणि जवळची भाषा. लोकभाषेच्या आविष्कार शक्तीचा हा प्रत्यय आल्यामुळे सर्वमान्य झालेला आणि सर्वोपयोगी ठरलेला आपला मुहूर्त ग्रंथ आपल्या प्रदेशातील संस्कृत न पढलेल्या लोकानाही सहज समजावा अशी तीव्र इच्छा होऊन ज्यो० र० मा० चा आशय आपल्या मातृभाषेत-मराठीत-आणण्याची स्फूर्ति श्रीपतीने पुष्पदन्तापासून घेतली असली पाहिजे. कदाचित् ती स्वतंत्रही असू शकेल. सन १०३९ च्या सुमारास ग्रंथलेखनाच्या दृष्टीने मराठी भाषा अगदीच अप्रगल्भ

दशेत होती. म्हणून या टीकेतील मराठी वाक्ये संस्कृत मिश्रित व त्रोटक बनली आहेत. पंडितांना पटवून देण्याकरता शास्त्रचर्चा करणारी ही टीका नाही तर सामान्य जनतेला रोजच्या व्यवहारात लागणारी मुहूर्तासंबंधी आवश्यक तेवढी माहिती त्यांच्या भाषेत देणारी टीका आहे. त्यामुळे येथे पांडित्यप्रदर्शनासाठी वाढविलेला व्याप नाही तर गरज भागविणारा आटोपशीरपणा आहे. शिवाय मराठीत लिहिण्याचा हा अनोखा प्रयत्न असल्यामुळे महत्त्वाचा तेवढाच भाग मराठीत देणे श्रीपतीला सोईचे वाटले असावे. उपलब्ध संपूर्ण मराठी टीका देणारी पोथी शके १६४३ ची असली तरी त्याआधी चारशे वर्षांपूर्वी लिहिलेली एक अपूर्ण पोथी आजही राजवाडे संशोधन मंदिरात आहे. ज्या मराठी टीकेची नक्कल करून ठेवण्याची जरूरी या चारशे वर्षांत लोकांना वाटली, तिची पूर्वपरंपरा श्रीपतीपर्यंत जाऊन पोचत नाही याला डॉ. कोलत्यांच्या जवळ कोणता निश्चित पुरावा आहे ? शके १३६९ च्या सुमारची राजवाडे पोथी आणि शके १६४३ ची मराठी टीका यांच्यात आशयाच्या दृष्टीने फरक नाही. बदल आहे तो शब्दांच्या रूपात किंवा एखाद्या वाक्यरचनेत. यालाच राजवाड्यांनी भाषेचा बदल मानला आहे. भाषेत घडून आलेल्या अशा बदलांचा शास्त्रीय अभ्यास केला तर मूळ ग्रंथकाराची संहिता सिद्ध करता येते. या मराठी टीकेच्या कालनिर्देश असणाऱ्या पोथ्या उपलब्ध झाल्या तर ही संहितासिद्धी अशक्य नाही. परंतु श्रीपतीच्या संहितेबद्दल काही विधान करण्यास पुरेसा पुरावा आज आपल्यापुढे नाही. म्हणूनच प्रस्तावनेत मी म्हटले आहे : On the basis of such scanty material in the obsence of sufficient testimonia of the work a critical edition as such is hardly possible. त्यातूनही प्रत्यक्ष श्रीपतीची संहिता देणारी पोथी autograph manuscript मिळाली तर प्रश्नच नाही. शके ९६१ आणि १३६९ या दरम्यानच्या दोनतीन पोथ्या मिळाल्या तरी काम सोपे होईल. मराठी भाषेच्या घडणीचा तो काळ होता. त्यामुळे अशा पोथ्या मिळाल्या तरी त्यात नकलकारांच्या बोलीतली रूपे व उच्चार कळत नकळत भाषेत उतरलेली असणार. अशाप्रकारे पुराव्याची भाषा शास्त्रीय छाननी केल्याखेरीज टीकेतली भाषा श्रीपतिकालीन आहे किंवा नाही ते ठरविता येणार नाही. याची जाणीव असल्यामुळे प्रस्तावनेतले निःसंदिग्ध विधान असे आहे : It is, therefore, necessary to investigate whether this claim of its being the earnest specimen of Marathi language is supported by the linguistic analysis of its contents.

याचा अर्थ संपूर्ण मराठी टीकेची भाषा श्रीपतीची किंवा त्याच्या काळची आहे असे मी मानले किंवा सिद्ध केले असा होत नाही. पण नेमके हेच वाक्य डॉ. कोलत्यांनी लक्षात घेतले नाही. एका बाजूला प्राकृत अपभ्रंश आणि दुसऱ्या बाजूला सुरवातीचे महानुभावीय गद्य यांच्या तुलनेने भाषेचा– विशेषतः वाक्यरचनेचा– अभ्यास केल्याशिवाय या प्रश्नाचा उलगडा होणार नाही. ग्रंथविस्ताराच्या व कालाच्या मर्यादेमुळे या प्रस्तावनेत मी ते काम करू शकलो नाही. हे विधायक कार्य करून ही टीका श्रीपतीची नाही असे डॉ. कोलत्यांनी सिद्ध केले असते तर हा प्रश्न कायमचा निकालात निघाला असता. पुरेसा पुरावा मिळून सांगोपांग अभ्यासानंतर ही टीका श्रीपतीची नाही असा निर्णय झाला तरी त्यात मला वाईट वाटण्यासारखे काही नाही.

पांडित्य, चिकित्सा, सच्चेपणा व बिनचूक माहिती याविषयी जर्मन संशोधकांची एकंदरीने ख्याती आहे. **Aufrecht** ने आपल्या **catalogus catalogorum** च्या पहिल्या भागात ज्यो. र. मा. वरील श्रीपतीच्या स्वोपज्ञटीकेची पोथी नोंदविलेली आहे. (p. 213 No. B4. 184). वधवान येथील मोरारजी नामक गृहस्थाच्या संग्रहातली ही पोथी डॉ. बुव्हरने पाहिलेली आहे. त्या पोथीचा शोध लावून तिचा उपयोग करता यावा म्हणून मी तीनचार वर्षे खटपट केली. पण तिचा पत्ता लागला नाही. आपल्या अनुमानाला उपोद्बलक होईल तसा पुरावा देण्याची माझी वृत्ती असती तर या बाबतीत ती पोथी मराठी टीका देणारी असली पाहिजे असे मला प्रस्तावनेत सांगता आले असते. पण तेथे We are at a loss to know whether that commentary was in sanskrit or S'ripati's vernacu-

अनुक्रमणिका

lar language हे वाक्य आहे. एक गोष्ट खरोखर विचार करण्यासारखी आहे. संस्कृत ज्यो. र. मा. च्या कितीतरी पोथ्या उपलब्ध आहेत. त्यावर दहा अकरा टीकाकारांनी रचलेल्या संस्कृत टीकासुद्धा सहज मिळू शकतात. अशा स्थितीत श्रीपती भट्टाची स्वोपज्ञ टीका जर संस्कृतमध्ये असती तर तिच्या नकला असलेल्या पोथ्या उपलब्ध झाल्या नसत्या का ? स्वोपज्ञ टीका इतर टीकाकारांपेक्षा जास्त किंबहुना तितकी तरी मान्यता पावली नसती ? उलट फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील इतर प्रदेशात सुद्धा विषय लक्षात घेता तिच्या नकला होत राहिल्या असत्या. मग हस्तलिखित पोथ्यांचे मिळू शकणारे सर्व कॅटलॉग पाहिले तरी स्वोपज्ञ टीकेच्या पोथीची वर दाखविलेली एकुलती एकच नोंद का ? दुर्मिळ असलेली ही स्वोपज्ञ टीका श्रीपतीने मातृभाषेत रचलेली नसेल असे निश्चितपणे म्हणता येईल काय ? नागपूर विद्यापीठाने जतन केलेल्या गुजराथी टीकेचे उपलब्धिस्थान महाराष्ट्रातील नाशिक आहे हे लक्षात घेतले तर मूळ ग्रंथासाठी मोरारजीच्या बखवान येथील संग्रहात दाखल झालेली स्वोपज्ञ टीका मराठीत असणे अशक्य नाही. पण ही बाब केवळ संभवनीय वाटते. तिची खात्री नाही. म्हणून हा संभव दाखविणारे विधानसुद्धा मी प्रस्तावनेत केले नाही.

टीका लेखनाबद्दलही डॉ. कोलत्यांच्या स्वतंत्र अशा काही कल्पना दिसतात. " शास्त्रीय स्वरूपाच्या आपल्या मूळ ग्रंथातील माहितीत भर घालण्याची आवश्यकता असली तर लेखकाला तो मूळ श्लोकात घालण्यास हरकत कशाची ? पुन्हा दुसरा श्लोक तयार करून तेथे लिहिता येत नाही की काय ? " असा जाब पुढे कोणी विचारील हे पूर्वीच्या संस्कृत ग्रंथकारांच्या ध्यानात आलेले दिसत नाही. आले असते तर ते स्वोपज्ञटीका लिहिण्याच्या भानगडीत न पडता प्रक्षिप्तासारखे दिसणारे नवे श्लोक रचून आपल्या पोथ्यांच्या समासात चहूबाजूंनी लिहीत गेले असते. तसे न करता पूर्वसूरींनी या आक्षेपाला जागा ठेविली आहे खरी. " मुळातील शास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचा भाग तो आपणच लिहिलेल्या टीकेत गाळील काय ? तो स्वतः तसे काही कराल असे मान्य करता येत नाही. " हे विचारताना शास्त्रीय महत्त्वाचा कोणता भाग वगळला आहे त्याचे निदान दिग्दर्शन करणे हे डॉ. कोलत्यांचे कर्तव्य होते.

टीकेत शब्दाच्या अर्थाबरोबरच त्याचे स्पष्टीकरण-सुद्धा द्यायला पाहिजे असे म्हणताना सूत्रानुसारित्व आणि स्वपदवर्णन अभिप्रेत असलेला भाष्य हा प्रकार डॉ. कोलत्यांच्या नजरेसमोर असावा. पण भाष्यापेक्षा टीकालेखनाची पद्धत सैल असते हे सर्वश्रुत आहे. "संस्कृत श्लोक व मराठी टीका यात बिंब-प्रतिबिंब भाव किंवा तंतोतंतपणा आढळत नाही. मुळातील काही संस्कृत श्लोकांवर मराठीत टीकाच केलेली नाही. अनेक ठिकाणी मूळ श्लोकातील शब्द मराठी टीकेत गाळले आहेत तर काही ठिकाणी जास्तीचे घातले आहेत. " ही तक्रार करताना डॉ. कोलत्यांसमोर किती आणि कोणत्या टीकांचा आदर्श आहे ते कळण्यास मार्ग नाही. परंतु माझ्या माहितीप्रमाणे एखादा ग्रंथ वाचकाला ज्या दृष्टीने समजावा असे टीकाकाराला वाटते त्या प्रकारे तो टीका लिहितो. मूळ ग्रंथात चर्चिलेल्या विषयाचा आशय स्पष्ट करणे हे साधारणतः टीकेचे प्रयोजन असते. परंतु संस्कृतमधल्या काही टीका पाहिल्या तर मूळ संहितेचे विवेचन न करता तिच्या विषयावरील आक्षेप व त्यांची उत्तरे देणे हा देखील टीकालेखनाचा उद्देश होऊ शकतो असे दिसते. जास्त लिहिण्याबद्दल सांगावयाचे तर मूळ ग्रंथ सोडून अवांतर विषयांचा ऊहापोह करणारे वाचस्पति मिश्रासारखे टीकाकार आढळतात. हा प्रकार बाजवी आहे किंवा नाही हा मतभेदाचा मुद्दा होऊ शकेल. पण वाचस्पति मिश्रांने लिहिल्या त्या टीका नव्हेत असे कोणी म्हणत नाही. आपल्या टीकेत टीकाकार केवळ मूळ ग्रंथाचाच उपयोग करतो असे नव्हे तर त्यावर झालेल्या विचाराचा परामर्श घेतो. आणि त्यांत त्याची निवड ही महत्त्वाची असते. हे पटण्यासाठी 'भारतभावदीप' टीकेतले " उद्योगपर्वणि सनत्सुजातीये भाष्यकारादिभिर्व्याख्यातान्संप्रतितनपुस्तकेषु च स्थितान्पाठान् श्लोकांश्च गुणोपसंहारन्यायेनैकीकृत्य व्याख्यायते। " हे नीलकण्ठाचे वाक्य ध्यानात घ्यावे. मूळ ग्रंथाच्या लेखकाने जरी स्वतः त्यावर टीका लिहिली तरी आपला ग्रंथ समाजातील कोणत्या वर्गाला कशाप्रकारे समजावयास पाहिजे याबद्दल त्याच्याही काही कल्पना असणारच.

सामान्यजनतेची मुहूर्त पाहाण्याची गरज भागविणे हा मराठी टीकेमागचा उद्देश असण्याची शक्यता वर दाखविली आहे. ज्या श्लोकांवर टीका करण्यासारखे काही नाही असे वाटते ते टीकाकार सोडून देतो आणि ज्याचा अर्थ स्पष्ट आहे तेथे तसा शेरा मारून पुढे जातो. हे नेहमीच्या अनुभवाचे आहे. पण डॉ. कोलत्याना ती उणीव वाटते.

अर्थाच्या दृष्टीने कालमानानुसार शब्दांचा आशय जसा बदलत जातो. तसेच एखाद्या लेखनप्रकाराचे तंत्रही बदलत असते. शिवाय तो लेखनप्रकार एका भाषेतून दुसऱ्या भाषेत उतरतो तेव्हाही त्यात बदल होणे अपरिहार्य असते. मग ते लेण परंपरागत असो किंवा उसनवारीचे असो. ही वस्तुस्थिती विसरून चालणार नाही. डॉ. कोलत्यांनी पाहिलेल्या संस्कृत टीकांच्या तुलनेने मराठी टीका वाचताना जेथे अडखळल्यासारखे वाटले तेथे नवी पायवाट पाडणाराची पावले समजावून घेण्याचा प्रयत्न करणे जरूर होते.

श्रीपतीची कुलदेवता, वास्तव्यस्थान, ग्रंथनाम याविषयीची चर्चा

प्रत्येक बाबतीत शंका घेऊन एखादा पर्याय सुचवावयाचा असल्याने बीडची खंडेश्वरी देवी श्रीपतीची कुलदेवता असावी असे मी म्हटले त्यावर ती कुलदेवता नसून युद्धदेवता मानली पाहिजे हा विकल्प सुचविण्यात आला. रोहिणखेड या श्रीपतीच्या वास्तव्यस्थानाबद्दल "रोहिणीखंड म्हणजे रोहिणखेड हे मान्य केले तरी हे रोहिणखेड निश्चित कोणते या प्रश्नाचा अधिक विचार झाला पाहिजे. कारण रोहिणखेड नावाची गावे अनेक आहेत. मलकापूर तालुक्यात जसे रोहिणखेड आहे त्याचप्रमाणे अकोला, अमरावती, यवतमाळ, या जिल्ह्यातही या नावाची गावे आहेत. यापैकी श्रीपतीचे रोहिणखेड कोणते ?" असा प्रश्न केला आहे. आणि चाळीसगांव जवळचे रोहिणी गांव लक्षात घेतले पाहिजे अशी सूचना दिली आहे. ही गावे मला माहीत आहेत. चाळीसगाव जवळच नाही तर शिरपूर तालुक्यातही (प. खानदेश) आणखी एक रोहिणी आहे. डॉ. कोलते म्हणतात "रोहिणखेड नावाची अनेक गावे आहेत" पण ते बरोबर नाही. ती नावे या नावासारखी आहेत. त्यांची रोहण ६, रोहणा ४, रोहणिया ६. रोहणखेडा १, रोहणवाडी २, शिवाय रोहणसी, रोहणीदेव अशी नावे आहेत. पूर्ण तपासाअंती डॉ. कोलत्यांनी या पैकी कोणतेही गाव श्रीपतीचे रोहिणीखेड ठरविले तरी श्रीपती वऱ्हाडचा रहिवासी होता आणि त्याची मातृभाषा मराठी होती हे मानल्याखेरीज गत्यंतर नाही. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे जरूर आहे. मराठी टीका सादर करणाऱ्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत इतक्या विस्ताराने माहितीची अपेक्षा असलेल्या डॉ. कोलत्यांनी भास्करभट्ट बोरीकराचे एक स्वतंत्र चरित्र लिहिलेले आहे. त्यात "भास्करभट्ट हे परभणी जिल्ह्यातील बोरी या गावचे राहाणारे." या एका वाक्यापलीकडे जाण्याची त्यांना गरज भासली नाही. वास्तविक महाराष्ट्राच्या नागपूर, भंडारा, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, चांदा, नगर, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, खानदेश या जिल्ह्यात व इतरत्र एकंदर बोरी नावाची ८२ गावे आहेत. त्यांची चर्चा करावयास पाहिजे होती. निदान भास्करभट्टाची बोरी परभणीतलीच होती हे दाखविणारे महानुभाव वाङ्मयातील एखादे अवतरण दिले असते तरी चालले असते.

ग्रंथातील प्रतिपाद्य विषयाची चर्चा करताना लेखकाला स्वतःवर काही मर्यादा घालून घ्याव्या लागतात. या तत्त्वाकडे डॉ. कोलत्यांचे दुर्लक्ष झाले आहे. तसेच शास्त्रीय विषयावरील मान्यता पावलेल्या ग्रंथात जी माहिती आलेली नाही ती शास्त्रातच नाही असे त्यांनी मानलेले दिसते. मूळ संस्कृत श्लोकात एके ठिकाणी 'यवन' हा पाठ आहे पण त्या श्लोकावरील मराठी टीकेत 'वसिष्ठच्यवन आदिकरून बोलिले' असे वाक्य आहे त्यासंबंधी तळटीपेत "यवन हा ज्योतिष ग्रंथकार होता. च्यवन या नावाचा मात्र ज्योतिष ग्रंथकार कोणी उल्लेखिलेला नाही. तेव्हा मुळातला यवन शब्द च्यवन असा दुरुस्त करून वाचण्याची आवश्यकता नाही" असे डॉ. कोलत्यांनी सांगितले आहे. मुख्य म्हणजे मराठी टीकेत च्यवन असाच पाठ आहे. तो दुरुस्त करून घेतलेला नाही. आणि भारतीय ज्योतिष शास्त्र या ग्रंथात शं. बा. दीक्षितांनी जरी च्यवनाचा उल्लेख केला नसला तरी नारद संहितेत तो आहे. शिवाय म. म. पंडित सुधाकर द्विवेदी यांनी आर्यभटानंतरच्या ज्योतिर्विदांची (शके ३२८ ते १७५६) माहिती देणारा 'गणकतरङ्गिणी' (सन १९३३) नावाचा ग्रंथ संस्कृत-

मध्ये लिहिली आहे. त्याच्या सुरवातीला ज्योतिःशास्त्र प्रवर्तकांची याची देणारे कश्यप आणि पराशर यांचे श्लोक दिले आहेत. ते असे :–

कश्यपः- सूर्यः पितामहो व्यासो वसिष्ठोऽत्रिपराशरः ।
कश्यपो नारदो गर्गो मरीचिर्मनुरङ्गिराः ।।
लोमशः पौलिशश्चैव च्यवनो यवनो भृगुः ।
शौनकोऽष्टादशाश्चैते ज्योतिःशास्त्रप्रवर्त्तकाः ।।

पराशराः–विश्वसृड् नारदो व्यासो वसिष्ठोऽत्रि पराशरः ।
लोमशः यवनः सूर्यश्च्यवनः कश्यपो भृगुः ।।
पुलस्त्यो मनुराचार्यः पौलिशः शौनकोऽङ्गिराः ।
गर्गो मरीचिरित्येते ज्ञेया ज्योतिः प्रवर्त्तकाः ।।

मला मिळालेल्या पोथीच्या पहिल्याच पानावर "इदं पुस्तकं ज्योतिषरत्नमाला आरंभः" हे एकच वाक्य आहे आणि शेवटचे वाक्य "इति श्रीपतीभट्ट विरचितायां ज्योतिषरत्नमालीयां ग्रंथटीका संपूर्णम् ।" असे आहे. याशिवाय टीकेच्या ओघात "रत्नाची माला रचिते" सारखी आणि प्रकरण समाप्ती दाखविणारी जी वाक्ये आहेत ती सर्वत्र रत्नमाला हे रूप देतात. ही अनेक स्थळे सोडून प्रस्तावनेतील पहिल्या छायाचित्राच्या डाव्या समासात "ज्योतिषरत्नमाला" असे एकदाच आलेल्या रूपावरून (इतर सर्व पानांवर समासात " "ज्यो. र. मा. अशी अक्षरे आहेत) या ग्रंथाचे नाव 'रत्नमाला' ऐवजी 'रत्नमाळा' पाहिजे अशी सूचना करावी याचे नवल वाटते. वास्तविक माझ्या पोथीची फोटोप्रत डॉ. कोलते यांनी पाहिलेली आहे. तसे पाहिले तर तिथीप्रकरणाच्या समाप्ति-वाक्यात चुकून 'ज्योतिषरत्नावल्यां' लिहिले गेले आहे. त्यावरून ग्रंथाचे नाव 'रत्नमाला' का 'रत्नावली अशी शंका यावयास पाहिजे होती.

संहितासिद्धिबद्दलचे काही प्रश्न

मूळ संस्कृत संहिता व तिचा मराठी टीकेशी संबंध याबद्दल लिहिताना संहितासिद्धीच्या शास्त्रात मोडणारे काही प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. मी आपल्या ग्रंथात ज्यो. र. मा. चे संस्कृत श्लोक दिले नाहीत. ही डॉ. कोलते यांनी दाखविलेली उणीव वाजवी आहे. माझ्या पोथीतील संस्कृत श्लोक परिशिष्टात द्यावेत अशी सूचना छपाईच्या वेळी डेक्कन कॉलेजच्या संबंधित अधिकाऱ्यांना मी केली होती. परंतु ज्या ग्रंथाच्या पुष्कळ पोथ्या मिळू शकतात. त्याची संहिता चिकित्सेशिवाय आपण छापू नये असा त्यांनी घेतलेला निर्णय मी मान्य केला. ज्यो. र. मा. च्या संस्कृत संहितेची चिकित्सापूर्वक आवृत्ति तयार करणे हे दीर्घकाळ घेणारे एक स्वतंत्रच काम आहे. याप्रमाणे संस्कृतसंहिता आणि मराठी टीका भिन्न व स्वतंत्र मानल्या आणि अडल्याखेरीज संस्कृतसंहितेचा किंवा महादेवी टीकेचा आधार घ्यायचा नाही असे एकदा ठरविल्यावर संस्कृतमधील पाठाची आपल्याला पाहिजे तशी मराठी टीकेत गल्लत करणे योग्य नाही. म्हणून वसिष्ठाच्या जोडीने येऊ शकणारा च्यवन नावाचा ज्योतिषि नसता किंवा मराठी टीकेच्या आणखी पोथ्या पुढे असून त्यात कोठे यवन असा पाठ असता तर संस्कृत संहिता किंवा महादेवी टीकेची मदत घेणे प्राप्त होते. आणि जोपर्यंत *Textual Criticism* ने संस्कृत पाठांची निश्चिती झाली नाही तोपर्यंत त्यातला यवन हाच पाठ बरोबर कशावरून ?

"डॉ. पानसे यांनी शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की ज्योतिषरत्नमालेवरील मराठी टीकांच्या दोन संहिता असल्या पाहिजेत. याचा अर्थ असाच करायचा ना की या दोन्ही मराठी टीका भिन्न आहेत ? म्हणजे त्या भिन्न लोकांनी केलेल्या आहेत ? तसे असेल तर या दोन्ही टीका स्वतः श्रीपतीनेच लिहिल्या असे म्हणता येईल काय ? कारण दोन्ही टीकात 'मी ग्रंथकर्ता श्रीपति' असे दोघांनीही लिहिले आहे ! याची संगती लावायची कशी ?" प्रश्नांची ही फैर डॉ. कोलत्यांच्या मनातला गोंधळ दर्शविते. त्यांनी लेखक आणि लेखनिक यांच्यातला फरक ध्यानात घेतला नाही म्हणून author व scribe या दोघानाही ते लेखकच म्हणतात. संहितासिद्धीसाठी (author) काय लिहिलेले असावे ते शोधावयाचे असते. त्याच्या ग्रंथाच्या लेखनिकांनी (scribe) नकलून ठेवलेल्या प्रती उपलब्ध होतात तेव्हा त्यातील पुराव्याची चिकित्सा करून मूळ संहिता सिद्ध करताना लेखनिकांचे लेखन बदलावे किंवा त्याज्य ठरवावे लागते. म्हणजे संहितासिद्धीच्या शास्त्रात लेखकापेक्षा (author) लेख-

निकाचे (scribe) स्थान गौण ठरते. पण वरील प्रश्नमालिकेवरून डॉ. कोलत्यांचा समज नेमका उलटा आहे असे दिसते. ते लेखनिकाची संहिता प्रमाण मानतात. त्यामुळेच " मराठी टीकेच्या या हस्तलिखितात असलेली ज्योतिषरत्नमालेची संहिता हीच श्रीपतीची मूळ संहिता मानता यावयाला पाहिजे." असे ते म्हणू शकले. याचा परिणाम असा होतो की एखाद्या लेखनिकाची संहिता मूळ मानून इतरांनी नकललेल्या पोथ्यांमधून आपल्याला खरे वाटतील ते पाठ निवडले जातात व आपल्या मताप्रमाणे चुका दुरुस्त करून एखादी संहिता बनविली जाते. पण मग ती मूळ लेखकाची रचना किंबहुना तिच्याजवळ जवळपास जाणारी संहितादेखील तयार होत नाही.

लेखक हा एकच शब्द वापरल्यामुळे जसा author व saribe मध्ये घोटाळा झाला आहे तीच गत 'संहिता' या शब्दाची आहे. संहितासिद्धीच्या शास्त्रात हस्तलिखिताच्या विस्तारवेलीच्या संदर्भात पूर्वापरतेनुरूप वापरले जाणारे archetype, recension, version, text आणि याशिवाय exemplar, codex हे सर्व इंग्रजी शब्द डॉ. कोलत्यांच्या 'संहिता' या एका शब्दात सामावलेले आहेत. मूळ लेखकाची ती संहिता, लेखनिकाची तीही संहिता आणि मधल्या शाखोपशाखा त्याही संहिताच. अर्थाच्या छटा ध्यानात न घेता केलेल्या एकाच शब्दाच्या अशा वापरामुळे हा गोंधळ होणे अपरिहार्य आहे. प्रस्तावनेतील माझा शब्द recension हा आहे. The word recension ordinarily applies the first line of division of the transmission from the archetype and it should be so limited in its usage असा संकेत आहे.

" म्हणजे मराठी रत्नमालेच्या एकाच हस्तलिखितातील टीकेला त्याच हस्तलिखितातील संस्कृत संहितेहून दुसऱ्या एखाद्या संस्कृत संहितेचा आधार असणे शक्य आहे तर!" असे खोचक (?) वाक्य लिहिले आहे. काळाच्या ओघात ग्रंथ हातोहात नकलून येत असताना त्यांत किती प्रकारांनी फेरबदल होत असतात याची डॉ. कोलते यांना कल्पना नाही असे कसे म्हणावे? परंतु मूळ ग्रंथ व त्यावरील टीका प्रथम लिहिली जाते तेव्हाच दोन्ही निरपवादपणे एकाच पोथीत (Codex) असतात आणि पुढे त्या पोथीच्या नकला होत जातात असे गृहीत धरून वरील वाक्य डॉ. कोलत्यांनी लिहिले आहे. वस्तुस्थिति मात्र निराळी असते. मूळ ग्रंथ व टीका निरनिराळ्या पोथ्यांमध्ये असू शकतात. एवढेच नव्हे तर ग्रंथ व टीका एकाच पोथीत असली तरी आपल्या पुढील पोथीतून (exemplar) टीका, उतरवून घेताना त्या पोथीत असलेली मूळ ग्रंथाची संहिता न घेता लेखनिक त्याला विशेष परिचित अशी दुसऱ्या एकाद्या पोथीतली संहिता पत्करतो असा अनुभव आहे. भांडारकर इन्स्टिट्यूट तर्फे तयार झालेल्या महाभारताच्या आदिपर्वाचे संपादन डॉ. वि. स. सुखटणकरांनी केले. (सन १९३३) आदिपर्वाला जोडलेली त्यांची विस्तृत इंग्रजी प्रस्तावना Prolegomena नावाने प्रसिद्ध आहे. या प्रस्तावनेत केलेली संहितासिद्धीची चिकित्सा व त्यासंबंधी प्रस्थापित केलेली तत्त्वे जगन्मान्य झालेली आहेत. त्यांत (पृ. ६४) डॉ. सुखटणकर सांगतात–"... The practice of combining text and commentary in one manuscript is probably not very old. It is almost certain that the autograph copy of the commentator was not made up on the tripartite system of combining the epic text and commentary. ... The Scholiast must have written his commentary, certainly at first, one separate leaves ... ... if the combination is made independently of him and especially if made sometime after the death of the commentater, there is every chance that the scribe would combine the commentary he was copying with some text known better to himself than to the scholiast. ... ... It is consequently best to use always text of the commentary unaccompanied by the epic text ... ... we eliminate in this way automatically all chances of

avoidable error of commission and omission. ''

डॉ. सुखटणकर म्हणतात ते मान्य केले पाहिजे म्हणून मराठी टीका मी अलग काढलेली नाही. संस्कृत व मराठी ज्यो० र० मा० ची इष्ट तेवढी तुलना करून मी पाहिलेल्या सहा पोथ्यांमधील संस्कृत श्लोकांचे विस्तृत कोष्टक दिले आणि माझी पोथी (G) सर्वांत जास्त श्लोकांची (Textus ornitor) असून महादेवी टीकेची पोथी (M B) सर्वांत कमी श्लोक असलेली (textus simplicior) व राजवाडे पोथी (R) दोहोंमध्ये बसणारी आहे. तसेच G मधील मराठी टीका M B च्या संस्कृत संहितेशी पुष्कळच जुळती आहे हेही प्रस्तावनेत मी दाखविले. त्या ठिकाणी म्हटले की: Before arriving at any conclusion on the basis of the above noted discrepancies between the Sanskrit text and the Marathi commentory in the same Ms. it was essential to consider the problem as to whether the Marathi commentary in a particular Ms. had the same SK text as found in that Ms or defferent one. येथे G ची मराठी टीका MB च्या संस्कृत संहितेशी जुळती आहे हे समजले तरी मराठी टीकेचाच अभ्यास करावयाचा असल्याने त्यापुढे चर्चा करण्याचे मला कारण नव्हते.

डॉ. कोलत्यांनी संहितासिद्धीचे आदर्शतत्त्व सांगितले आहे. '' प्राचीन संहिता संपादकाचे एक मुख्य कर्तव्य म्हणजे ज्या हस्तलिखितावरून ग्रंथ संपादन केला असेल त्या हस्तलिखिताची मुळाबरहुकूम प्रत तयार करणे. मुळातील पाठाऐवजी दुसरे पाठ स्वीकारले असतील तर तळटीपात मूळ पाठ देऊन अभ्यासाची सोय करणे. '' अभ्यासाची सोय करणे हा या शास्त्राचा प्रधान हेतू नसून ग्रंथकाराची संहिता शक्यतो होती तशी साधावी हा असतो. आणि त्या दृष्टीने पाठस्वीकाराची तत्त्वे शोधावी लागतात. डॉ. कोलते यानी अनुसरलेले तत्त्व शास्त्रदृष्ट्या किती आणि कसे निरुपयोगी ठरते ते One selected manuscript as the Base या पोटमथळ्याखाली Prolegomena मध्ये दाखविले आहे. प्राचीन संहिता म्हणजे वेद, ब्राह्मण, उपनिषदे, महाभारत इत्यादींच्या संहिता प्रथम पाठांतराच्या माध्यमातून मग लेखनिविष्ट झाल्या. वरील अवतरणात ' प्राचीन-संहिता'च्या ऐवजी मध्ययुगीन प्रादेशिक भाषेतील संहिता अभिप्रेत असावी. मध्ययुगीन संहितेबाबत देखील ज्या ग्रंथाची पुष्कळ हस्तलिखिते उपलब्ध असतील आणि त्यातल्या काही पोथ्यांमध्ये बराच वाढवा (Conflation) असेल तेव्हा आपल्याला चांगली वाटेल ती पोथी प्रधान मानून वर सांगितल्याप्रमाणे बरे दिसलेले पाठ घेऊन फेरबदल केले म्हणजे एक संहिता सिद्ध होते. पण ती शास्त्रशुद्ध नसते. अशा संहितासिद्धीकडे पुष्कळांचा कल असतो याची जाणीव होती म्हणून Preface मध्ये स्पष्ट करावे लागले की : One may come across certain offensive readings which could ordinarily be corrected but I prefer to leave them as they are for want of Ms support for their correction. I am aware thal many scholars here may not agree with me; but that does not disturb my principles. So far the tendency has apparently been almost to rewrite the text rather than to edit it. ''

शास्त्रीय विचारसरणीत आत्मनिष्ठतेपेक्षा वस्तुनिष्ठतेला प्राधान्य दिले पाहिजे. दुसरा पुरावाच उपलब्ध नसतो तेव्हा निरुपाय होईल तेथे लेखनिकाच्या चुकासुद्धा सुधारता येत नाहीत. परंतु एरवी लेखनिकाने लिहिले तेच खरे धरून चालणार नाही. लेखनिक प्रमादशील असतात याबद्दल अभ्यासकांचे दुमत होत नाही. कितीही कसोशीने काम करू म्हटले तरी भल्याभल्यांच्या हातूनही एखादी चूक राहून जाते. Even Homer nods. तर पुढे असलेली पोथी कानामात्रा अनुस्वाराबरहुकूम यांत्रिकपणे दुसऱ्या कागदावर उतरवून काढण्याचे कंटाळवाणे काम सतत करणाऱ्या लेखनिकाची काय कथा ? त्याने कितीही जपले तरी चुका होतात. पुढची पोथी वाचताना नजरचूक होते, कधी लेखणी दगा देते, केव्हा त्याच्या मनातली एखादी कल्पना ग्रंथातल्या कल्पनेशी सरमिसळ होऊन चटकन्

उतरून जाते, तर कधी पूर्वी वाचलेला पाठ चांगला लक्षात राहिलेला असतो तो न कळत कागदावर येतो. काही पाठ मुद्दाम सुधारलेलेही असतात, असे कितीतरी प्रकार होतात. लेखनिक जाणून बुजून चुका करतो असे नाही. उलट नक्कल करताना झालेली चूकै लक्षात आली तर ती सुधारण्याचा तो प्रयत्न करतो. अशा प्रयत्नाचे हॉलने (Hall) तेरा प्रकार दाखविले आहेत. नजरचुकीनेही कमितकमी आठ प्रकारच्या चुका होऊ शकतात. संहितासिद्धीच्या शास्त्राचे दिग्दर्शन करण्यासाठी डॉ. कत्रे यांनी Introduction to Indian Textual Criticism (सन १९४१) हा ग्रंथ लिहिला. त्यात लेखनप्रमादांच्या सर्व प्रकारांची सोदाहरण कल्पना देणारे Causes of corruption in a transmitted text हे छोटेसे प्रकरण आहे. ते पाहिल्यावर वस्तुनिष्ठपणे विचार करणाराच्या नजरेतून लेखनप्रमाद व त्यांची कारणे सहसा सुटू नयेत.

पोथ्यांमध्ये आढळणाऱ्या चुका इतक्या असतात की " It is not always easy to correlate the divergent recensions, to discriminate between the variants, and to constitute a wholly unobjectionable single text. " (prolegomena p. 78) त्यामुळे याविषयी लिहिताना पोथ्यांवरून दिसेल ती वस्तुस्थिती सांगावी लागते. झालेल्या चुकांकरता नकलनवीसांना धारेवर न धरता तोलून मापून लिहिणाऱ्या डॉ. सुखटणकरांना देखील uneducated and inefficient copyist, assiduously but negligently copied अशासारखे शब्दप्रयोग करावे लागले. त्यांच्याबद्दल राजवाड्यांनी आपल्या स्वभावाप्रमाणे लिहिले आहे. संपादक सर्व चुकांचे खापर नकलाकारांच्या माथी फोडतात असा ग्रह झाल्याकारणाने पाठीचा कणा मोडून व डोळे फोडून उपयुक्त काम करणाऱ्या या ' लेखकवर्गा'चा कैवार घेताना डॉ. गुणे व डॉ. कोलते हळवेपणाने लिहितात. परंतु कित्येक लेखनिकांना आपल्या स्खलनशीलतेची जाणीव होती असे दिसते. भग्नपृष्ठिकटिग्रीव होऊन ग्रंथाची नक्कल शेवटास आणल्यावर तिचे पुन्हा अवलोकन करताना आपल्या हातून किती चुका झाल्या आहेत हे लक्षात आले तेव्हा–

भो भो पुस्तकवाचका बुधवरा युष्मानहं प्रार्थये ।
यद्धस्तत्वरया प्रमादजनितं बिन्दूक्षरभ्रंशनम् ॥
तद्दृष्ट्वा न शपेत मन्युवशगास्त्वत्पादपङ्केरुह–
द्वन्द्वे मे प्रणतस्य मस्तकमिदं भृङ्गायते क्षम्यताम् ॥

–अशासारखा एखादा श्लोक शेवटी लिहून वाचकाचा अनुनय केल्याशिवाय त्यांना राहवले नाही.

या विवेचनावरून डॉ. गुण्यांच्या लेखाचा उल्लेख मी कां केला नाही ते निराळे सांगावयास नको. पण त्यांचा ओझरताही उल्लेख न केल्याबद्दल डॉ. कोलते यांची तक्रार आहे.

ज्यो. र. मा. च्या संपादनासाठी मी इंग्रजी माध्यम वापरल्याबद्दल खेद व्यक्त करून डॉ. कोलते म्हणतात : " मराठी ग्रंथ मराठी वाचकांना आणि अभ्यासकांना मराठीत संपादन करून देणे हे मराठी संशोधकाचे प्रथम कर्तव्य होय. " याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. पण त्यासाठी इंग्रजी किंवा तत्सम भाषांवर बहिष्कार टाकला पाहिजे असे मला वाटत नाही. फक्त ' मराठी वाचक आणि अभ्यासक ' नजरेसमोर न ठेवता मराठीचा वाचक आणि अभ्यासकवर्ग पाहिला तर तो अमेरिका, इंग्लंड, रशिया इ. बाहेरच्या देशातही आहे. इतर भाषांमधले ज्ञानधन मराठीत आणणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच मराठीत असलेले साहित्य अन्य भाषिकांना उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. यासाठी बहुभाषित्व पत्करल्याने मराठीच्या अभिमानास कमीपणा येत नाही. तर ते मराठीच्या निकोप अभिमानाचे निदर्शक आहे असे मी मानतो. म्हणून अन्य भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या ज्ञानाच्या अद्ययावत अभ्यासाने शास्त्रशुद्धता आणि विधायक विचारसरणी अंगी बाणवणे हे मराठी संशोधकाचे आद्य कर्तव्य आहे असे मी समजतो. खास निवडलेल्या आपल्या क्षेत्रात इतर भाषांमध्ये कोणती शास्त्रीय भर पडली आहे हे पहाण्याचे भान राहू न देणाऱ्या भाषाभिमानाने मराठी विद्वत्तेचे पाऊल पुढे पडणे कठीण आहे.

गणेश उमाकांत थिटे

हरविजय महामहाकाव्य

संस्कृत महाकाव्ये व हरविजय

संस्कृत महाकाव्याच्या प्रदीर्घ परंपरेत काही महाकाव्यांची ख्याती तितकीशी दखल घेतली गेलेली दिसत नाही. रामायण-महाभारत ही आर्ष महाकाव्ये अत्यंत लोकप्रिय झाली, आणि त्यांना धार्मिक महत्त्व मिळाले. संस्कृत भाषेच्या पारंपरिक अध्ययनप्रणालीत लघुत्रयी आणि बृहत्त्रयी ह्या पद्धतीने पंच महाकाव्यांचा पद्धतशीर अभ्यास केला जाई. (लघुत्रयीमध्ये मेघदूत हे खण्डकाव्य अन्तर्भूत आहे. महाकाव्यांबरोबर त्याचा समावेश कसा झाला हे कळत नाही. वास्तविक महाकाव्यांबरोबर इतरही काव्यप्रकार अभ्यासले जात होते. पण त्यांचा "त्रयी" वगैरे गटात समावेश नाही. मेघदूताचा आहे हे विचित्र वाटते.) परन्तु अल्पशिक्षितांप्रमाणे बहुशिक्षितांमध्येसुद्धा काही महाकाव्ये स्थिर होऊ शकली नाहीत. ह्या वस्तुस्थितीची कारणे अर्थातच वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळी असतील हे उघड आहे. प्रायः कालिदासाच्या काव्याचे कलात्मक सौन्दर्य पुढील महाकाव्यात कमी प्रमाणात आढळते. कलेपेक्षा कारागिरीला येत चाललेला भर वाढत्या प्रमाणात दिसतो. त्या रीतीने निर्माण होत असलेल्या महाकाव्यांपैकी शिशुपालवधासारखे कृत्रिमतेची कमाल असलेले महाकाव्यही चांगले लोकप्रिय व आदराचा विषय होऊन बसले. पण ह्या कृत्रिमतेच्या परंपरेतील पुढील महाकाव्यांना अर्थातच फारसे यश मिळाले नाही. महाकाव्याची उतरती कळा कधीच संपली नाही. त्यामुळेच कालिदासानंतर "अनामिका सार्थवती" च राहिली. तरीही आपापल्या परीने शर्थ करणारे कवि पुष्कळ झाले, काव्यनिर्मितिसुद्धा होतच राहिली.

ह्या उतरत्या काळातील हरविजय हे एक नमुनेदार काव्य म्हणता येईल. परंपरागत अध्ययनपद्धतीत ह्या काव्याला स्थान नाही. त्यामुळे तसे पाहिले तर ते महाकाव्य उपेक्षितच आहे. जुने लोक त्याला विचारीत नाहीत ह्याचे कारण प्रायः त्याची अतिक्लिष्टता व कृत्रिमता हे असावे. नवे अभ्यासकही त्याला फारसे विचारीत नाहीत ह्याचे कारण त्यात खरोखरीची उच्च दर्जाची सौन्दर्यस्थळे नाहीत हे आहे. तरीही हे काव्य वैशिष्ट्यपूर्ण, व नमुनेदार वाटते. संस्कृत महाकाव्यांच्या इतिहासात व परंपरेत एक महत्त्वाचे स्थान त्याला द्यावेसे वाटते.

हरविजयासंबंधी माहिती

असे का वाटते, हरिविजयाचे गुणदोष कोणते ते पाहाण्यापूर्वी सोयीसाठी हरविजयाचा कर्ता, काळ इत्यादि अवांतर गोष्टी टिपणे इष्ट वाटते. [1]हरविजयाचा कर्ता राजानक रत्नाकर हा आहे. काश्मिरी पंडिताचे गुणदोष त्याच्यामध्ये पूर्णपणे दिसतात. त्याच्या कालनिर्णयाबाबत फारशी मारामारी करावयास अवसर नाही हे अभ्यासकांचे दुर्दैव! कारण त्याचा काळ खूपच निश्चितपणे ठरविता येतो. प्रत्येक सर्गाच्या शेवटी येणाऱ्या पुष्पिकेमध्ये "इति बालबृहस्पत्यनुजीविनो राजानकरत्नाकरस्य कृतौ..." इत्यादि शब्द येतात. बालबृहस्पति हे ज्याचे दुसरे नाव आहे असा चिप्पटजयापीड नावाचा राजा नवव्या शतकाच्या सुरवातीस काश्मीर देशात होता असे कळते. राजतरंगिणीमध्ये पुढील श्लोक येतो:—

श्रीचिप्पटजयापीडो बृहस्पत्यपराभिधः।
ललितापीडजो राजा शिशुर्देश्यस्ततोऽभवत्॥ (४.६८०)

तसेच राजतरङ्गिणीमधील पुढील श्लोकही कालनिर्णयासाठी उपयोगी पडतो—

मुक्ताकणः शिवस्वामी कविरानन्दवर्धनः।
प्रथां रत्नाकरश्चागात् साम्राज्येऽवन्तिवर्मणः॥
(५.३९)

अवन्तिवर्मा काश्मीरात ९व्या शतकाच्या उत्तरार्धात होता. ह्या सर्व पुराव्यावरून हा कवी जयापीड व अवन्तिवर्मा ह्या दोघांचाही आश्रित असून नवव्या

१. हरविजयाची काव्यमालेत प्रसिद्ध झालेली निर्णयसागरची आवृत्ति अभ्यासासाठी वापरली.

शतकाच्या मुख्यतः मध्यभागी त्याचा कर्तृत्वकाल गेला असावा असे वाटते. रत्नाकराने लिहिलेली ३ पुस्तके दिसतात.

(१) हरविजय.
(२) वक्रोक्ति पञ्चाशिका
(३) ध्वनिगाथापञ्जिका.

त्यावरील टीका

हरविजयावर एकच टीका उपलब्ध होते. ह्या टीकेचे नाव " विषमपदोद्योतिनी ". स्वतःच्या नावाप्रमाणे ती टीका केवळ अवघड शब्दांचे अर्थ सांगते. अन्वय, सरळ अर्थ, स्पष्टीकरण केलेले दिसत नाही. क्वचित् ठिकाणी अगदी त्रोटक टीपा आढळतात. काही ठिकाणी उद्धरणे दिलेली दिसतात. टीकाकार उद्धरणांचे पत्ते देत नाही. वृत्तीचा उल्लेख तो करीत नाही. पण फक्त एका सर्गात त्याने ह्या सर्गाचे वृत्त प्रमिताक्षरा आहे असे म्हटले आहे. (सर्ग क्र. ४२) टीकेतील काही शब्द गहाळ झाल्याची ठिकाणे बरीच आहेत. सहाव्या सर्गातील २५ व्या श्लोकापासून ११७व्या श्लोकापर्यंत टीका नाही. ४६व्या सर्गातील जवळ जवळ ६८व्या श्लोकापासून पन्नासाव्या सर्गापर्यंत (काव्यसमाप्तीपर्यंत) टीका नाही.

टीकाकाराचे नाव अलक किंवा अल्लट असे आहे. हरविजयावरील ह्याची टीका जर उपलब्ध नसती तर हरविजय समजणे भलतेच अवघड गेले असते. अनेक अवघड शब्दांचा वापर हरविजयात आहे व ते कोषात सापडतातच असे नाही. अर्थातच टीकेमधून अवघड शब्दांना परिचित अशा पर्यायाखेरीज दुसरे काही मिळत नसल्याने सर्व श्लोक लावण्याची व सरळ अर्थ जाणण्याची खटपट वाचकाला स्वतःलाच करावी लागते. लांब लांब समास सोडविणे, अन्वय लावणे, गोळाबेरीज अर्थ लावणे, नंतर संपूर्ण सरळ अर्थ लावणे अशा क्रमाक्रमाने वाचकाच्या व्युत्पत्तीची कसोटीच लागते. पुनः आपण लावलेला अर्थ योग्य आहे का नाही हे समजण्यास काही पुरावा नसतो. चित्रकाव्यात तर अलकाची टीका वाळवंटातील जहाजाप्रमाणे उपयोगी पडते. ह्याउलट ज्या चित्रमय भागावर त्याची टीका उपलब्ध नाही, त्या भागाच्या अर्थावर आपणास उदारबुद्धीने पाणी सोडावे लागते.

हरविजयाचे अंतरंग

हरविजय ह्या महाकाव्याचा विस्तार चांगला लांब-रुंद व ऐसपैस आहे. त्यात ५० सर्ग आणि श्लोकांची संख्या ४३२१ आहे. विविध वृत्ते, अनेक प्रकारचे शब्दालङ्कार, अर्थालङ्कार, विविध चित्रबंध, लांबलचक वर्णने, उसना शृंगार, बढाईखोर वीररस, पांडित्यप्रदर्शन करणारे विविध संवाद, अवास्तव युद्धे, आणि भक्तिहीन परंतु पोकळ डामडौलाने युक्त अशा देवतास्तुती इत्यादींच्या भांडवलावर हे महाकाव्य विस्तार पावू शकले. पहिल्या सर्गात शंकराच्या नगरीचे वर्णन, तिसऱ्यात ऋतुवर्णन, चौथ्यात पर्वतवर्णन, १७ व्यात पुष्पापचयवर्णन, १८ व्यात जलक्रीडेचे, १९ व्यात सायंकाळचे, २० व्यात चन्द्रोदयाचे, २२ व्यात समुद्रोल्लासाचे, २६ व्यात पानगोष्ठीचे, २७ व्यात संभोगवर्णन, २८ व्यात प्रत्यूषवर्णन, ३२-३८ दूतकर्म, ३९-४९ युद्धवर्णन, इत्यादि वर्णनांची रेलचेल पाहिली की ५० सर्गांची जरूर का भासली हे स्पष्ट होईल.

हरविजयाची कथावस्तु अगदी साधी व सोपी आहे. पार्वतीने शंकराचे डोळे चेष्टेने मिटले व त्यामुळे अंधकासुर निर्माण झाला. तो उन्मत्त झाला व अखेर शंकराने त्याचा वध केला हे कथानक साधे आहेच. पण खुद्द कवीला कथानकाची मुळीच आस्था नाही, तो कथानकाचे धागे अतिशय त्रोटकपणे सांगतो, आणि कथानकातील प्रसंगाच्या आसपासच्या इतर विषयांची लांबलचक वर्णने सतत करतो.

हरविजयाचा शब्दसंग्रह चांगलाच दांडगा आहे. " नवसर्गगते माघे नवशब्दो न विद्यते " ही उक्ति सांप्रदायिक अभ्यासक्रमामध्ये रूढ आहे, पण जोवर हरविजय पाहिले नाही तोवरच त्या उक्तीचे सत्यत्व पटते. कारण कमालीचे अप्रचलित, दुर्बोध, अनवट असे शेकडो शब्द हरविजयात जागोजागी आहेत. त्यातील काही शब्द कश्मीरदेशविशिष्ट असावेत असे वाटते. उदाहरण म्हणून काही शब्द पहा–

वासतेयी = रात्र.
कासर = रेडा.
कुलि = चिमणी.
निशान्त = घर.
रत्यायुस् = भुङ्ग.

अनुक्रमणिका

संकसुक = अस्थिर.
आवखी = कळी.
तालूर = पाण्यातील भोवरा.
झरंक = बुजगावणे इत्यादि.

(हे शब्द नमुन्यासाठी घेतलेले आहेत. एखाद्या व्यक्तीस ह्यातील काही शब्द अन्य मार्गांनी ज्ञात असतीलही. परंतु मुद्दा असा आहे की अवघड शब्दांचा वापर खूप आहे.) ह्या अवघड शब्दांच्या ज्ञानासाठी अलकाची टीका हीच उपयोगी पडते असे वर म्हटलेच आहे.

रत्नाकराने वापरलेले चित्रकाव्याचे प्रकारही विपुल आहेत. मुरजबन्ध, गोमूत्रिकाबन्ध, सर्वतोभद्रबन्ध, पद्मबन्ध ह्यासारखे प्रसिद्ध बन्ध तर आहेतच. पण त्याखेरीज आवलिबन्ध, समञ्जसबन्ध, तूणीबन्ध, काञ्चीबन्ध ह्यासारखे अनवट चित्रप्रकारही रत्नाकर साधतो. ही चित्रकाव्ये रूढीनुसार (भारवि-माघानी निर्माण केलेल्या) युद्धवर्णनातच फक्त येतात, इतर वर्णनात नाहीत.

द्व्यक्षर श्लोक सुमारे १०० भरतील. किरातार्जुनीय किंवा शिशुपालवध ह्या महाकाव्यात असले चमत्कार आहेत. पण त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात हरविजयात ह्या चमत्कारांचा आढळ होतो. शिवाय किरात किंवा माघ त्यातील चित्रबन्ध तुलनेने सोप्या अशा अनुष्टुभ् छन्दात आहेत. हरविजयात अनुष्टुभ् छंदात (सर्ग क्र. ४३) हे चित्रप्रकार आहेतच पण वसन्ततिलका, मन्दाक्रान्ता, शार्दूलविक्रीडित ह्यासारख्या दीर्घ व प्रौढ वृत्तातही चित्रप्रकार आढळतात. ४६ व्या सर्गातील शार्दूलविक्रीडित वृत्तातील पुढील द्व्यक्षरबन्ध पाहण्यासारखा आहे–

तोत्तां तां मतिमत्तमो मम ततातीतामतामुत्तमा ॥
मात्तो मूममितामतामतिमतां मीमातितो तुत्तिमाम् ॥
मत्तामूतिमतीममातिममितां मीतीति मत्तातता ॥
मेतोऽत्तातितुमीतिमत्तमितां मातामिमीताततताम् ॥

४६ व्या सर्गात वसन्ततिलकावृत्तात एकाक्षरबन्ध आहे.

तत्ताति तातोऽतितुतुत्तितोति –
तात्तैतितातीति ततोतितुत्तिः ।
तातोऽतितोऽतुत्तु तु तत्ततोऽत्ता
तुत्तोत्ततातातिततिं तु तोत्तुम् ॥

असल्या श्लोकांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करणे भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखे आहे. संस्कृतभाषेची विशिष्ट शब्दरचनाशक्ति असल्याने असले चमत्कार साधू शकतात. पण ही आत्यंतिकता पाहिली म्हणजे हे कवी फालतू गोष्टीत आपली शक्ति कशी वाया घालवत होते ते कळते : चुकीचे मार्गदर्शन व नवीन करण्याची अक्षमता ह्यातून असे कृत्रिम काव्य जन्माला आले. जाता जाता एक गोष्ट नोंदवून ठेवली पाहिजे की एकाक्षरादिकांसाठी त वर्ग, र, स, इत्यादि व्यंजने उपयुक्त ठरतात. संस्कृतमध्ये हे वर्ण अधिक येतात. परंतु टवर्ग, घ, ख, ष, झ इत्यादि वर्ण संस्कृतात कमी येतात त्यामुळे त्यांचा वापर करून एकाक्षरादि चमत्कार केले जात नाहीत. किरातार्जुनीय किंवा शिशुपालवध ह्यातही हेच दिसते.

रत्नाकराचे पांडित्य हरविजयातील अनेक विषयातील उल्लेखावरून दिसून येते. व्याकरण, न्यायशास्त्र, वेदांत, सांख्य, कामशास्त्र इत्यादि विषयातील त्याचे प्रभुत्व लक्षात येते. संगीतासंबंधी त्याला जबरदस्त आकर्षण दिसते. त्यामुळे संगीतातील उल्लेख अनेकदा दिसतात. काश्मीरातील शिवभक्तिपर प्रत्यभिज्ञादर्शनाशीही त्याचा परिचय असावा. भगवान शंकरांच्या स्तुतीच्या वेळी विविध दर्शनांच्या मतप्रणालीनुसार स्तुती होते.

त्यातील सांख्यमतानुसारी स्तुति पाहा–

प्रकृतेः पृथक् प्रकृतिशून्यतां गतः ।
प्रतिषिद्धवस्तुगतधर्मनिष्क्रियः ।
पुरुषत्वमेव किल पञ्चविंशकः
स्फुचूटलिकार्थवचनैर्निगद्यसे ॥

किंवा न्यायवैशेषिकमतानुसारी स्तुतीतील एक उदाहरण–

जनतेक्रियातिगविशुद्धगोचर–
द्व्यणुकादिबन्धगतकार्यदर्शनात् ।
घटकुम्भकारवदकारकात्मनः
तव कारकत्वमनुमीयते बुधैः ॥

काव्यदृष्ट्या मूल्यमापन

हरविजयामधील काव्यगुण शोधू गेल्यास काही मनोज्ञ श्लोक आढळतात. उदाहरणार्थ मंदरपर्वताच्या वर्णनात कवि सांगतो की पद्म हेच ज्यांचे मुख अशा

प्रकारच्या कमळवेलीरूपी नायिका सकाळच्या वेळी सूर्यरूपी प्रियकर वर येऊ लागला की त्याच्याशी मुंङ्ग्यांच्या कोमल आवाजाच्या रूपाने काहीतरी शृंगारिक आलाप करतात.

प्रेयांसमर्कमुपकण्ठगते विकासि-
पद्माननाः कटकवर्त्मनि पङ्कजिन्यः।
रागादिवालिविरुतैः स्मरकेलिगर्भम्
अत्रानिशं किमपि कोमलमालपन्ति ॥

किंवा पुढील सुभाषितात्मक श्लोक पाहा–

न्याय्यं तदेतदिह तावदुपप्लेवऽपि
कुर्वन्ति यून जगति स्थितिभङ्गमार्याः।
मर्यादया विरहिताः प्रलयागमेऽपि
किं वाच्यतां जलधयो भवने न याताः॥

(सज्जन संकटात पडले तरी आपली मर्यादा सोडत नाहीत हे योग्यच आहे. प्रलयकाळी सागर आपली मर्यादा ओलांडतात त्यामुळे त्यांची निन्दा होत नाही कां?) अशा प्रकारचे काही श्लोक मधून मधून आढतात. त्यामध्ये सोपेपणा, सौंदर्य असते. परंतु एरवी नेहमी ओढाताण, कृत्रिमता, लांबसमास, सांकेतिकता दिसते. अर्थातच फार चांगले काव्य बहुधा आढळत नाही. प्रतिभेची उत्तुंग भरारी, रसरशीतपणा, ह्यांचा आढळ दुर्लभच. परंतु काव्यगुणांच्या अभावीही केवळ पद्यप्रभुत्व, विद्वत्ता व चातुर्य ह्यांच्यायोगे त्याने महाकाव्य पार पाडले आहे.

रत्नाकराला वसन्ततिलकावृत्त विशेष आवडते असे दिसते. एका पारंपरिक श्लोकात हेच सांगितले आहे–

वसन्ततिलकारूढा वाग्वल्ली गाढसङ्गिनी।
रत्नाकरस्योत्कलिका चकास्त्याननकानने॥

त्याला 'पट्ट' हा शब्द आवडतो. कृपाणपट्ट, ललाटपट्ट, वैडूर्यपट्ट, दशनपट्ट, कुट्टिमपट्ट, ओष्ठपट्ट, अलिकपट्ट (=ललाटपट्ट) निकाषपट्ट इत्यादी पट्टान्तशब्द अनेकदा येतात. तसेच छटा शब्द अनेकदा येतो. धूमच्छटा हाही शब्द त्याचा आवडता. खंड शब्दाचा प्रयोग वारंवार दिसतो. कूट हा शब्द उत्तरपदी असलेले शब्द बरेच येतात उदा. कटकूट, कुंभकूट, अंसकूट, कालकूट, इत्यादी. यम ह्या अर्थाचा समवर्तिन् शब्द त्याला विशेष आवडतो. प्रेङ्खत् हा शब्द किंवा प्रेङ्खत्ने सुरवात होणारे श्लोक, प्रेङ्ख धातूचा प्रयोग अनेक ठिकाणी आहे. झांकार, टांकार, टंकार, इ. ध्वन्यनुकारी शब्द वारंवार येतात, घट् धातूचा प्रयोग ही त्याची आवडती लकब आहे. गूढ, पीठ इ. शब्द, टवर्गव्यंजनयुक्त शब्द, "ट्ट" हे व्यंजन असलेले अट्टसारखे शब्द पुनःपुनः तो वापरतो. जखमेवर पट्टी बांधल्याची उत्प्रेक्षा त्याला नेहमी होते. उदा. साहित्यदर्पणांत उद्धृत केलेला पुढील हरविजयातील श्लोक पाहा —

आकुष्टिवेगविगलद्भुजगेन्द्रभोग-
निर्मोकपट्टपरिवेष्टनयाम्बुराशेः।
मन्थव्यथाव्युपशमार्थमिवाशु यस्य
मन्दाकिनी चिरमवेष्टत पादमूले ॥

ज्याप्रमाणे भारवीच्या काव्यात प्रतिसर्गान्ती लक्ष्मी हा शब्द येतो किंवा शिशुपालवधांत प्रतिसर्गान्ती श्री हा शब्द येतो, त्याप्रमाणे हरविजयांत प्रतिसर्गान्ती "रत्न" हा शब्द येतो. ह्या सन्दर्भात पुढील श्लोक पाहा—

पर्यन्ते प्रतिसर्गं रत्नपदं यत्नतः प्रयुक्तवता।
निजनामाङ्कि कविना विरचितमेतन्महाकाव्यम् ॥

हरविजय महाकाव्य एकंदरीत पाहता कृत्रिमतेची कमाल गाठते. सांकेतिकता, ठरीव मार्गावरून दूर न जाणे, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा अभाव, वैशिष्ट्यपूर्ण विचारसरणीचा अभाव इत्यादी कारणानी हे महाकाव्य रसिकांच्या पसंतीस उतरू शकत नाही. रत्नाकार महाकाव्याबद्दलचे साहित्यशास्त्रातील नियम तंतोतंत पाळणे हेच कर्तव्य समजतो. पण त्या नियमांचे औचित्य कसे पाळावे हे तो उपेक्षितो. मूळची शक्ति कमी असल्यामुळे केवळ नियम पाळल्यामुळे कायदेशीर वाटणारी निर्जीव, परंतु रेखीव कलाकृति तो सादर करतो. नवीन रस्ता घडवावा ह्याची त्याला इच्छा नाही किंवा कुवतही नसावी. ह्यातूनच त्याचे वरवर परिपूर्ण पण आतून पोकळ असे "महामहाकाव्य" निर्माण होते. त्याचे प्रयत्न मृत देहाला सजवण्यासारखे वाटतात. विस्तार, कृत्रिमता, शाब्दिक कसरती, पाल्हाळ, अनावश्यक वर्णनांची रेलचेल, राजकारणी वादविवाद इ. बाह्य अंगे ओढून ताणून आणल्यावरही जिवंतपणाचा अभाव असल्याने त्याचे महाकाव्य फसले आणि 'महामहाकाव्य' तयार झाले.

हरविजय वाचताना किरातर्जुनीय आणि शिशुपालवधाची आठवण होणे अपरिहार्य आहे. किंबहुना ही

अनुक्रमणिका

एकाच माणसाची एकापेक्षा एक मोठ्या आकाराची तीन छायाचित्रे वाटतात इतके ह्या तिघात साम्य आहे. किरातार्जुनीयात हिमालयवर्णन, शिशुपालवधात रैवतकवर्णन तर हरविजयात मन्दरवर्णन. युद्ध करावे की न करावे ह्याबद्दल तिन्ही महाकाव्यात जहाल आणि मवाळ पक्षांच्या शाब्दिक मारामाऱ्या आहेत. त्यातून राजकारणी सुभाषितांचा उजळणीपाठ होता. तिन्हीमध्ये हे प्रसंग अगदी एकसुरी पद्धतीने ताणले आहेत. वर्णनांचा साचाही एकच. कथानकाच्या ओघातून दूर जाणारा, उसना शृंगार तिन्हीमध्ये येतो. मग ह्या कवींचे कामशास्त्रीय ज्ञान आणि खरीखोटी प्रतिभा ह्यांना बहर येतो. बरेच सर्ग खपतात. मग युद्धाची ओढ लागते. खेर युद्ध तिघांपैकी एकाही कवीने पाहिले नसावे. पण त्यामुळेच काम सोपे होते. वाचलेली शक्ति कृत्रिम चित्रबंधात खर्चता येते. युद्धवर्णनाचा सांकेतिक साचा वापरला जातो. बाणांना वेग घर्षणामुळे निघणाऱ्या ठिणग्या, योद्धयांचे चापल्य, एकमेकांची बढाईखोर भाषणे ह्यांचा सपाटा सुरू होतो. शेवटी घाईघाईने "गोड शेवट" उरकला जाऊन काव्य संपते.

भारवी, माघ आणि रत्नाकर

किरातार्जुनीयापेक्षा श्रेष्ठ काव्य लिहिण्याची माघाची ईर्ष्या सर्वमान्य आहे. प्राचीन पंडितांनी तर माघाने "जिंकली रे जिंकली" ची आरोळी अनेकदा ठोकली आहे. पण ह्या पुढची पायरी म्हणजे शिशुपालवधावर ताण करण्यासाठी हरविजय काव्य रत्नाकराने लिहिले असावे असे वाटते. ज्या कृत्रिमतेच्या निकषावर माघाने भारवीला जिंकले असे मानले जाते, त्याच निकषावर माघालाही रत्नाकर जिंकू शकतो. शब्दालंकार वृत्तवैचित्र्य, दीर्घवर्णने इत्यादीमध्ये माघापेक्षाही रत्नाकर वरचढ आहे. माघाजवळ मूळचे सामर्थ्य चांगले आहे. त्याचे काही श्लोक त्याचे महाकवित्व सिद्ध करण्यास समर्थ आहेत. रत्नाकराजवळ ही बचावाची बाजू नाही. कृत्रिमता, अनुकरण, ईर्ष्या हेच त्याचे भांडवल. यामुळे तो थोर ठरू शकत नाही, तरी त्याची ईर्ष्या मजेदार वाटते.

संस्कृतातील महाकाव्याचा अधःपात कसा झाला ह्याचे हरविजय हे महाकाव्य उत्तम निदर्शन आहे. आश्चर्य मात्र असे वाटते की बृहत्त्रयीमध्ये किरात, शिशुपालवध व नैषध ही तीन महाकाव्ये येतात; त्यात नैषधाच्या जागी हरविजय हवे होते. श्रेष्ठकनिष्ठतेच्या मुद्यावर नव्हे तर एक सलग परंपरा ह्या दृष्टीने. किरातार्जुनीया पुढची पायरी म्हणजे शिशुपालवध आणि शिशुपालवधाची पुढची पायरी म्हणजे हरविजय. एक, दोन, चार ह्यापुढचा आकडा आठ हा आहे. सहा हा नाही. नैषधीय चरिताचे गुणदोष हा मुद्दा प्रस्तुत नाही. पण "उदिते तु पुनर्हर्षे क्व माघः क्वच भारविः" ही पङ्क्ती श्रीहर्षाने नैषधकाव्याच्या जोरावर भारविमाघांचा पराभव केला असे सुचवते. पण खरा पराभव श्रीहर्षाने केला नसून रत्नाकराने केला आहे. श्रीहर्ष मुळी लढाईला उतरलेलाच नाही.

श्री. प्र. रा. देशमुख

ऋग्वेदातील आर्य आणि दस्यूंचा विचार

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यानी एप्रिल १९६५ च्या नवभारतात ' ऋग्वेदातील आर्य व दस्यु ' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला. त्यात त्यांनी जे प्रतिपादिले ते थोडक्यात असेः

(१) आर्य नावाचा मानव वंश नाही. आर्य हा मानववंशवाचक शब्द नाही.

(२) आर्यही दस्यूप्रमाणे काळे होते.

(३) आर्य नार्डिक टाईपाचे नव्हते. तो त्यांच्यावर मिथ्या आरोप आहे.

(४) दस्यू भटकणारे लोक होते.

(५) दस्यू भारतातील होते याला पुरावा नाही.

(६) दस्यू इन्द्राच्या तोडीचे अतिमानव होते.

(७) त्यांच्या पुरांचा नाश इंद्राने केला. ती हीम व अभ्र होत.

(८) दस्यू म्हणजे आर्यांच्या समाजातील चेटकिणी व चकवे. ते आर्यांच्या यज्ञकर्माचे विरोधी होते. गूढशक्तीने व जादूटोण्याने ते यज्ञात बाधा आणीत होते.

डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या लेखाची दखल घेण्याचे काही कारण नव्हते, कारण त्यांच्या आणि माझ्या विचारसरणीत काही मूलगामी भेद आहेत. परंतु त्यांनी माझ्या नावाचा उल्लेख करून मी लिहिले ते बरोबर नाही असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे त्याला उत्तर न दिले तर वृथा गैरसमज कायम राहण्याचा संभव आहे म्हणून अत्यंत नाखुशीने उत्तर द्यावे लागत आहे.

ज्ञानाच्या प्राथमिक अवस्थेत, ऋग्वेदाच्या एकांगी अभ्यासाने ऋग्वेदासंबंधी बरेच काल्पनिक लिखाण झाले. परस्पर विरोधी गमतीची आणि काल्पनिक विधाने करण्यात आली. ती खरी आहेत अथवा खोटी आहेत हे ताडून पाहण्यास काही मार्ग नव्हता. सिंधुसंस्कृती भारतभूमीवर उत्खनित झाल्यावर ही परिस्थिती बदलली. उत्खननात सिंधुशहरे उत्खनीत झाली व भारतातील या महान् संस्कृतीबद्दल बहुविध माहिती उपलब्ध झाली आहे. ही संस्कृती आर्यपूर्व असून आर्यांनी सिंधुशहरे जाळून या संस्कृतीचा नाश केला ही गोष्ट पौर्वात्य आणि पाश्चात्य विद्वानांना आता सर्वमान्य झाली आहे. ऋग्वेदात संकलित केलेल्या ऋचा भारतातच निर्माण झाल्या आहेत. या ऋचांतून ऋचाकारांच्या पूर्वजांनी जी विजिगिषेची अचाट कृत्ये केली, पुरे फोडली, धनधान्य गायी उपभोग्य वस्तू लुटल्या व ज्या कत्तली केल्या त्याचीच वर्णने आहेत. ऋचा देवाच्या स्तुतिपर प्रार्थना असल्या तरी त्यांतून पूर्वआर्यांच्या विजिगिषेचीच वर्णने आहेत. ती सर्व कृत्ये ऋचांतील स्तुत्य देवांनी त्यांच्यासाठी केली अशी वर्णने आहेत. त्याचा साकल्याने विचार ' प्राचीन भारतीय इतिहास व ऋग्वेद ' नवभारत जून १९५७ या लेखात केला आहे. तरी येथे एक ऋचा उद्धृत करून ऋचांतून इतिहास कसा सापडतो हे दाखविणे प्रस्तुत आहे. ऋचा १-५१-६[१] चा अर्थ असा " (इन्द्रा) तु शुष्णाला ठार मारण्याचे युद्धात कुत्साचे रक्षण केलेस. अतिथिग्वासाठी शम्बराला ठार मारलेस. अर्बुद एवढा मोठा तरी त्याला पायाने उल्लंघिलेस. चिरकालापासून दस्यूंची कत्तल करणे तू जाणतोस. " या ऋचेत स्तुती जरी इन्द्राची आहे तरी तीतून प्राथमिक आर्य कुत्स आणि अतिथिग्व दिवोदासाबद्दलच माहिती मिळते. कुत्साने शुष्णास ठार मारले व अतिथिग्व दिवोदासाने शम्बर व अर्बुद याना ठार मारून दस्यूंची कत्तल केली.

---

१. त्वं कुत्सं शुष्णहत्त्येष्वाविथारन्धयोऽतिथिग्वायशम्बरम् ।
महान्तं चिदर्बुदं निक्रमीः पदा सनादेव दस्युहत्याय जज्ञिषे ॥

अनुक्रमणिका

ह्या गोष्टी जरी कुत्स आणि दिवोदास यांनी केल्या तरी त्या त्यांच्यासाठी इन्द्रानेच केल्या असे ऋचांत वर्णन आहे. हे तंत्र ऋचांतून शेवटपर्यंत अवलंबिले आहे. यावरून एक महत्त्वाची गोष्ट निदर्शनास येईल की ऋचा आणि सिंधुउत्खनन दोन्हीही आर्यांबद्दल व त्यांच्या शत्रूबद्दल माहिती देतात व एकमेकांस पूरक आहेत. त्यामुळे ऋचांतील माहितीचा खरेखोटेपणा उत्खननातील माहितीशी पडताळून पाहता येतो.

सुरवातीच्या काळातच नव्हे तर अगदी अलीकडच्या काळापर्यंत वर दर्शविलेल्या ऋचांतील तंत्राची माहिती नव्हती. त्यामुळे वेदाच्या पाश्चात्य अभ्यासकांचा असा दृढ समज झाला होता की ऋचांतून इंद्रादी देवांनी केलेल्या पराक्रमाचेच वर्णन आहे. अर्थातच ते काल्पनिक अथवा प्राकृतिक चमत्कारांचे वर्णन असावे असे त्यांचे मत होते. त्या घडलेल्या घटना नाहीत. असा दृढ समज झाल्यामुळे ऋग्वेदाचा निसर्गानुरूप अर्थ लावण्याचे प्रयत्न सुरू झाले. ऋग्वेद निसर्गाचे वर्णन करणारे काल्पनिक काव्य आहे असा ऋग्वेदाबद्दल समज झाला. परंतु ऋग्वेद वास्तवात तसा नसल्यामुळे व त्यात आर्यांच्या विजिगिषेच्या ऐतिहासिक घटनांचे वर्णन असल्यामुळे ऋग्वेदाचे अर्थ नीट लावता आले नाहीत व सिंधुसंस्कृतीचा शोध लागल्यानंतर ते संपूर्णतः चुकीचे आहेत हे सिद्ध झाले. पाश्चात्य विद्वान आता ऋग्वेद प्राकृतिक वर्णन आहे असे मानत नाहीत.

इंद्र हा देव आहे आणि ऋग्वेदात त्याने केलेल्या कृत्याचे वर्णन आहे असे मानल्याबरोबर ऋग्वेदातील घटना मानवी नाहीत हे मानणे क्रमप्राप्तच आहे. ती निसर्गाची वर्णने मानणेही क्रमप्राप्तच आहे. ज्या लोकांशी इंद्राचा संबंध आला तेही काल्पनिक मानणे क्रमप्राप्तच व ज्या पुरांचा इंद्राने नाश केला अशी ऋचातून वर्णने आहेत तीही काल्पनिक असणे क्रमप्राप्त. प्रधान समस्या चुकली म्हणजे त्यावरून निघणारे सर्व निष्कर्ष चुकतात याचे हे उत्तम उदाहरण आहे.

प्रचलित पाश्चात्य विद्वान आता ऋग्वेद निसर्गपर मानीत नाही, तो आर्यांच्या भारतातील ऐतिहासिक घटना दाखवितो असे त्यांचे ठाम मत झाले आहे.

डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या लेखाचे स्वरूप—

डॉ. वऱ्हाडपांडे हे पाश्चात्य लेखकांना वेळी अवेळी तुच्छ लेखत असले तरी त्यांच्या लेखावर सुरवातीच्या पाश्चात्य विद्वानांच्या चुकीच्या ठरलेल्या व अतीत काल झालेल्या कल्पनांचाच प्राचुर्याने प्रभाव आहे. अभाविकपणे त्यांच्या चुकीच्या प्रधान समस्येचा अवलंब केल्यामुळे डॉ. वऱ्हाडपांडे यांचे सर्व निष्कर्ष चुकीचे झाले व शेवट गोंधळ निर्माण होण्यात झाला हे दाखविणे प्रस्तुत आहे.

चुकीची प्रधान समस्या

डॉ. वऱ्हाडपांडे यांनी ऋ. ६-२७-५[२] उद्धृत केली तिचा अर्थ असा "अभ्यावर्ती चायमानाला इच्छित वस्तूचा लाभ करून देण्यासाठी वरशिखांच्या वंशजांचा वध केलास. हरियूपीयात पूर्वेकडील अर्ध्या भागात असणाऱ्या वृचीवताला ठार मारलेस, तेव्हा पश्चिमेकडील अर्ध्या भागात असलेला परम भीतीने विदीर्ण झाला." वर उल्लेखिलेले ऋचांचे अर्थ लावण्याचे तंत्र डॉ. वऱ्हाडपांडेना माहीत नसल्यामुळे मी हरियुपीया अभ्यावर्ती चायमानाने जिंकला म्हटले ती चूक केली असे त्याना वाटले. ऋचा जरी इंद्राच्या स्तुतिपर असली आणि इंद्राने अमुक गोष्ट अमक्यासाठी केली असे सांगितले असले तरी ज्याच्यासाठी ती गोष्ट केली त्यानेच ती केली असे समजावे हे ऋचातील तंत्र माहीत नसल्यामुळे त्यानी लिहिले आहे की, "श्री. देशमुखांनी अभ्यावर्ती चायमानाने वरशिखाच्या वंशजाना ठार मारून चायमानाने हरियूपीया शहराचा नाश केला असे ठोकून दिले आहे. पण मूळ ऋचेत हरियुपीयाचा पराक्रम अभ्यावर्ती चायमानाने केला नसून इन्द्राने केला आहे." सू. ६·२७ हे आठ ऋचांचे लहान पण फार महत्त्वाचे सूक्त आहे. त्यातील ४ ते ८ ऋचा उद्धृत करून अभ्यावर्ती चायमानाने वरशिखाच्या वंशजांना ठार मारून हरियुपीया (हरप्पा) शहर कसे जाळले हे दाखविले आहे. उत्खनित झालेल्या हरप्पा शहराशी त्याचे नुसतेच नामसादृश्य नाही तर वाकडी दारे असणे, तटबंदी आणि प्राकार असणे, ते जळले असणे इत्यादी ऋचातील वर्णनाशी साम्य दाखविले. ते फोडणारा अभ्यावर्ती चायमान व दाशराज्ञ युद्धात

---

२. वधीदिन्द्रो वरशिखस्य शेषोऽभ्यावर्तिने चायमानाय शिक्षन् ।
वृचीवतो यद्धरियूपीयायां हन्पूर्वे अर्धे भियसाऽपरो दर्त् ॥

मारला गेलेला कवि चायमान एकच असून तो ऋचां-तील प्रसिद्ध पुरुकुत्स होय हेही दाखविले. यावरून ऋचांतून वर्णन असलेले हरियुपीया काल्पनिक शहर नसून ते काल्पनिक इंद्राने फोडले नाही हे दिसेल. हरि-युपीयाचा विनाश ही एक प्रसिद्ध ऐतिहासिक घटना आहे. हरियुपीया शहर त्याच नावाने सिंधुउत्खननात उपलब्ध झाले आहे. त्यावरून ऋग्वेदाचा आणि सिंधु-संस्कृतीचाही संबंध जुळतो. ह्या सर्व गोष्टी मी माझ-ल्याने पूर्व लेखातून लिहिल्या आहेत. त्या समजून न घेता डॉ. वऱ्हाडपांडे यानी जास्त विचार न करता पाश्चात्यांनी टाकून दिलेल्या कल्पनांच्या आधारे हा चुकीचा लेख लिहिला आहे.

चुकीची प्रधानसमस्या

ज्या पाश्चात्य लेखकांच्या चुकीच्या समस्येच्या आधारावर डॉ. वऱ्हाडपांडे यानी हा लेख लिहिला आहे ती, ऋग्वेदातील सर्व पराक्रम इंद्राने केले ते इतर कोणत्याही व्यक्तीने केले नाही ही होय. ही समस्या गृहीत धरल्याबरोबर सर्व ऋग्वेद व त्यातील सर्व घटना काल्पनिक होतात. ऋ. सू. ६–२७ मध्ये वर्णन केलेली ऐतिहासिक घटना ती इंद्राने केली, ज्या अभ्यावर्ती-चायमानासाठी ती केली आहे असे ऋचातून वर्णन आहे त्याने ती केली नाही, असे म्हटल्याबरोबर तिचे ऐतिहासिक स्वरूप नाहीसे होऊन ती काल्पनिक होते. इन्द्र हा काल्पनिक देव मग तो हरियुपीयासारखे मनुष्य निर्मित शहर कसे जाळील हा गोंधळ निर्माण करणारा व विचाराची गती कुंठित करणारा प्रश्न निर्माण होतो. सर्व ऋग्वेद दुर्बोध व अगम्य होतो. त्यामुळे भलती सलती, बुद्धीला न पटणारी व संभ्रांत विधाने करावी लागतात. या चुकीच्या प्रधान समस्येतून संभ्रांत आणि चुकीच्या निष्कर्षांची मालिका कशी निर्माण होते हे दाखविणे प्रस्तुत आहे.

चुकीच्या निष्कर्षांची मालिका

ऋग्वेदात वर्णन केलेले पराक्रम जर इंद्राने केले असे मानले तर त्याने विनाश केलेली शहरे त्याने फोड-ण्याच्या योग्यतेची तशाच प्रकारची काल्पनिक मानणे पर्यायानेच येते. ती मनुष्यनिर्मित शहरे असू शकत नाहीत. अर्थातच इंद्राने फोडलेली शहरे कोणती असावी हे कल्पनेने ठरविले पाहिजे. त्याबद्दल डॉ. वऱ्हाडपांडे यानी लिहिले आहे "तो पर्जन्याचा देव होता. अव-र्षण व अंधकार यावर विजय मिळवून तो पाणी व प्रकाश यांची मुक्तता करीत असे. पाण्याला अडवून ठेवणारे मेघ वा हिम ही जणू पुरे होती व त्यांचा तो वारंवार भेद करी." असे हे एका अज्ञानातून उत्पन्न झालेले दुसरे अज्ञान व एका चुकीतून उत्पन्न झालेली दुसरी चुकी आहे. ही विचारसरणी डॉ. वऱ्हाडपांडे यांची मूळ नव्हे. ती पहिल्या समस्येप्रमाणे वेदाचा निसर्गपर अर्थ लावणाऱ्या पाश्चात्यांकडूनच घेतली. ऋग्वेदात वर्णन असलेली तटबंदी खंदक आणि दरवाजे असलेली शहरे दासांची होती. त्याना ऋचांतून 'दासीः पुरः' दासाची शहरे अथवा 'दासपत्नीः' म्हणजे दासानी रक्षण केलेली असे म्हटले आहे. ते हिम वा मेघ होते याला ऋचांत काहीही आधार नाही. ही निसर्गपर अर्थ लावणाराची चुकीची कल्पना आहे. निसर्गपर अर्थ लावणाराची कल्पना घेऊन आपल्या कल्पनेची जोड देऊन डॉ. वऱ्हाडपांडे यानी ती जास्त विकृत केली व निसर्गपर अर्थ लावणाऱ्या पाश्चात्यांच्या मेघाच्या कल्पनेला हिमाची जोड दिली त्याला कोणताही आधार नाही.

शारदीः पुरः

वेदाचा निसर्गपर अर्थ लावणाऱ्या पाश्चात्यांनी पुरांचे मेघ कसे बनविले हे पाहणे प्रस्तुत आहे. ऋचा-तील काही जास्त पक्क्या तटबंदीच्या शहराना शारदीः पुरः म्हटले आहे. अशी पुरे सात आहेत. निसर्गपर अर्थ लावणारानी शारदीः याचा अर्थ शरदृतुसंबंधी (autumnal) असा केला आहे व पुरः याचा अर्थ किल्ला (fort) असा करून शरदृतूतील किल्ले म्हणजे शरदृतुतील श्वेताभ्र असा ऋचांतील वर्णनास न जुळणारा चुकीचा अर्थ केला. सायणाने मात्र त्याचा अगदी बरोबर अर्थ केला. 'शारदीः पुरः' याचा 'शारदीः संवत्सर संबंधिनीः संवत्सरपर्यन्तं प्राकार-परिखादिभिर्दृढीकृताः । पुरः शत्रूणां पुरीः । म्हणजे प्राकार आणि परिखादी (तटबंदी आणि खंदक) यानी संवत्सरपर्यंत दृढ केलेली शत्रूंची शहरे असा दिला. सिंधु संस्कृतीतील उत्खनित झालेली, आर्यांनी जाळलेली शहरे पाहिली म्हणजे ऐतिहासिक पार्श्वभूमीचे ज्ञान नसताही सायणाने वेदातील शब्दांचे अर्थ कसे

बरोबर लावले याचे आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. त्याच्या उलट वेदाचे अर्थ लावण्यासाठी सूक्ष्म-पद्धती (critical method) शोधून काढणाऱ्या पाश्चात्य विद्वानांना वेदांबद्दल स्थूल स्वरूपातही ज्ञान होऊ शकले नाही. त्यानी शारदीःपुरः याचा शरदृतु-तील किल्ले म्हणजे शरदृतुतील श्वेताभ्र असा अर्थ केला. 'शरद्'चा अर्थ शरद्ऋतु व 'पुर' याचा अर्थ 'किल्ला' असा जो त्यानी केला तो चुकीचा आहे.

ऋग्वेदात वर्णन असलेली तटबंदीची, सभोवती खंदक असलेली शहरे इतक्या प्राचीन काळी भारतात असतील असे काही पाश्चात्य विद्वानांना शक्य वाटत नव्हते. ही शहरे अग्नीने जाळली असे वर्णन असल्यामुळे ती सभोवती लाकडे रोवून जमिनीत केलेले खड्डे असावे असा अर्थ लावला. पिशेल आणि गेल्डनर यांचे हे मत होते. सिंधु शहरे उत्खनित झाल्यावर व ती सम्यग्तया वेदात वर्णन केलेली पुरे आहेत हे कळल्यावर पाश्चात्यांचे अर्थ चुकीचे आहेत हे सिद्ध झाले. प्रस्तुत लेखकाने आर्यांनी जाळलेली शहरेच सिंधुउत्खननात उत्खनित झालेली, सभोवती तटबंदी खंदक व बाकडे दरवाजे असलेली शहरे होत हे 'सिंधु उत्खननातील शहरे व ऋग्वेदातील पुरे' नवभारत सप्टेंबर १९५६ या लेखात दाखविले आहे. तसे आता सर्व पाश्चात्य आणि बहुसंख्य भारतीय विद्वानांचेही मत आहे.

दास आणि दस्यु

ऋग्वेदातील सर्व पराक्रम इंद्राने केले या अज्ञान-जन्य चुकीच्या परंपरेतून पर्यायाने निघणारी तिसरी चुकीची गोष्ट इंद्राने ज्याच्याशी युद्धे केली ते दास आणि दस्यू हे अर्थातच मानव असणे शक्य नाही ही होय. डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या मताप्रमाणे ते इंद्राच्या बरोबरीचे कोणी 'अतिमानव' असावेत. ही कल्पनाही पहिल्या दोन कल्पनांप्रमाणे पाश्चात्यांचीच घेतली. त्यांच्या लिखाणावरून मॅकडोनेल कीथ आणि वेदिक इंडेक्सचे कर्ते यांचेही दस्यू अतिमानुष होते असेच मत असावे असे दिसते. ते संपूर्णतः चुकीचे आहे हे दाखविण्यापूर्वी ऋचात दस्यूचे वास्तविक स्वरूप काय आहे व त्यांचे संघर्ष कसे होते हे पाहणे प्रस्तुत आहे.

दस्यूंचे वास्तविक स्वरूप

ऋचातून दस्यू नावाचे आर्यांचे शत्रू होते. ते सभोवती तटबंदी व खंदक असलेल्या दरवाज्याच्या पुरनामक शहरात राहात होते. ते फार मोठे व्यापारी असून त्यांचा समुद्रावर दूरवर व्यापार होता. त्यांच्याजवळ सोने रूपे, मौल्यवान दगड, गायी, घोडे आणि धान्य यांची अगणित संपत्ती होती. त्यांची उर्वर आणि क्षेत्र नावाची सुपीक शेते होती. त्यातून ते कालव्याच्या साह्याने खूप पिके काढीत व धान्य साठवून ठेवीत. ते जलाशये अडवून व वळवून त्यांचे अनेकविध उपयोग करण्यात निष्णात होते. त्यांची पुर नावाची शहरे नद्यांच्या काठावर वसविलेली होती. ते डोक्यावर शिंगे बांधीत व नागाशी साम्य दाखविण्यासाठी तप्त सुवर्णाने जिभेला चिरा देत असत. ते यज्ञ करणारे नव्हते. त्यांचे धर्म आणि पूजापद्धती आर्यांच्या धर्म आणि पूजा पद्धतीपेक्षा सर्वस्वी वेगळी होती. ते लिंग आणि मूर्ती-पूजक होते. त्यांचा तीन तोंडाचा देव होता. त्याला ऋचातून विश्वरूप म्हटले आहे. ते देवाला बली देत होते. त्यांचे धर्म गूढ असून काहीसे शाक्त धर्मासारखे होते म्हणून आर्य त्याना जादुगार म्हणत. ही वर्णने ऋचातून सर्व मंडळातून आली आहेत.

दास आणि दस्यू नावाचा विचार

येथे दास आणि दस्यू या ऋचातील आर्यांच्या शत्रू निदर्शक नावाचा थोडासा विचार करणे अप्रस्तुत होणार नाही. दास या शब्दाचा संस्कृत भाषेत सेवक असा अर्थ आहे. आणि दस्यूचा चोर असा अर्थ आहे. ऋचातून मात्र हे दोन्ही शब्द आर्यांचे शत्रू या समान अर्थाने आले आहेत. सायणाने त्यांची व्युत्पत्ती 'दसुउपक्षये' म्हणजे उपक्षय करण्यास योग्य असा दिला. प्रस्तुत लेखकाच्या मते हे शब्द दस म्हणजे चावणे या अर्थी आहेत. वृत्राला ऋचातून अही म्हणजे नाग म्हटले आहे. दासही वृत्र म्हणून संबोधिले आहे. वृत्र याचा अर्थ आवरण करून घेणारे असा आहे. त्याचा अहीशी संबंध होता. ते नागवंशीच असावे. नागाशी संबंध दाखविण्यासाठी ते आपल्या जिभेला चिरा देत. आपल्या नागवंशीय शत्रूचा निर्देश आर्य दास आणि दस्यू म्हणजे 'डसणारे' या समानार्थी नावाने करीत असावे. भारतात जिभेला

चिरा देणारे अहिवंशी आणि मृध्रा (मध्रा) नावाचे लोक अस्तित्वात आहेत त्यासंबंधी प्रस्तुत लेखकाने लेखमालेत विस्ताराने लिहिले आहे.

संघर्ष

आर्यांनी दासांबरोबर दीर्घकालपर्यंत संघर्ष करून त्यांच्या गायी, अन्न, सोने, उपभोग्य वस्तू, शेते, पिके आणि जलाशये काबीज केली. त्यांची मुले आणि स्त्रियाही जबरदस्तीने नेल्या. त्यांच्या ताब्यात असलेल्या नद्यावर कबजा बसविला व शेवटी त्यांची शहरे जाळली व हजारो संख्यांनी त्यांच्या कत्तली केल्या. असे त्यांच्या संघर्षाचे वर्णन ऋचातून सर्वमंडळातून आले आहे. या युद्धाचे ऋचांतून वर्णन असलेले प्रकार असे–

(१) 'पुरभिद्यः' पुरे फोडण्यासाठी युद्ध

(२) दस्युहत्यः दस्यूंची कत्तल करण्यासाठी युद्ध

(३) 'गोसाता' किंवा 'गापुयुधं' गायी मिळविण्यासाठी युद्ध

(४) 'अर्कसाता' किंवा 'वाजसाता' अन्न मिळविण्यासाठी युद्ध.

(५) 'धनसाता' धन मिळविण्यासाठी युद्ध.

(६) 'क्षेत्रसाता' 'उर्वरसाता' शेते काबीज करण्यासासाठी युद्ध.

(७) 'जनियन्तः' स्त्रिया मिळविण्यासाठी युद्ध.

(८) 'तनयसाता' नातू मिळविण्यासाठी युद्ध.

(९) 'तोकसाता' मुले मिळविण्यासाठी युद्ध.

या प्रकाराबद्दल लेखमालेत विस्ताराने लिहिले आहे. या युद्धाच्या प्रकारावरून आर्यांचे दस्यूंशी संघर्ष कशा स्वरूपाचे होते ते दिसून येईल. यावरून दास आणि दस्यू म्हणून संबोधिलेले आर्यांचे शत्रू किती पुढारलेले होते ते दिसेल.

हे ऋग्वेदात इतके स्पष्ट असताना डॉ. वऱ्हाडपांडे यांनी पाश्चात्यांनी टाकून दिलेली, दस्यू हे अतिमानव होते ही कल्पना, त्यावर विशेष विचार न करून, स्वीकारली व ती जास्त विकृत करून ऋग्वेदाचे स्वरूप बीभत्स बनविले. ते तसे नाही व पाश्चात्त्य विद्वान व डॉ. वऱ्हाडपांडे यांचे दस्यु अतिमानव होते असे म्हणणे चुकीचे आहे.

डॉ. वऱ्हाडपांडे यांनी त्यांच्याबद्दल भयंकरच असंभाव्य आणि गमतीचे लिहिले आहे. ते असे– "दस्यु नाशाचे कार्य बहुधा इंद्र करतो. दस्यूंना मारणे हे त्याचे कृत्यदेखील विश्वाला ताणण्याच्या कृत्याप्रमाणेच एक अतिमानवी अद्भुत कृत्य होते. दस्यूंना मारणे अतिमानवी कृत्य होते, कारण दस्यू हे स्वतःच अतिमानव होते. दस्यू चेटकिणी व चकवे. दस्यूवर आर्यांचा एवढा राग का याचे कारण स्पष्ट आहे. ते आर्यांच्या यज्ञकर्माचे विरोधी होते व त्यात ते आपल्या गूढशक्तीने व जादूटोण्याने बाधा आणत असत. जुन्याकाळी इंद्राने ज्यांच्याशी लढाई केली ते दस्यूच आर्यांचे स्वरूप धारण करून छद्माने वावरतात व न कळत यज्ञकर्माचा विध्वंस करतात अशी आर्यांची समजूत होती. चेटकिणी या वेगळ्या वंशाच्या व संस्कृतीच्या स्त्रिया नसतात. आपल्याच समाजातील काही स्त्रियांना चेटूक करण्याचे सामर्थ्य असते ही ज्याप्रमाणे चेटकिणीबद्दल समजूत होती, त्याचप्रमाणे आर्यांची दस्यूबद्दल असावी." हे सर्व असंबद्ध, असंभाव्य व निरर्थक आहे. ते वाचीत असताना आपण एखादे काल्पनिक अद्भुत कथांचे पुस्तक वाचीत असल्याचा भास होतो. ऋग्वेदात त्याला बिलकूल आधार नाही आणि असणे शक्यही नाही. कारण ऋग्वेद काही चकवे आणि चेटकिणीच्या कथांचे पुस्तक नाही. ऋग्वेद हे आर्यांच्या देवाच्या स्तुतीचे पुस्तक आहे. त्यात अनुषङ्गाने प्राथमिक आर्यांसंबंधी व त्यांच्या शत्रूसंबंधी माहिती आली आहे. ती ऐतिहासिक स्वरूपाची आहे. डॉ. वऱ्हाडपांडे यांनी दर्शविल्याप्रमाणे काल्पनिक, असंभाव्य व विचित्र नाही. त्यांच्या विधानांचा जरा जास्त जवळून विचार करणे प्रस्तुत आहे.

असंभाव्य व विचित्र कल्पनांचा गोंधळ–

वरील अवतरणापैकी सर्वात महत्त्वाच्या वाक्याचा जरा तपशिलवार विचार करू. ऋग्वेदातील चकवे कसे यासंबंधी डॉ. वऱ्हाडपांडे म्हणतात. "जुन्या काळी इंद्राने ज्यांच्याशी लढाई केली ते दस्यूच आर्यांचे स्वरूप धारण करून छद्माने वावरतात व न कळत यज्ञकर्माचा विध्वंस करतात अशी आर्यांची समजूत होती. "यातील प्रत्येक विचार अलग मांडून त्यातून काय निष्पन्न होते ते पाहू.

(१) जुन्या काळी इन्द्राने दस्यूंशी लढाई केली. [जुना काळ म्हणजे कोणता काळ ? इन्द्र हा देव

अनुक्रमणिका

आहे आणि डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या म्हणण्याप्रमाणे दस्यू अतिमानव आहेत. ते खरे खुरे होते की काल्पनिक होते ? त्यांची लढाई खरी की काल्पनिक ? त्यात दस्यू मेले की जिवंत राहिले ? त्याकाळी आर्य अस्तित्वात होते की नाही ? हे ज्याची उत्तरे बुद्धीने देता येत नाही असे महत्त्वाचे प्रश्न वरील विचारात अभिप्रेत आहेत. हीच पाश्चात्यांची चुकीची प्रधान समस्या. तिच्यातून पुढील सर्व असंभाव्य गोष्टी निर्माण होतात. इंद्राने केलेल्या लढाईत दस्यू मेले की नाही हे डॉ. वऱ्हाडपांडे यांनी या वाक्यात सांगितले नसले तरी ते मेले असे पूर्वी सांगितले आहे.]

(२) ते दस्यूच आर्यांचे स्वरूप धारण करून छद्माने वावरतात.

[मेलेले दस्यू पुनः जिवंत कसे झाले ? व त्यानी आर्यांची रूपे कशी धारण केली ? ते दुसरा जन्म घेऊन आर्य झाले असा म्हणण्याचा अभिप्राय आहे की ते दस्यूंचे पिशाच्च होते ? त्यांनी धारण केलेले रूप खरे होते की सोंग होते ? दस्यू खरे खुरे नसून ते इंद्राने मारलेल्या दस्यूंचे आर्यांची रूपे धारण केलेले पिशाच होते असे वरील वाक्यावरून ध्वनित होते.]

(३) व न कळत यज्ञकर्मांचा विध्वंस करतात.

[ह्या पिशाचाच्या आर्यरूपाने फिरणाऱ्या आकृती आर्यांच्या यज्ञकर्मांचा गुप्त रूपाने विध्वंस करीत.]

(४) अशी आर्यांची दस्यूंबद्दल समजूत होती.

[हे सर्व खरे की नाही हे सांगता येत नाही. तसा आर्यांचा दस्यूंबद्दल समज होता.]

वरील वाक्य सरळ शब्दात सांगावयाचे म्हटले तर असे होईल. दस्यू हे आर्यांची रूपे धारण करून कपटरूपाने फिरणारे जुन्याकाळी इंद्राने मारलेल्या दस्यूचे पिशाच असून ते नकळत यज्ञाचा विध्वंस करतात असा आर्यांचा समज होता. वरील विधान हे आत्यंतिक अभावाचा उत्कृष्ट नमुना आहे. ह्या सर्व कल्पना निराधार, निरर्थक, संभ्रांत व बुद्धीला अगम्य आहेत.

ऋग्वेदाला अन्याय

ऋग्वेद हे जगातील अत्यंत प्राचीन व महत्त्वाचे वाङ्मय आहे. त्याचे धार्मिक महत्त्व सोडले तरी भारताची ती अत्यंत मोठी देणगी आहे. ऋग्वेदाच्या अर्वाचीन संशोधनात्मक अभ्यासास पाश्चात्त्यांनी सुरुवात केली असली तरी ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या ज्ञानाच्या अभावी, भारतीय संस्कृतीचे सम्यग्ज्ञान नसल्यामुळे, ऋचांचे अर्थ कसे करावे हे न कळल्यामुळे व पूर्वग्रहदूषितपणामुळे ऋग्वेदाच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान त्यांना झाले नाही. त्यानी ऋचांच्या अर्थावरून काही चुकीच्या प्रधान समस्या निर्माण केल्या. ऋचांतील सर्व पराक्रम इंद्राने केले ही ती चुकीची प्रधान समस्या होय. इंद्र हा काल्पनिक देव असल्यामुळे ऋचांत वर्णन असलेले सर्व पराक्रम, लोक व व्यक्ती सर्व काल्पनिक होतात, ही कल्पना आता त्यानी सोडून दिली. पण त्यापूर्वी उत्पन्न झालेले बरेच वाङ्मय अस्तित्वात आहे. सिंधुसंस्कृतीचा शोध लागल्यानंतर ऋग्वेद काल्पनिक नाही, त्यांतील लोक, व्यक्ती, शहरे वगैरे ऐतिहासिक आहेत अशी खात्री झाली आहे.

आमच्यापैकी काही मात्र पाश्चात्त्यांनी टाकून दिलेल्या अतीतकाल झालेल्या चुकीच्या कल्पना उराशी बाळगून त्यांचे काल्पनिक म्हटलेले स्वरूप जास्त विकृत आणि बीभत्स करीत आहेत. दास आणि दस्यू काहीसे अतिमानव असावे असे ऋचांचे अर्थ बरोबर न लागल्यामुळे पाश्चात्याचे संदिग्ध मत होते. काहींना अतिमानवता मान्य नसल्यामुळे त्यांनी त्यांना कल्पनेने रानटी बनविले. या कोणत्याही गोष्टीला ऋचांतून आधार नाही. डॉ. वऱ्हाडपांडे यानी पाश्चात्त्यांनी टाकून दिलेल्यापैकी काही थोड्या कल्पना अर्धवट घेऊन अत्यंत बीभत्स केल्या आहेत. ऋग्वेदाला, पाश्चात्याने नुसताच काल्पनिक केला होता परंतु डॉ. वऱ्हाडपांडे यानी त्याला चकवे आणि चेटकींच्या कथा बनविल्या. ऋग्वेदात आर्यांचे दस्यूंबरोबर संघर्ष वर्णिले आहेत. आणि दस्यू जर चकवे आणि चेटकी असले तर ऋग्वेद चकवे आणि चेटकींच्या कथाशिवाय दुसरे काय असणार ? भारतात अथवा भारताबाहेर ऋग्वेदावर जाणून अथवा अज्ञानाने एवढा अन्याय आजपर्यंत कोणी केल्याचे माहीत नाही. ऋग्वेदाबद्दल सामान्य वाचकास माहिती नसते. ज्यांना माहिती असते ते विद्वान अशा प्रकारच्या लिखाणाकडे लक्ष देत नाहीत, त्यामुळे हे गैरसमज कायम राहतात. त्यामुळेच भारतातील या जगातील सर्वात प्राचीन व मोलाच्या ऐतिहासिक साधनांकडे भारतीय विद्वानांचे वेधावे तितके लक्ष वेधले नाही.

अनुक्रमणिका

डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या लेखाची पार्श्वभूमी-

ज्या चुकींच्या कल्पनांच्या आधारावर डॉ. वऱ्हाडपांडे यानी आपला लेख लिहिला आहे त्या अशा :

१. ऋग्वेदातील सर्व पराक्रम इंद्राने केले.

२. दस्यूंना प्राचीनकाळी इंद्राने मारले म्हणून ते अतिमानव होते.

३. दस्यूंना इंद्राने मारले तरी दस्यूंचे आर्यांशीही संबंध आले असे ऋग्वेदावरून दिसते. मग ते मेलेल्या दस्यूंचे पिशाच होते.

४. डॉ. वऱ्हाडपांडे याना आर्य आणि दस्यूंची वर्ण-भिन्नता मान्य नाही व ते दोघेही सारखेच आहेत असे त्यांचे मत. मग हे पिशाच्च आर्यासारखे दिसणे स्वाभाविक व त्यासाठी दस्यूच्या पिशाच्यानी ते गुप्तपणे वावरत असले तरी आर्यांचे सोंग घेणे अपरिहार्य आहे.

अशाप्रकारे दस्यूंना चकवे बनविण्याचे हे बालसुलभ तर्कशास्त्र आहे. त्याला ऋचांच्या आधाराची काहीही जरूर नाही. परंतु ते ऋचाच्या आधारे सिद्ध केले असे दाखविण्यासाठी दोन अप्रस्तुत ऋचांचे अर्थभाग उद्धृत केले आहेत व " दस्यू, चेटकिणी व चकवे ही उपपत्ती लावण्यास ऋग्वेदातीलच काही निर्णायक उल्लेखाचे साहाय्य होते " असे म्हटले आहे. हे उल्लेख निर्णायक असण्याचे तर दूरच राहिले परंतु संपूर्णतः अप्रस्तुत आहेत. डॉ. वऱ्हाडपांडे यानी काढलेले निष्कर्ष तर त्यातून मुळीच निघत नाहीत. ऋचा १-५१-८ ची डॉ. वऱ्हाडपांडे यांनी उद्धृत केलेली पहिली ओळ अशी :

विजानिह्यार्यान्येच दस्यवो बर्हिष्मते रन्धया शासदव्रतान् ।

अर्थ- आर्यांना व जे दस्यू आहेत त्यांना जाण. यज्ञ करणारांना इच्छित वस्तूचा लाभ करून देण्यासाठी यज्ञ न करणारांना ठार मार. " दुसरे अवतरण ऋचा १०-८६-१९ ची पहिली ओळ आहे. ती अशी :

" अयमेमि विचाकशद्विचिन्वन् दासमार्यम् "

अर्थ- 'आर्य आणि दास यांच्यात निवड करून पाहात हा मी जातो.' ऋचांचे शब्दशः अर्थ दिल्यामुळे त्यातील प्रार्थनांचे स्वरूप काय आहे ते कळणे सोपे जाते. मित्रभूत आर्य व शत्रूभूत दस्यू ओळखून आर्यांचे कल्याण कर व दस्यूंना मारून टाक अशा स्वरूपाच्या त्या प्रार्थना आहेत. त्यावरून डॉ. वऱ्हाडपांडे यांनी जो अत्यंत विचित्र निष्कर्ष काढला तो असा " या उल्लेखावरून दस्यू, दास व आर्य याना पाहिल्याबरोबर वेगळे ओळखणे हे इंद्रासारख्यालाही सहज शक्य नव्हते. " हा निष्कर्ष चुकीचा, हास्यास्पद आणि तर्कदुष्ट आहे हे दाखविण्यासाठी व्यवहारातले उदाहरण घेऊ. जिहादच्या काळी एक कडवा मुसलमान अल्लाची प्रार्थना करतो की "अल्ला मुसलमान कोण, काफीर कोण हे ओळखून काफिराला बरबाद कर व मुसलमानांचे कल्याण कर " यावरून जर कोणी असा निष्कर्ष काढला की मुसलमानात आणि काफिरात इतके साम्य होते की अल्ला एवढा मोठा पण त्याला देखील त्याना वेगळे ओळखणे शक्य नव्हते तर तो जितका चुकीचा तर्कदुष्ट व हास्यास्पद होईल, तितकाच डॉ. वऱ्हाडपांडे यांचा अर्थ तर्कदुष्ट आणि चुकीचा आहे. शिवाय ऋचा १०-८६-१९ ही ऋचा वृषाकपीच्या सूक्तातील असून त्यात इंद्राणी, वृषाकपि व इन्द्र यांचे काल्पनिक भाषण आहे. ते नाट्यकाव्यासारखे आहे. नाट्यकाव्यातील काल्पनिक भाषण खरोखरीच इंद्राचे भाषण समजून डॉ. वऱ्हाडपांडे यांनी वर दर्शविलेला चुकीचा निष्कर्ष काढला आहे व त्यावर दास आणि दस्यू हे चकवे आणि चेटकिणी होते असे हवेत मनोरे बांधले आहेत.

याशिवाय डॉ. वऱ्हाडपांडे यांनी ज्या इतर मुद्यांबद्दल लिहिले आहे ते आर्य आणि दस्यू एकाच मानववंशाचे होते दोघेही काळे होते, वगैरे होय. ते सर्वच चुकीचे आहे. ते दाखविण्यासाठी ज्या थोड्या ऋचा डॉ. वऱ्हाडपांडे यानी उद्धृत केल्या त्याही वरील ऋचांप्रमाणेच अप्रस्तुत आहेत. त्यासंबंधी प्रस्तुत लेखकाने आपल्या लेखमालेत सम्यक् विचार केला आहे. येथे त्याची द्विरुक्ती करण्याचा विचार नाही.

डॉ. वऱ्हाडपांडे यांनी पाश्चात्यांनी टाकून दिलेल्या जुन्या कल्पनांच्या आधारे विशेष विचार न करता जे काही लिहिले ते नुसतेच चुकीचे नाही तर ते ऋग्वेद, भारतीय ज्ञान व भारतीय संस्कृती याना अन्याय करणारे आहे.

अनुक्रमणिका

प्रा. शं. हि. केळशीकर

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय जीवनाची सायंकाळ

आंबेडकरांची लोकप्रियता

१९५१ साली ऑक्टोबर महिन्यात डॉ. आंबेडकर नेहरूमंत्रिमंडळातून, आपल्या पदाचा राजीनामा देऊन, बाहेर पडले; १९५६ साली डिसेंबर महिन्यात ते कालवश झाले. हा पांच वर्षांचा कालखंड त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा शेवटचा टप्पा होता; तसाच तो त्यांच्या राजकीय जीवनाचाही अंतिम अध्याय होता. त्यांच्या राजकीय जीवनाची झपाट्याने निस्तेज होत गेलेली ती सायंकाळ होती. त्यांचे राजकारणातले वर्चस्व या कालखंडात अस्तंगत झाले. भारताच्या राजकारणात १९२७ सालापासून पंचवीसएक वर्षे ते विलक्षण वैभवाने तळपले. पण त्यांचे राजकीय वैभव या शेवटल्या पांच वर्षांत वेगाने ओसरले. देशाच्या राजकारणातला त्यांचा दरारा नामशेष झाला.

अर्थात् अस्पृश्यांचे अनभिषिक्त राजे म्हणून मानाचा मुजरा त्यांना अखेरपर्यंत मिळत गेला. अस्पृश्य जनतेच्या मनावरील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा प्रभाव शेवटपर्यंत कायम राहिला. " उपेक्षित " बांधवांनी त्यांजवर दीर्घ काळ जे अकृत्रिम प्रेम उधळले त्यात कधीही खंड पडला नाही. त्यांच्या दर्शनार्थ येणाऱ्या " बहिष्कृतां "च्या डोळ्यातला भक्तिभाव कधी क्षीण झाला नाही.

त्यांना अस्पृश्य समाजात लाभली तशी लोकप्रियता दुसऱ्या कुणाच दलित जातीय पुढाऱ्यास लाभली नाही. त्यांची अफाट लोकप्रियता, त्यांच्या जीवनाच्या अखेरीस घडलेल्या दोन प्रसंगाचे वेळी उत्कट रीतीने प्रगट झाली. पहिला प्रसंग १९५६ सालच्या ऑक्टोबरातला. नागपूर येथे आंबेडकरांनी जाहीररीतीने बौद्ध धर्माचा स्वीकार केला, त्या समारंभास त्यांचे लक्षावधि जातिबांधव हजर होते; त्या सर्वांनी त्याचवेळी आपल्या पूज्य " बाबासाहेबां "च्या आदेशानुसार हिंदुधर्माचा त्याग करून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. एका व्यक्तीच्या सांगण्यावरून लाखो लोकांनी एकाच दिवशी धर्मांतर केले, यात त्या व्यक्तीची विलक्षण लोकप्रियता आणि जनमानसावरील प्रभुत्व दिसून येते. तसाच दुसरा प्रसंग त्यांच्या महापरिनिर्वाणाचा. धर्मांतराच्या सोहळ्यानंतर अवघ्या दोनच महिन्यात त्यांचे देहावसान झाले. तेव्हा मुंबई येथील त्यांच्या अंत्ययात्रेस दीनदलितांचा जो मानवसागर हेलावला होता त्यानेही आंबेडकरांची लोकप्रियता दग्गोचर झाली.

आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत डॉ. आंबेडकरांची त्यांच्या अनुयायांवरील सत्ता अबाधित राहिली यात शंका नाही. तथापी एकंदर देशाच्या राजकारणावरील त्यांची हुकुमत कायम राहिली नाही, असे म्हणावे लागते. देशाच्या राजकीय रंगमंचावर त्याचे स्थान पूर्वी काहीसे मध्यभागी असे. परंतु १९५१ ते १९५६ च्या कालखंडात ते बाजूला सारले गेले. ते एक हतबल होऊन बसलेली शक्ति (spent force) बनले. देशापुढील राजकीय समस्यांबाबत त्यांच्या मतांना पूर्वीसारखा मान मिळेनासा झाला. राष्ट्राच्या राजकीय घडामोडीत त्यांचे सहकार्य मिळविण्याची धडपड तत्कालीन राज्यकर्ते करीनातसे झाले. त्यांच्या मनात आंबेडकरांविषयी काहीशी बेपर्वाईची वृत्ती बळावली. याला कारण कदाचित तत्कालीन काँग्रेस सत्ताधीशांचे ठिकाणी सत्तालाभापोटी उत्पन्न होणारी मदान्धता असेल; परंतु त्यासोबतच खुद्द आंबेडकरांचे राजकीय धोरण वास्तववादी, तत्कालीन परिस्थितीशी सुसंवादी नव्हते ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

अखेरचे दिवस

देशाच्या राजकारणात आपण अधिकाधिक " उपेक्षित " होत चाललो आहोत, ही जाणीव खुद्द आंबेडकरांनाही होती. भारताच्या राजकारणातले आपले महत्त्व मावळत चालले आहे. दिल्लीचे सत्ताधीश आपणास विचारीनातसे झाले आहेत, ही गोष्ट त्याना उघड दिसत होती. पुन्हा एकदा आपल्या राजकीय मुठीत वज्राघाती सामर्थ्य येण्यासाठी काहीतरी केले

अनुक्रमणिका

पाहिजे, असे त्याना सारखे वाटत होते. परंतु त्याचवेळी त्याचे मन संभ्रमाकुल झालेले होते. त्यांची राजकीय प्रज्ञा गोंधळात पडली होती. आपला राजकीय मार्ग त्याना सुस्पष्ट दिसेनासा झाला होता. यास्तव, देशाची राज्यघटना जाळून टाकली पाहिजे, असे वैतागाचे विचित्र उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. स्वतःच तयार केलेली राज्यघटना ते जाळावयास सिद्ध झाले यावरून त्यांची प्रज्ञा किती बावचळून गेली होती ते दिसून येते. मनःस्थिती अशी विकल झाल्यामुळेच की काय या शेवटच्या दिवसात ते गौतम बुद्धाच्या शांतिप्रद शिकवणुकीकडे अधिकाधिक झुकले असे वाटते.

आयुष्याच्या त्या अखेरच्या कालखंडात, डॉ. आंबेडकरांच्या अंतर्यामी वैफल्याची व नैराश्याची भावना दाटत चालली होती असे मानावयास पुष्कळ पुरावा आहे. त्यांच्या या विमनस्कतेची अनेक कारणे होती. एक म्हणजे त्याची शरीरप्रकृती यावेळी कमालीची नादुरुस्त झाली होती. उतरते वय, मधुमेहाचा विकार, एका जुन्या अपघातात दुखावलेले पाय, निरंतरच्या वाचन लेखनामुळे दुखरे झालेले डोळे, अस्पृश्य बांधवांसाठी केलेली जिवापाड मेहनत इत्यादीमुळे त्याची प्रकृति झपाट्याने खंगत चालली. १९५२ च्या मे महिन्यात लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात: " माझी प्रकृति आहे तशीच आहे. तुम्हा सर्वांना त्याविषयी काळजी लागून राहिली आहे. पण मी माझी काळजी करण्याचे सोडून दिले आहे. आता पुन्हा प्रकृति पूर्ववत् निकोप होईलसे वाटत नाही . . . मी आता अधिक काळ जगणार नाही अशी माझी खात्री झाली आहे. "

या काळात प्रबोधनकार ठाकरे एकदा आंबेडकरांना भेटावयास गेले, तेव्हा त्यांच्या शरीरप्रकृतीची दुर्दशा पाहून ते मनात चांगलेच चरकले. त्यांनी बाबासाहेबांना विचारले. डॉक्टर, तुमचे प्रकृतिमान असे कसे इतक्यातच ढासळले ?" यावर बाबासाहेब उद्गारले" ढांसळले ? ढासळले कसले खलासच झाले आहे सारे. देहाने मी कधीच मेलो आहे समाजाना. फक्त मनाने मी जिवंत आहे. इच्छाशक्तीने जिवंत आहे ... (पण) इच्छाशक्ती किती जरी स्ट्रॉंग असली तरी तिलाही काही लिमिट्स् आहेत ना ! कोणत्या वेळी खट् होईल याचा काय नेम सांगावा ! "

अनुयायांच्या बाबतीत दुःखी

याच मुलाखतीचे वेळी डॉक्टर आंबेडकर ठाकरे याना म्हणाले की " अजून पुष्कळ कामे करायची राहिली आहेत." आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांना आपल्या कार्याचा भार वहावा लागला. शेवटपर्यंत त्यांना आपल्या कार्याची चिंता वहावी लागली. आपल्या कामाचा भार दुसऱ्या कुणावर सोपवून आपण साऱ्या दगदगीतून काहीसे मोकळे होण्याचे सुख त्यांना लाभले नाही असे दिसते. आपल्या पश्चात आपल्या दलितोद्धाराच्या कार्याचे कसे होणार, या विचाराने कधी कधी त्यांचे हृदय पिळवटून निघे. त्यांच्या भोवती बरेच अस्पृश्य कार्यकर्ते होते. परंतु त्यांच्या पश्चात त्यांच्या कार्याची धुरा यशस्वीरीतीने वाहील असा "वारस" त्यांना उगवत्या पिढीत दिसत नव्हता. त्यांच्या अस्पृश्य अनुयायात पुष्कळ शैक्षणिक प्रगति व वैचारिक जागृति झाली होती. परंतु आंबेडकरांप्रमाणे अखिल भारतीय कीर्तीचा व सर्वसामान्य कर्तबगारीचा "उगवता तारा" कोणी नव्हता. या बाबतीत डॉ. आंबेडकरांची स्थिती पंडित जवाहरलाल नेहरूंसारखी झाली होती. "नेहरूंनंतर कोण?" या प्रश्नाचे सुस्पष्ट उत्तर नेहरूंना देता येत नसे. या कारणापायी, आयुष्याच्या अंतापर्यंत " मी काही इतक्या लवकर जात नाही" असे उद्गार ते काढीत राहिले. आंबेडकरांची देखील तीच गत झाली होती. त्यांनाही आपल्या वारसाचा प्रश्न सुटला नाही. नव्या उमेदीच्या तरुण नेत्यांवर आपल्या कार्याचा बोजा सारून आपण निवृत्त व्हायचे हे या दोन लोकोत्तर पुरुषांच्या नशिबी नव्हते असे म्हटले पाहिजे. त्या दोघांनाही आपल्या कार्याचे जूं शेवटपर्यंत आपल्याच शिरावर वहावे लागले. दोघांनाही आयुष्याच्या शेवटच्या दिवसात एकप्रकारचा " एकलेपणा " सोसावा लागला. अपेक्षित योग्यतेचा व कर्तबगारीचा माणूस त्यांना त्यांच्या अनुयायांमध्ये आढळला नाही हा कदाचित त्यांच्या परिस्थितीचाही दोष असू शकेल. अनुरूप पुत्र वा वारस लाभण्याचे सद्भाग्य सर्वच थोर मोठ्या व्यक्तींच्या वाट्यास येत नाही.

आंबेडकरांच्या भोवतीचे कार्यकर्ते कीर्तीने, कर्तृत्वाने वा व्यक्तिमत्त्वाने त्यांच्या तोडीचे नव्हते किंवा त्यांना अपेक्षित असलेल्या उंचीचे नव्हते. त्यातही दुर्दैवाची आणखी एक गोष्ट अशी की त्या कार्यकर्त्यांमध्ये फारसा एकोपाही नव्हता. त्यांच्यात आपापसात बेदिली होती. "मी का तूं" चा वाद माजला होता. अनुयायांमधल्या दुहीमुळे आंबेडकर साहजिकच व्यथित होत. त्यांना दुहीच्या विनाशकारी मार्गापासून परावृत्त करण्यासाठी ते त्यांना एकत्र बोलावून, "तुम्ही आपापसात भांडू नका. एकजुटीने वागा" असा उपदेश करीत. याच उद्देशाने भरविलेल्या एका मेळाव्यात स्वतः आंबेडकर अत्यंत भावनाविवश झाले. अक्षरशः कंठ दाटून येऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. पांच मिनिटे त्यांच्या ओठातून शब्द फुटला नाही. ते "ओक्साबोक्सी रडले."

अनुयायांमध्ये खेदजनक बेबनाव होता. त्यात भरीतभर म्हणून आणखी एक आपत्ति आंबेडकरांवर कोसळली. त्यांचे त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांशी बिनसले. त्यांच्या हाताखाली ज्यांनी वर्षानुवर्षे काम केले ते कमलाकांत चित्रे यांच्यासारखे त्यांचे सहकारी याच काळात त्यांच्यापासून दुरावले. जुने आधारस्तंभ ढासळले. आंबेडकरांचा एकाकीपणा अधिक दुणावला. जुन्या सहकाऱ्यांना दूर सारण्याचा प्रसंग मनस्वी मनस्तापदायक असतो. या दुःसह मनस्तापात त्यांचे अखेरचे दिवस जात होते.

वैयक्तिक अपयश

भारताची राज्यघटना बनविण्याचे महत्कार्य करूनदेखील अस्पृश्यतेचा शाप आपणास बाधत आहे, छळत आहे अशी त्यांना तीव्रतर जाणीव होऊ लागली. हिंदूंच्या विषम समाजरचनेपायी आपणास नाहक अपमान सोसावे लागतात; जन्मजात अस्पृश्यतेपायी आपल्या मार्गात अनपेक्षित अडचणी उत्पन्न होऊन, आपल्या कर्तृत्वाचा भंग होतो ही त्यांची क्लेशकारक धारणा या काळात अधिकच बळावली. नेहरूमंत्रिमंडळातून त्यांना ज्या कारणापायी बाहेर पडावे लागले त्यामुळे त्यांच्या मनातला प्रसुप्त कडवटपणा पुनश्च जागा झाला. मंत्रिमंडळात असताना आपल्या कर्तबगारीचा आणि शासकीय अनुभवाचा अधिकाधिक उपयोग केला जाईल अशी त्यांची अपेक्षा होती, पण ती फलद्रूप झाली नाही. राष्ट्रीय नियोजनाचे खाते आपल्याकडे सोपविले जाईल असे त्यांना वाटत होते, परंतु ते त्यांना देण्यात आले नाही. अधूनमधून खात्याची फेरवाटणी होई. परंतु त्यांच्या वाट्यास नवे शासकीय महत्त्वाचे खाते काही आले नाही. त्यांनी हिंदू कोड बिलाची पुनर्रचना करून ते लोकसभेत मांडले. परंतु त्या बिलाच्या चिंधड्या उडविल्या गेल्या. पंतप्रधानांनी त्या बिलासंबंधाने दिलेली आश्वासने धुळीला मिळाली. आपण जन्माने अस्पृश्य, हीनप्रतीचे ठरलो म्हणून आपल्या या मौलिक बिलाची दुर्दशा झाली या जाणीवेने त्यांच्या मनास अत्यंत अस्वस्थ केले.

१९५२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीनी आंबेडकरांना जोराचा धक्का दिला. त्या निवडणुकीत त्यांचा आणि त्यांच्या शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशन पक्षाचा पराजय झाला. ज्या राज्यघटनेनुसार त्या सार्वत्रिक निवडणुकी घेण्यात आल्या, त्या घटनेचे डॉ. आंबेडकर हे प्रमुख शिल्पकार होते. आणि तरीही त्यांचा सार्वत्रिक निवडणुकीत पराभव झाला, ही घटना मोठी विलक्षणच होय. तिने आंबेडकरांना दिङ्मूढ केले. पुढे लवकरच त्यांना राज्यसभेत जागा मिळाली खरी परंतु लोकमताच्या बळावर लोकसभेत निवडून येण्याची त्यांच्यासारख्या लोकाग्रणीची नैसर्गिक इच्छा सफल झाली नाही. शिवाय त्यांच्या राजकीय पक्षाचे बहुतेक सगळे उमेदवार त्या निवडणुकीत पडल्याकारणाने ते साहजिकच विचाराक्रान्त झाले. शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशन पक्ष यापुढे अस्तित्वात ठेवावा की ठेवू नये याविषयी त्यांच्या मनात खल होऊ लागला. पुणे कराराने अस्पृश्यावर संयुक्त मतदार संघ लादलेला होता; आणि संयुक्त मतदार संघात अस्पृश्य हे अल्पसंख्य असल्याकारणाने शे. का. फे. पक्षाच्या उमेदवारांना निवडणुकीत यशस्वी होण्याची शक्यताच नाही, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली. यास्तव आपला शे. का. फे. पक्ष बरखास्त करणेच योग्य होय, असे आंबेडकरांना वाटू लागले. एकंदरीत आपले आणि आपल्या राजकीय पक्षाचे भवितव्य काय, हा प्रश्न त्यांना सतावू लागला. निवडणुकीतल्या पराजयाने काळवंडलेल्या त्या दिवसात, "आता पुढे काय?" असा प्रश्न काही कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांना विचारला. तेव्हा ते उद्गारले "माझ्या डोळ्यापुढे या घटकेला अंधार आहे."

अनुक्रमणिका

पुन्हा एकदा आंबेडकरांचे विचारचक्र अस्पृश्यतेच्या, सामाजिक विषमतेच्या, मूलभूत समस्येभोवती भ्रमण करू लागले. " अस्पृश्य बांधवांची सामाजिक गुलामगिरी अजूनही संपलेली नाही : त्यांची छळणूक अजूनही थांबलेली नाही. या दुष्ट, अन्यायकारी अस्पृश्यतेला पोसणाऱ्या प्रवृत्ती सत्ताधारी कॉंग्रेसमध्ये आणि एकंदर देशामध्ये अजूनही प्रबलतर आहेत. अत्युच्च-विद्याभूषित कर्तबगार व्यक्तीची देखील या अस्पृश्यतेपायी कुचंबणा होते तिथे इतरांचे हाल काय पुसावेत ? विशेषतः खेड्यातल्या अस्पृश्यांच्या दुःखास सीमाच नाही. मानवतेच्या हरघडी बळी घेणाऱ्या या क्रूर अस्पृश्यतेचा विध्वंस करावा तरी कसा ? " हा कूट प्रश्न पुन्हा त्यांच्या मनात घोळू लागला.

डॉ. आंबेडकरांची मनःस्थिती या काळात विकल झाली होती. याचा प्रत्यय एकदा राज्यसभेच्या बैठकीत आला. ते आंध्र राज्य बिलावर भाषण करीत होते. आपल्या भाषणात त्यानी कॉंग्रेस सरकारवर टीकास्त्र धरले यात काही नवल नव्हते. पण बोलण्याच्या आवेशात ते स्वरचित राज्यघटनेवर देखील प्रहार करू लागले; तेव्हा काही सभासदानी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणला. त्यासरशी ते चिडले आणि तोल गेल्यागत बोलू लागले. " मुंबई राज्यात अस्पृश्यांना मिळते तशा प्रकारची वागणूक जर त्यांना यापुढेही मिळत राहिली तर–मला प्रांतीयवादी व्हायचे नाही. भविष्यात अखेर काय होईल ते मला माहीत नाही. स्वतःला महाराष्ट्रीय म्हणवून घेणे देखील मला आवडत नाही. मला हिंदी भाषा आवडते. परंतु हिंदी भाषिक लोकच हिंदीचे दुश्मन आहेत हीच मुख्य अडचण आहे. " हे उद्गार सर्वस्वी असंबद्ध होते. त्यांचे भाषण मुद्द्यास सोडून होत आहे या गोष्टीची त्याना सभापतींनी जाणीव करून दिली. डॉ. आंबेडकरांच्या बाबतीत असा प्रकार होणे ही मोठी आश्चर्याचीच गोष्ट होय; कारण ते नाणावलेले संसदीय वक्ते होते. त्यांची भाषणे नेहमी सुस्पष्ट, मुद्देसूद, आणि परिणामकारक होत. परंतु त्यादिवशी मात्र विपरीत प्रकार घडला. राज्यसभेतल्या त्या असंबद्ध उद्गारांनी त्यांच्या तत्कालीन मनःस्थितीवर प्रकाश पडतो.

वैफल्याची कारणमीमांसा

एकूण पहाता, आंबेडकरांच्या राजकीय जीवनात त्या शेवटच्या दिवसात वैफल्य आले होते असे म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या अंतर्यामी नैराश्य आणि डोळ्यापुढे काळोख होता. त्यांची राज्यशास्त्रीय प्रज्ञा अगतिक झाली होती आणि भारतीय राज्यकारणावरील त्यांची पकड ढिली झाली होती. या अपेशाचे मूळ कोणते ? त्यांच्या राजकीय वर्चस्वास अशी ओहोटी का लागली ? १९४८-४९ साली त्यानी भारताची राज्यघटना बनवून, तीत ' कायद्याने अस्पृश्यता नष्ट होत आहे ' असे कलम घालून, यशाचे अत्युच्च शिखर गाठले. परंतु त्यानंतर अवघ्या तीन चार वर्षांच्या कालावधीतच त्यांच्यावर अंधारात चाचपडत रहाण्याची पाळी आली हे का व कसे घडले ?

याचे एक प्रमुख कारण असे की, आंबेडकरांच्या राजकीय चळवळीला जातीयतेचे स्वरूप प्राप्त झाले होते. ते स्वरूप स्वातंत्र्योत्तर काळातही त्यानी तसेच राहू दिले, ही ऐतिहासिक दृष्टीला सुस्पष्ट दिसणारी गफलत त्यांचे हातून घडली. काळ बदलत होता. देशातले राजकीय वातावरण पालटले होते. परंतु आंबेडकरांनी आपल्या चळवळीचे स्वरूप बदलले नाही हेच त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या दिवसातील राजकीय अपेशाचे मुख्य कारण होय.

त्यांचे सारे राजकारण अस्पृश्यांच्या उद्धारासाठी रचलेले होते. त्यांच्या सगळया राजकीय धडपडींचे ध्येय एकच होते. ते म्हणजे वर्गीकृत जनतेची उन्नती घडवून आणणे. या ध्येयाप्रीत्यर्थ त्यानी दोन–अडीच तपे अहोरात्र परिश्रम घेतले. परंतु त्यांची ही राजकीय आघाडीवरील अस्पृश्योद्धाराची चळवळ, एकंदर देशाच्या तत्कालीन राजकारणात, संकुचित आणि जातीयवादी भासत होती. अस्पृश्यांचे राजकीय हक्क मिळविण्यासाठी आंबेडकरांना कॉंग्रेसविरोधी भूमिका घ्यावी लागली. कॉंग्रेसने त्यावेळी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशाच्या स्वातंत्र्याचा संग्राम चालविला होता. त्या संग्रामाला आंबेडकरांची चळवळ पूरक वा पोषक ठरत नव्हती. उलट कॉंग्रेसने चालविलेली चळवळ आणि आंबेडकरांची चळवळ परस्परविरुद्ध दिशेने जात असलेल्या दिसत होत्या. उदा.

अनुक्रमणिका

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात काँग्रेसने ब्रिटीश सरकारशी असहकार पुकारला तेव्हा आंबेडकरांनी त्या सरकारशी सहकार्य केले. १९४२ मध्ये "चले जाव" ची घोषणा करून काँग्रेसने तुरुंगवास पत्करला. तेव्हा आंबेडकर व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे सभासद म्हणून वावरत होते. यायोगे आंबेडकरांचे धोरण व्यापक राष्ट्रीय स्वरूपाचे भासत नव्हते. मुस्लिम लीगने केवळ मुसलमानांच्या हितासाठी ज्या प्रकारची चळवळ चालविली होती. किंवा हिंदु महासभेने केवळ हिंदूंच्या कल्याणासाठी ज्याप्रकारची चळवळ चालविली होती तशाच स्वरूपाची डॉ. आंबेडकरांनी केवळ अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी चालविलेली चळवळ भासत होती. या तिन्ही चळवळींची भूमिका जातीय असल्याचे तत्कालीनांना वाटत होते.

जातीयवादाने या देशाचे अतोनात अकल्याण केले. जनतेत दुही माजविली व परस्परविद्वेषाच्या ठिणग्या उडविल्या. विशेषतः मुसलमानांचा जातीयवाद भलत्याच थरास पोहोचला व या देशास भयंकर भोवला. त्याने जागोजाग दंगेधोपे माजविले. निरपराध जीवांच्या रक्ताचे पाट वाहविले, लक्षावधी लोकांचे जीवन उध्वस्त केले. या जातीयवादामुळेच परकीयांची सत्ता या देशात अधिक काळ टिकली व स्वातंत्र्यप्राप्तीस विलंब लागला. या कारणांपायी, स्वातंत्र्योत्तर काळात जातीयवादाला जितक्या लवकर मूठमाती देता येईल तितके बरे, असे समंजस भारतीयांना वाटू लागले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरी देशाचे राजकारण जातीयतेपासून मुक्त होऊ दे अशीच बहुसंख्य भारतीयांची मनोमन प्रार्थना चालली होती. शिवाय पाकिस्तानी भस्मासुराने प्रलयंकारी अनर्थाचा डोंब उडविला त्यात अनेक जीव भस्मसात झाले. जे वाचले ते भणंगभिकारी होऊन आश्रयासाठी या देशात आले. या निर्वासितांच्या पुनर्वसनाचा यक्षप्रश्न अनपेक्षितरीत्या राष्ट्रापुढे उभा राहिला.

जातीयवादाचे असे महाभयंकर दुष्परिणाम दिसून आल्याकारणाने १९५२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनतेने जातीय पक्षाविरुद्ध आपला कौल दिला. एकंदर लोकमत जातीयवादाविरुद्ध बनले होते. यामुळे आंबेडकरांच्या जातीय वाटणाऱ्या राजकारणाविषयी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात, भारतीय जनतेला सहानुभूति वाटेनाशी झाली.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या काळात, भारतीय राजकारणात आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धारक चळवळीला महत्त्व प्राप्त झाले होते, त्यास बरीच कारणे होती. एकतर राजकारणात अस्पृश्यांचा प्रश्न नवा होता. शिवाय आंबेडकरांनी ज्या तडफेने तो प्रश्न मांडला ती तडफ परिणामकारक होती. साहजिकच त्या प्रश्नाकडे तत्कालीन राजकारणी लोकांचे लक्ष वेधले. महात्मा गांधींसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनी त्या प्रश्नाचे गांभीर्य ओळखले; आणि अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यास आपल्या चळवळीत योग्य ते स्थान दिले. तसेच राजकारणाच्या संदर्भात अस्पृश्यांच्या प्रश्नाला अल्पसंख्याकांची समस्या असे स्वरूप प्राप्त झाले. आणि त्या प्रश्नाची मुसलमानांच्या तत्सम प्रश्नाशी सांगड घातली गेली. या योगे अस्पृश्यांच्या प्रश्नास मोठेच महत्त्व प्राप्त झाले. जेव्हा जेव्हा अल्पसंख्याकांची समस्या म्हणून मुसलमानांचा प्रश्न पुढे येई तेव्हा तेव्हा अस्पृश्यांच्या प्रश्नाचेही घोडे पुढे दामटता येई. शिवाय ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आपल्या सोईसाठी अल्पसंख्याक समस्येचे गांभीर्य जाणूनबुजून वाढविले होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आवश्यक असलेली दृष्टी

परंतु ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या प्रयाणानंतर परिस्थिती पालटली. अल्पसंख्याकांच्या समस्येमुळे अखेर देशाची शकले झाली. यास्तव यापुढे या समस्येस अवास्तव महत्त्व द्यावयाचे नाही असे भारतीय मुत्सद्यांनी ठरविले. ब्रिटीशांचा साम्राज्यवाद नष्ट झाल्यावर या देशात संसदीय लोकशाहीची प्रतिष्ठापना करावयाची व या लोकशाहीच्या मार्गाने अल्पसंख्याकांची समस्या सुटेल तशी सोडवीत जायचे असे राजकारणी लोकांनी ठरविले. झपाट्याने बदलणाऱ्या काळाबरोबर लोकशाहीचेस्वरूपच बदलत जाणार आहे आणि त्यासोबत अल्पसंख्याकांची समस्याही सुटत जाईल, अशी त्यांची अपेक्षा होती. आणखी एक महत्त्वाची बाब अशी की, अल्पसंख्याकांच्या समस्येपेक्षाही अधिक मोठाले व तातडीचे प्रश्न त्यावेळी देशापुढे उभे होते. एकंदर भारतीय जनतेचे दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, दुष्काळ,

महापूर, औद्योगिक मागासलेपणा इत्यादि प्रश्न अत्यंत निकडीचे होते. ते प्रथम हाती घेऊन पंचवार्षिक योजनाद्वारे सोडविण्याच्या प्रयत्नास लागले पाहिजे असे तत्कालीन राष्ट्रीय पुढाऱ्यास् वाटत होते. शिवाय निर्वासितांच्या पुनर्वसनाचा बिकट प्रश्न उपस्थित झालेला होता. त्याकडे अधिक लक्ष पुरविणे भाग होते. त्याचप्रमाणे इतर राष्ट्रांशी राजनैतिक संबंध जोडून आपल्या राष्ट्रास आंतरराष्ट्रीय राजकारणात योग्य ते मानाचे स्थान मिळविणे आवश्यक होते. अशा विविध कारणापायी आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धारक चळवळीला भारतीय राजकारणात महत्त्व मिळेनासे झाले. त्यांच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करण्याचे भारतीय राज्यकर्त्यांनी ठरविले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशातील राजकीय परिस्थिती अशी बदलली होती. या बदललेल्या परिस्थितीला साजेशी नवी प्रभावी भूमिका डॉ. आंबेडकरानी घेणे आवश्यक होते. असे करण्यातच त्यांचे राजकीय स्थैर्य व हित होते. स्वातंत्र्यप्राप्तीमुळे, पाकिस्तानी रक्तपातामुळे आणि नव्या लोकशाहीनिष्ठ राज्यघटनेमुळे आपला देश जेव्हा सुसंघटित झालेला होता तेव्हा एकंदर भारतीय जनतेला रुचेल असे काहीतरी त्यानी करावयास पाहिजे होते. त्यांच्या धोरणात जर बदल झाला असता आणि त्यांच्या राजकीय कायक्रमास जर व्यापक स्वरूप आले असते तर त्यांच्या राजकीय वर्चस्वास धक्का पोहोचला नसता. इतकेच नव्हे तर एकंदर देशाच्या राजकारणालादेखील एक निराळे वळण लागले असते. भारताचा राजकीय इतिहास निराळ्या शब्दात लिहावा लागला असता.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची आंबेडकरांची चळवळ अस्पृश्योद्धारापुरती मर्यादित होती; तिच्यात जर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परिवर्तन घडले असते तर फार बरे झाले असते. या परिवर्तनाची एक दिशा सुस्पष्ट होती. आणि आंबेडकरांसारख्या विचारवंतास ती ज्ञात नव्हती असे म्हणता येणार नाही. अस्पृश्यांचा प्रश्न हा बहुरंगी प्रश्न आहे. त्यास अनेक बाजू आहेत. त्या पैकी एक अत्यंत महत्त्वाची बाजू म्हणजे आर्थिक बाजू होय. या आर्थिक बाबीवर अधिक लक्ष केंद्रित करून अस्पृश्यांच्या प्रश्नाची मजूर व शेतकरी यांच्या प्रश्नाशी सांगड घालणे, आंबेडकरांना अशक्य नव्हते. असा व्यापक आर्थिक कार्यक्रम जर त्यांनी हाती घेतला असता तर नवराष्ट्र उभारणीच्या कार्यात इतर राष्ट्रीय नेत्यांशी सक्रिय सहकार्य करणे त्यास सुलभ झाले असते. परंतु बदललेल्या राजकीय वातावरणास अनुरूप असे धोरण त्यांनी स्वीकारले नाही; आणि यायोगे आपला राजकीय विनाश आपल्या हाती ओढवून घेतला.

अस्पृश्यांच्या प्रश्नाची मजूरांच्या प्रश्नाशी तोंडमिळवणी करणे ही गोष्ट आंबेडकरांना अपरिचित नव्हती. त्यानी स्वतः १९३७ साली आपला पहिला राजकीय पक्ष स्थापन केला, त्याचे नाव "स्वतंत्र मजूर पक्ष" असे ठेवले. या पक्षाचा कार्यक्रम जाहीर करतेवेळी ते म्हणाले: "आजचे युग जातीयवादी पक्षाच्या संघटनेसाठी नाही हे जाणून . . . पक्षाचे नाव व पक्षाचा कार्यक्रम याला व्यापक स्वरूप दिले आहे." हेच उद्गार आंबेडकरांच्या तोंडून १९४७–४८ साली किंवा भारताची नवी राज्यघटना कार्यवाहीत आल्यानंतर तरी, निघाले असते, तर ते किती मोलाचे ठरले असते ! देशाच्या राजकारणात जातीय पक्षांना स्थान नाही हे तत्त्व त्यांच्या राजकीय प्रज्ञेला स्वातंत्र्यपूर्व काळात सुचले होते तसे स्वातंत्र्योत्तर काळात का सुचले नाही न कळे. ब्रिटीश राजवट या देशात असताना जर जातीय पक्षाची निर्मिती अयोग्य होती तर तसल्या पक्षाचे अस्तित्व, ती राजवट नष्ट झाल्यानंतर अधिक तर गैर होय, हा सुविचार त्याना वेळीच सुचला नाही हे मोठे दुर्भाग्य होय. १९५२ सालच्या निवडणुकीत प्रचंड पराभव झाल्यानंतर मात्र हा सुविचार त्यांच्या मनात जागृत झाला. त्याना तेव्हा कळून चुकले की त्यांच्या शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशनला देशाच्या राजकारणात स्थान नाही. म्हणून हा पक्ष विसर्जित करून त्याऐवजी नवा "रिपब्लिकन पार्टी" नावाचा पक्ष स्थापन करण्याचे विचार १९५५–५६ साली त्यांच्या मनात घोळू लागले. त्या दिशेने त्यानी पाऊलेही टाकली. परंतु हे सारे फार उशीरा घडले. तोपर्यंत त्यांच्या राजकीय प्रतिष्ठेला तडे जाऊन ती भग्नावशेष देखील झाली.

आपल्या देशात स्वातंत्र्यापाठोपाठ संसदीय लोकशाही आली खरी; परंतु या लोकशाहीच्या सुस्थिती-

अनुक्रमणिका

साठी आणि निकोप वाढीसाठी बलवान विरोधी पक्षाची अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट आंबेडकराना माहीत होती. ते स्वतः ही गोष्ट आवर्जून सांगत असत. तथापि असा राष्ट्रव्यापी विरोधी पक्ष स्थापन करण्याच्या दिशेने त्यानी प्रयत्न केल्याचे दिसत नाही. असा विरोधी पक्ष येथे आपोआपच परिस्थितीच्या दडपणाखाली निर्माण होईल, अशी कदाचित् त्यांची अटकळ असावी. सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष आणि परिस्थितीने उभारलेला विरोधी पक्ष या दोघांच्या द्वंद्वात आपल्या अस्पृश्यांच्या पक्षाचे एक विशिष्ट स्थान, राहील. त्या दोघामध्ये "समतोल राखणारा" तिसरा पक्ष म्हणून आपला शे. का. फे. पक्ष वावरू शकेल, अशी त्यांनी मनात योजना करून ठेवली असावी. परंतु राजकारणाचे रागरंग त्यांच्या अपेक्षेप्रमाणे उलगडत गेले नाहीत. त्यांना अपेक्षित असलेला विरोधी पक्ष त्याच्या हयातीत वा त्यांच्या पश्चात उदयास आला नाही आणि त्यानी संकल्पिलेला "रिपब्लिकन पक्ष" जरी त्यांच्या मृत्यूनंतर अस्तित्वात आला तरी तो पक्ष आज अंतस्थ दुफळीने दुभंगलेला आहे. डॉक्टर आंबेडकरांच्या काळी कॉंग्रेसला तुल्यबल होईल असा राष्ट्रव्यापी विरोधी पक्ष स्थापन करावयास आताचे पेक्षा अधिक अनुकूल परिस्थिती होती. तसा एकादा विरोधी पक्ष स्थापन करण्याचे कामी आंबेडकरांचा हातभार लागला असता तर एकंदर देशाचे कितीतरी कल्याण झाले असते. परंतु देशाच्या या अत्यावश्यक गरजेकडे त्यांनी विशेष लक्ष पुरविले नाही ही खेदाची गोष्ट होय. त्याऐवजी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसात त्यांनी आपली शक्ती धर्मांतराच्या कामी लावली. आपल्या असंख्य अनुयायांसह त्यांनी धर्मांतर केले; परंतु त्याने देशाच्या राजकारणाचा काही लाभ झाला नाही किंवा आंबेडकरांची स्वतःची राजकीय प्रतिष्ठाही उजळली नाही.

❀ मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारें महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणें, हें या मासिकाचें ध्येय व उद्दिष्ट आहे.

❀ या मासिकांत येणाऱ्या लेखांत कोणत्याहि विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतु नाहीं.

❀ मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणांत सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

अनुक्रमणिका

प्रा. न. र. फाटक

श्रीशिवछत्रपति

संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने.

[लेखक—त्र्यंबक शंकर शेजवलकर; प्रकाशक—मराठा मंदिर लिमिटेड किं. ३० रु० पृष्ठसंख्या ६५० खर्च ६०००० रुपये]

महाराष्ट्रातील बऱ्या बोलबाल्याचे एक इतिहास-व्यासंगी कै. त्र्यंबक शंकर शेजवलकर यानी आपल्या आयुष्याच्या उतरत्या काळात मुंबईतील मराठा मंदिर संस्थेच्या संकल्पित श्री शिवछत्रपतींच्या लेखनाचे काम स्वीकारले (१९५९). व ते एक राष्ट्रीय कार्य या भावनेने त्याच्या सिद्धीकडे शेजवलकर वळले. दोन हजारावर पानांचे मराठीत गद्य शिवभारत रचण्याची त्यांची आकांक्षा होती, परंतु काम सुरू केले तेव्हा त्यांची प्रकृति धड नव्हती व प्रत्यक्ष काम करताना ती जास्त बिघडून काम रखडले. ते त्यांच्या हातून संपूर्ण व्हावे असा नियतियोग नसल्याने पूर्वतयारीची विस्तीर्ण टिपणे, लिहून झालेली सात तुरळक प्रकरणे, प्रस्तावनेची ९८ पाने (ही पृष्ठसंख्या प्रस्तावनेच्या अपूर्णत्वाची दर्शक आहे तथापि प्रस्तावना वाचल्यावर ती अपूर्ण राहिली हे बरे झाले असे म्हणत वाचक समाधानाचा सुस्कारा टाकील अशी तिची रचना आहे.) खेरीज शिवचरित्राविषयी मागील तीस वर्षांत लिहिलेले मराठी इंग्रजी छोटे मोठे निबंध, वगैरे साहित्य एकत्र करून मराठा मंदिराने हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. ग्रंथाची छपाई श्री. भागवतांच्या मौज प्रिंटिंग ब्यूरोची, म्हणून तिच्या सौंदर्याबद्दल निराळे वर्णन करण्याची गरज नाही. प्रस्तुत शेजवलकरग्रंथाचा बहिरंग परिचय येथेच थांबवून दुसरीकडे वळणे बरे.

कै. गो. स. सरदेसाई यांच्या बाळाजी बाजीराव पेशवे चरित्राला प्रस्तावना लिहून शेजवलकर सुमारे चाळीस वर्षामागे इतिहासप्रेमी जनतेच्या परिचयात ठळकपणे आले. शेजवलकरांनी मराठेशाहीच्या इतिहासाचा अभ्यास करून कित्येक विचित्र ग्रहांना आपल्या अहंविशिष्ट अंतरंगात कायमचा आश्रय दिला होता, व त्यातल्या मुख्य ग्रहांचा आविष्कार या मराठामंदिराच्या ग्रंथात भरपूर झालेला आहे. हिंदु, त्यात ब्राह्मण यांच्याबद्दल अवहेलनेची भावना ही ग्रहबाधा सर्वत्र डोकावते आहे. श्री शिवछत्रपतींच्या चरित्राची व कर्तृत्वाची अद्वितीयता हा त्यांचा ग्रह वादातीत आहे. पेशवाईबद्दलची शेजवलकरांची तीव्र प्रतिकूलता ही वादातीत नाही. शेजवलकरांची प्रतिकूलता केवळ ऐतिहासिक वस्तुस्थितीवर आधारलेली नसून तिच्यात इतिहासबाह्य भावनांचे मिश्रण आहे. म. गांधी, पं. नेहरू व चालू स्वराज्यकर्ते यांविषयी शेजवलकरांच्या ठिकाणी अप्रीति वसत असल्याची प्रमाणे प्रस्थावनेत अनेक स्थळी दृष्टीस पडतात. शिवाजी महाराजांबद्दल शेजवलकरांची श्रद्धा आहे, परंतु ती शुद्ध सत्त्वगुणाची आहे का तिच्यात सत्त्वेतर गुणांचा प्रभाव आहे, अशा संशयाला जागा सापडण्याजोगे तिचे स्वरूप आहे. ते स्वरूप प्रस्तुत लेखनाच्या ओघात पुढे स्पष्ट होईल.

शेजवलकर हे बहुपाठी (वाचक) होते, त्यांची बुद्धि अगदीच सुमार नव्हती; वाचनातून योग्य तात्पर्य काढण्याइतका झटकेवजा विवेक त्यांच्यामध्ये होता, याची साक्ष पटविणारा काही भाग त्यांच्या या कथावजा ग्रंथात इतस्ततः आढळतो; विवेक हा त्यांच्या स्वभावाचा स्थायी घटक नव्हता. यामुळे तो सर्वत्र सारखा दिसत नाही. हा प्रकार त्यांच्या पूर्वीच्या लहान लहान लेखप्रबंधादिकातून जसा प्रत्ययास येतो तसा तो मराठामंदिरासाठी लिहीत असलेल्या ग्रंथातूनही येतो.

प्रस्तावना बहुजिनसी पोतडी

येथे शेजवलकरांच्या प्रस्तावनेचा परामर्श करावयाचा आहे. जेथे अवश्य वाटेल तेथे त्यांच्या संकल्पित शिवचरित्रासाठी लिहिलेल्या प्रकरणांचा निर्देश केला जाईल. त्यांची प्रस्तावना ही एक बहुजिनसी पोतडी

अनुक्रमणिका

आहे. शिवछत्रपतींचे चरित्र लिहायचे म्हणजे तत्कालीन मुसलमान, पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच व डच यांचा विचार अपरिहार्य होता. तत्कालीन धर्मपंथांना शिवचरित्राच्या उभारणीत दृष्टीआड करून चालणारे नव्हते, शिवचरित्र जेथे घडले त्या महाराष्ट्र देशाची रचना कशी हे सांगितलेच पाहिजे (प्रस्तावनेत महाराष्ट्राच्या भूरचनेचे फारसे वर्णन नाही) शिवछत्रपति उदयास येण्यापूर्वीची सर्व महाराष्ट्रातील -विशेषतः मावळात लोकस्थिति कशी होती, या प्रश्नाचे उत्तर देणे त्यांना प्राप्तच होते, याप्रमाणे आपल्या लघुग्रंथप्राय दीर्घ प्रस्तावनेत शेजवलकरांनी हवे ते व नको तेसुद्धा विषय एकत्र गुंतवले आहेत. येथे एकदम वाचकांच्या निदर्शनास आणणे बरे की सदर प्रस्तावनेतील तात्त्विक विचारावर न्यायमूर्ति रानड्यांच्या पुस्तकातील विचारसरणीची दाट छाया आहे. आपण स्वयंप्रज्ञ व इतर कुणाच्याशीही सहसा न जुळणाऱ्या स्वतंत्र विचाराचे आहो, अशा कल्पनेच्या अंतर्गंड ग्रस्ताने त्या पूर्वसूरीच्या ऋणाचा निर्देश टाळून आपल्या विद्वच्चरित्राची शोभा संभाळू नये तर काय करावे? यामुळे फक्त संतकार्यविवेचनात रानड्यांचे नाव मधूनमधून वाचकाच्या नजरेखालून जाते.

प्रस्तावनेच्या प्रारंभी शिवछत्रपतींच्या उदयापूर्वीची काळमर्यादा किती स्वीकारावी, चिरप्रभावी मानवस्थित्यंतरे आकस्मिक नसतात, त्या तत्कालीन लोकस्थितीवर अवलंबून असतात, इस्लामचे व खिस्त्याचे भारतात येणे आणि वागणे, नंतर एकदम शिवछत्रपतींचा गुणानुवाद, दंडकारण्य, कोंकण, अपरान्त, आजचे मावळ कोंकण प्राचीन काळी एकच होते, इ. सनाच्या चौथ्या शतकात 'महाराष्ट्र' शब्दाचा उल्लेख, वैदिक धर्माच्या व संस्कृत भाषेच्या लोकांचा प्रसार, मगधातले आर्य दक्षिणेत आले, रामाचा प्रवास, अश्मक, शूर्पारक, बौद्धांच्या वसाहती, महाराष्ट्राची संमिश्र संस्कृति, अजिंठ्याच्या चित्रातील इराणी, मुसलमानांच्या वसाहतींचे धार्मिक स्वातंत्र्य, महाराष्ट्रातील प्राचीन राज्ये, दक्षिण महाराष्ट्रावर कर्नाटक गुजरातचा परिणाम, याप्रमाणे विहंगावलोकन कुठे संक्षेपाने तर कुठे विस्ताराने उरकीत ८ व्या पानापासून नव्या विषयास हात घालतात. महानुभाव, ज्ञानेश्वर, एकनाथ यावर दृष्टिक्षेप करून तुकारामापर्यंत येताच त्यांची त्रेधा उडाली. त्याला श्रद्धाळू किंवा भ्रमिष्ट म्हणता येत नाही. शिक्षण केवळ व्यक्तिगत, राहाणे खेडेगावी, त्यात अल्पायुषी पण अशिक्षित मानण्याची सोय नाही, असे तरकटत शेजवलकर केशवचैतन्याला शिवून तुकारामाच्या स्तुतीस प्रवृत्त झाले आहेत. महानुभाव, एकनाथ किंबहुना रामदासदेखील विचारसरणी व लेखनपद्धति या संबंधात अंशतः मुसलमानी छापाचे होते असा शेजवलकरांचा अभिप्राय आहे. (पान ८ आणि १०)

यापुढे पोर्तुगीजांचा विषय आहे. पोर्तुगीज हे पुष्कळशा व्यवहारात मुसलमानांच्या पुढे होते, असे सांगून पोर्तुगीजांनी कोकणात फळे, कंद वगैरे पदार्थ आणले, किंवा येथून जगभर फैलावले, त्यावरून पोर्तुगीजांची स्तुति गातात. नव्या वस्तु जीवन बदलून टाकतात हे ह्या स्तुतिपाठाचे मुख्य सूत्र आहे. पुढे पोर्तुगीजांना सोडून महाराष्ट्राची व्यापारी बंदरे व मुसलमान यांची पाहाणी शेजवलकरांनी साधली आहे. एखाद्या देशावर स्वारी करून तेथील राजांना लढाईत झोडपले म्हणून तेथे आक्रमकांचे राज्य स्थापन झाले असे समजणे चुकीचे वगैरे आशय सदर विवेचनात आहे. नंतर किल्ल्यावरून राज्य करणे, मराठ्यांचे क्षत्रियत्व, याचा ऊहापोह आहे. बहामनी राज्याने मराठ्यांची दक्षिणेकडे दृष्टी वळली. त्यादृष्टीला विजयनगरचे राज्य उपकारक होते; या राज्याचा कोकणी ब्राह्मणावर ठसा, इत्यादि विचार निवेदून शेजवलकरांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्यप्रेमाचे पुरावे नमूद केले आहेत. हे स्वातंत्र्यप्रेम आपसातील मारामाऱ्यामध्ये दिसणारे होते, म्हणून तशी उदाहरणे सांगण्यात आली आहेत. या वर्णनाच्या ओघात शेजवलकरांनी 'हिंदूंची जुनाट युद्धपद्धती'ची कथा असंबद्धपणे सोडून दिली आहे (पान १७-१८). मुसलमानांच्या वरचढ संसर्गामुळे मराठा समाजात झालेले फरक, मुसलमानांचे घोडे, गोलंदाज, मुसलमानी राज्यातले परदेशी वजीर, दक्षिणी (बाटग्या) व परदेशी मुसलमानांचे वैर; महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे दक्षिणोत्तर (विजयनगर आणि काशी प्रयाग) स्थलांतर, त्यांनी दक्षिणेत आणलेले महत्त्वाचे दुर्मिळ संस्कृत ग्रंथ, मुसलमानांचे नौकानयन, त्यांची शस्त्रास्त्रे व पोर्तुगीजाचे आरमार आणि शस्त्रास्त्रे, शिवाजीचे आरमार, छापखाने व छापील पुस्तके, शस्त्रास्त्रासंबंधातील आत्मघातकी परावलंबित्व, हिंदूंचे जीर्णोद्धार प्रेम आणि

मालमत्तेची भावातील वाटणी, हिंदूंच्या व मुसलमानांच्या स्वभावातील भेद; (पुनः एकदा) जैन व बौद्ध, रानड्यांचा 'महाराष्ट्र धर्म' वगैरे किती तरी विषय शेजवलकरांनी आपल्या ज्ञानानुसार व मतानुसार चोखाळून काढले आहेत. हे सर्व अवघ्या ३० पानातले आहेत; हे पाहून कंटाळा येतो व वाचताना काय वाटेल त्याची कल्पना करावी.

न्या. मू. रानडे यांचे अनुल्लिखित ऋण

न्या. मू. रानड्यांनी लिहिलेल्या 'राइज ऑफ धि मराठा पॉवर' यातील विचार शेजवलकरांनी उसने घेतले, असे विधान मागे आले असल्याने त्याची यथार्थता येथे थोडा दाखविल्यास परामर्शाचा पुढील मार्ग सुगम ठरेल.

शेजवलकर प्रस्तावनेच्या १२ व्या पानावर इस्लामी राज्यकाळात कोकण व मावळ संपूर्ण जिंकले गेले नव्हते असे सांगतात. तोच आशय रानडेकृत ग्रंथाच्या २६ व्या पानावर (१९०० सालाची पहिली आवृत्ति) नमूद आहे–

The subjugation (by Mahomedans) was never completed so far as Western Maharashtra and Konkan are concerned. Konkan was not conquered till the middle of the fifteenth century and the Ghatmatha or the Mavals was never conquered in the sense in which the Desh country was brought under the Mahomedan yoke. (पान ३२). The Mahomedam domination never acquired any strong or permanent hold over the country in these parts.

शेजवलकरांनी शिवकालीन मराठ्यांच्या स्वतंत्र वृत्तीचा किंवा स्वातंत्र्यप्रेमाचा निर्देश प्रस्ता० पान १३ व १७ वर केला आहे. त्याचा विचार रानड्यांनी २५ व्या पानावर केला आहे–

The sense of local autonomy and independence has been developed to an extent which prevented the country from being retained under one political control for a long time, both under Hindu or Mahomedan rulers. The essential feature of political arrangement in Maharashtre has been seperashi and in conflict with the long continuation of centralised powor.

यापुढे पूर्वापर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव राजवटीतील वेगवेगळ्या राजधान्यांची नावे आपली माहिती सप्रमाण असल्याचे दाखविण्यासाठी रानड्यांनी सादर केली आहेत. शेजवलकर देशमुख देशपांड्यांच्या आपसातील रक्तपाती कलहाचा तेवढा वृत्तांत देतात.

रानडे– पान २३ येथे महाराष्ट्रातील धर्मपंथात वैमनस्य नव्हते, सहिष्णुता होती, याचे वर्णन करतात–

The popular religion of the country has avoided the extremes of sectarianism which disfigure and disunite the Dravidian portion of the peninsula and the minute subdivisions of caste which obtain in North India.

"हिंदुस्थानातील कोणत्याही प्रांतापेक्षा महाराष्ट्रात धर्मपंथाचे कंगोरे एकमेकावर घासत नाहीत. हे सहज निदर्शनास येणारे आहे. सर्वच पंथाचे अनुयायी येथे आहेत. पण त्यांच्यात उच्चनीचतेची स्पर्धा नाही." असे रानडे-विधानाचे तात्पर्य शेजवलकरांनी दाखल केले आहे. (प्रस्ता० पान ३१)

शेज०करांपुढे प्रस्तुत विषय खलतांना रानड्यांचे विचार होते, हे त्याच पानावरील 'महाराष्ट्रांत मोठे मठ स्थापिलेले महंत वा गुरु नाहीत' या विधानापुढे रानड्यांचे नांव घेऊन ब्राह्मण, शूद्र किंबहुना मुसलमान देखील आपल्या साधुत्वाने अथवा विद्वत्तेने कसा सर्वमान्य होत असे, वगैरे रानडे-विचारांची दखल घेऊन शेज०करांनी 'सहिष्णुता व समजुतदारपणा ही या समाजाची प्रधान अंगे झाली होती' याप्रमाणे समारोप केला आहे. रानडे यांच्या ज्या विधानांचा शेज०करांनी आपल्या पद्धतीने गोषवारा दिलेला आहे. ती वाक्ये रानड्यांच्या पुस्तकात पान २४ वर आहेत. शेज०करांची प्रस्तावना आणखी विंचरल्यास रानडे–मतांचा त्यांच्या विवेचनावरील छाप बऱ्याच ठिकाणी दाखविता येईल.

शेज०करांशी लोकांपुढे मांडण्याजोगा विचारसंग्रह थोडाच असल्यामुळे तो त्यांनी वेगवेगळ्या संदर्भात उडवीत ठेवून प्रस्तावना वाढविली आहे. साहजिकच त्याचा परिणाम तोच तोच मजकूर दुबार तिबार वाचकांपुढे येतो. त्याची काही उदाहरणे येथे निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

मावळच्या देशमुखांच्या बेबंदशाहीचे विवरण प्रस्ता० पान १४, १६, ४५, ४७, ७५, ७७ इतक्या ठिकाणी असून मुसलमानपूर्व काळी व्यापाराची बंदरे उघड्या समुद्रकाठापासून बरीच आत खाडीच्या तोंडाशी असत, या माहितीचा उल्लेख ९, १०, १२, ६४ इतक्या पानातून दृष्टीस पडतो. आक्रमकाचे धोरण मुसलमानानी स्वीकारण्यापूर्वी पश्चिम समुद्रावर त्याच्या अनेक स्थळी वसाहती होत्या व संस्था होत्या. त्या संस्थाना 'ऐंजुमन' म्हणजे ताम्रपटातील 'हैंयमन' असे नाव होते ताम्रपटातील शब्दांचा मुस्लिम धर्माशी संबंध नसल्याचे नागपूरचे म. म. मिराशी यांनी सिद्ध केले आहे (पान ६). पुनः या शब्दाची नोंद (पान २२) निराळ्या अक्षरजुळणीने 'अंजुमान' व 'हैंयमान' अशी पहायला सांपडते. सदर अक्षरांच्या भेदाने विशेष घोटाळा होणारा नसला तरी ताम्रपटात मूळ 'हैंयमन' आहे की, 'हैंयमान' आहे का अनेक ताम्रपट असतील तर त्यामध्ये प्रस्तुत शब्द दोन तऱ्हानी लिहिला गेला की काय असा संदेह उद्भवल्याशिवाय रहात नाही. ऐंजुमन, अंजुमान हे शब्द शेजवलकरांच्या ज्ञानातले (किंवा ताम्रपट वाचणाराच्या कल्पनेतले) असल्यामुळे त्याचा जास्त विचार करण्याची गरज नाही; तथापि हे दोन्ही शब्द त्यांच्या मूळ शुद्ध उच्चाराचा बोध नसल्याने चुकीचे आहेत, हे सांगण्याशिवाय गत्यंतर नाही. हिंदूंच्या परमार्थविवेकात 'जगत्' व 'संसार' हे दोन शब्द चलत्वदर्शक (गतिवाचक) असल्याचे एकदा सांगून झाल्यावर (पान २९) पुनः (पान ५२) 'जगत्' शब्दाच्या अर्थनिरूपणाचा मोह शेजवलकराना आवरला नाही. शिवराज्याचे क्षेत्रफळ २५००० चौरस मैलाहून अधिक नव्हते (पान ६२) पुढे (पान ७९) ते ५०००० चौरस मैल इतकेच राहिले असे शेजवलकर म्हणतात. पहिला आकडा महाराष्ट्रातील राज्याचा अशी मर्यादा त्यांनी सुचविली आहे. दुसरा दक्षिणदिग्विजयानंतरचा असे मानावे लागते, पण दक्षिणेकडे महाराष्ट्राइतक्याच विस्ताराचा मुलुख जिंकला हे निश्चित कसे जाणता आले या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही. पोर्तुगीजांना हिंदु समाज बाटविण्याची शिवकालात लहर आली तेव्हा चार पाद्री ठार करून महाराजांनी 'जशास तसे' ही म्हण पोर्तुगीजांना पटवून त्यांच्या लहरीला आळा घातला, ही माहिती पान ७० व ८५ अशी दोनदा आली आहे. देशमुखी बेबंदशाहीच्या वृत्तान्तापैकी एकात लढाईच्या आव्हानाचा 'रणखांब' कुठे तरी सोयीच्या मोकळ्या जागी रोवल्याचा निर्देश आहे. प्रस्ता. च्या १५ व्या पानामध्ये तो प्रथम आला. १७ व्या पानापर्यंत देशमुखांच्या यादवीचे चऱ्हाट वळून ह्या रणखांबाच्या अनुरोधाने 'हिंदूंच्या जुनाट युद्धपद्धती'चे जर आपल्या वाचकांना दर्शन घडविले नाही तर आपली विद्वत्ता अपुरी ठरेल असे मनात येऊनच की काय पान १७-१८ शेजवलकर ते रणखांबाचे युद्ध शब्दानी कागदावर खेळविते झाले. (असे क्रियापदांचे प्रयोग शेजवलकरांनी उपयोगात आणले आहेत.) मावळातील देशमुखामध्ये लढाऊ शिरजोरी किती प्रमाणाने वसत होती याचे हिरडस मावळाच्या बांदलाने दादोजी कोंडदेवाचा म्हणजे आदिलशाही अमलदाराचा पराभव केल्याचे उदाहरण एकदा (पान ७५) दाखविल्यावर त्याचा पुनरुच्चार (पान ७७) केला आहे. तेच तेच दाखले पुनः पुनः घोळविण्याची शेजवलकरी हातोटीची एवढी ओळख पुरे.

साधुसंतावर चालविलेला जिभेचा पट्टा व द्वैताद्वैताचा काथ्याकूट

साधुसंत, धर्मपंथ यावर लेखणी किंवा (तोंडाने मजकूर उच्चारावा आणि दुसऱ्याने लिहावा अशी शेजवलकरांची ग्रंथरचना पद्धति असेल तर) जिभेचा पट्टा चालविताना शेजवलकरांनी महानुभावांना पान २८ वर स्पर्श केला. नंतर शिवकालीन साधुसंतांच्या विचारात महानुभावाना फिरून ओढले आहे. मग ज्ञानेश्वर, एकनाथांकडे वळून या सर्वांवर मुसलमानी धर्माचा प्रभाव होता असे शेजवलकराचे म्हणणे आहे. त्या प्रभावातून त्यांनी रामदासांनादेखील बाहेर ठेवलेले नाही. एकट्या रामदासांवर प्रस्तावनेची सुमारे ३५ ते

अनुक्रमणिका

४७ इतकी पाने खर्ची घातली आहेत व रामदास राजकारणी नव्हते, शिवाजीमहाराजांच्या राजकीय उठावणीमध्ये त्यांचा हात नव्हता, महाराज व रामदास यांची भेट दोघांच्या आयुष्यामध्ये शेवटच्या पाच सहा वर्षात झाली'; 'काही समासांना राजकारण हे नाव चिकटले असले तरी त्याचा अर्थ व्यावहारिक उपदेश किंवा युक्ति चातुर्य यापेक्षा निराळा नाही.' (पान ४०, ४२) रामदासांच्या शिकवणीत राजकारण नव्हते तर ते त्यांच्या शिष्यात व पंथात नसावे हे साहजिक आहे, रामदासांची शिवसंबद्ध महती निराधार आहे, इत्यादि अर्वाचीन सनातनी वृत्तीच्या रामदासभक्तांना पाखंड वाटण्याजोगे शेजवलकरांचे प्रतिपादन पाहून धक्का बसण्याचा संभव आहे. रामदासांना शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्वाशी जोडून त्यांची थोरवी गाण्याचा प्रघात चित्रपुराव्याचा अतएव सपशेल चुकीचाच नव्हे तर साफ साफ खोटा, या चर्चेकडे वळण्यापूर्वी शेज०करांनी काही भ्रामक समजुती व्यक्त केल्या त्या चमत्कारिक आहेत. रामदासांची तात्त्विक मते अद्वैतानुसारी असली तरी त्यांचा व्यावहारिक दृष्टिकोण माध्वसंप्रदायासारखा द्वैती आहे असे भासते व तसे एका अभ्यासूने म्हणूनही ठेवले आहे. ज्यांनी म्हणून ठेवले ते आचार्य कृष्णाजी विष्णु कालगांवकर असून त्यांनी माध्वांचे द्वैत रामदासी संप्रदायाच्या धार्मिक आचारात व देवदेवतांच्या तरतमभावात असल्याचे दाखविले आहे. श्री. बाळाचार्य खुपेरकरांनी माध्व आणि रामदासी संप्रदायातील साम्यावर लिहिले आहे, पण द्वैताद्वैताची शेज०करी कल्पना ही त्याहून निराळी म्हणजे अशास्त्रीय आहे.

तात्त्विक अद्वैत आणि व्यावहारिक (धर्मविधीपुरते) द्वैत यांचा वेदान्तामधील अर्थ मुळीच यथार्थ अवगत नसल्याप्रमाणे राजवाडे ८ व्या खंडामधून शिवाजी महाराजांच्या दोन पत्रांच्या आधारे द्वैताद्वैत सिद्ध करण्याचा शेज० करांचा प्रयत्न ' अव्यापारेषु व्यापार ' या लोकोक्तीला साजण्यासारखा आहे. एका पत्रात महाराजांनी आरमाराचा तनखा वेळच्या वेळी पोचविण्याची जबाबदारी ज्यावर टाकली होती. त्या ब्राह्मण अधिकाऱ्याने ही जबाबदारी पाळण्यासंबंधात अक्षम्य दिरंगाई चालविली होती; म्हणून अतिशय कडक शब्दांनी त्याची हजेरी घेतली आहे व तंबी दिली आहे की, ही दिरंगाई शत्रूला शोभणारी असल्याने तावडतोब हे प्रकरण निकालात न काढल्यास शत्रूला भोगावी लागणारी शिक्षा तुझ्या वाटणीस येईल. 'ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो ' हे चालू राजकीय विचारतंत्राने पुष्कळाच्या तोंडी बसविलेले वाक्य त्या पत्रात आहे. दुसऱ्या पत्रात एका मराठ्याने ब्राह्मणाला ठार मारले व आपण आत्महत्या करून तो मराठा न्यायाच्या पाशातून मोकळा झाला, या प्रकरणाबद्दल महाराजांनी लिहिले आहे. ब्राह्मणाचा खून महाराजांच्या मनास लागल्यासारखी त्या पत्राची भाषा आहे. पहिल्या पत्रातला रोख व्यावहारिक स्वरूपाचा म्हणजे द्वैताचा आणि दुसऱ्या पत्राचा रोख अद्वैताचा असे शेजवलकरांचे उद्दिष्ट त्या पत्राच्या उदाहरणाने स्पष्ट झाल्याशिवाय राहात नाही. धमकी किंवा मनधरणी यासारख्या व्यवहाराच्या भुईसपाटीवर जर द्वैताद्वैतमीमांसा उतरविली तर त्या शब्दांची विटंबनाच समजणे प्राप्त आहे. पण शेज०करांना द्वैताद्वैताची अशी ओढाताण करताना ती हास्यास्पद ठरण्याचे भय वाटलेले नाही.

म. गांधींची गैरलागू चर्चा

द्वैताद्वैताच्या काथ्याकुटासारखी एक वेगळ्या तऱ्हेची शेज०करांची मौज सांगायला हरकत नाही. पान ४० वर ' नेमस्तपणे राजकारण ' हे रामदासांचे वचन (अकस्मात् असंबद्धपणे) विचारात ओढून शेज०-करांनी म.गांधीवर टीका केली आहे. ते म्हणतातः— "महात्माजींचा सूत कातण्याचा उपदेश हिंदवासियांच्या आळसावर उत्तम उपाय होता यात शंका नाही. पण त्यांच्या प्रचारात नेमस्तपणा व राजकारण नसल्यामुळे कोट्यवधि रुपये खर्ची पडूनही इष्टकार्यसिद्धि होऊ शकली नाही. एवढ्यासाठीच रामदासांचे राजकारण होते. जिज्ञासूंनी मूळ प्रस्तावनेत प्रस्तुत विधानांचा आगापीछा पाहिल्यास त्याची खात्री पटेल की म. गांधीजींवर घसरण्यासाठी शेज०करांनी भारतीयांच्या आलस्यनिरासाचा विषय निष्कारण दुसऱ्यावेळी उभा केला आहे. आधीच्या ४० व्या पानावर महात्माजींच्या सूतकताईचा उपाय आणला आहे व तो वाया गेल्याचे लक्षात ठेवले पाहिजे असे तेथे बजावले आहे. परंतु छापील १७।१८ ओळी भरतील इतका मजकूर

(मधल्या कवितांचे उतारे सोडून) लिहून झाल्यावर मागे जे नमूद केले त्याचे भान जाऊन शेज०करांनी 'नेमस्तपणे राजकारण' या दासोक्तीच्या आधारे फिरून एकदा गांधीजींच्या कीर्तीला चावा घेतला आहे. एकदा दंश केल्याने शेजवलकरांचे समाधान झाले नाही. पहिल्या दंशाचीही आवश्यकता नव्हती पण एकदा तो प्रकार घडल्यानंतर मुळीच आवश्यकता नव्हती. हा अनवधानाचा प्रभाव अशी कल्पना पत्करून शेजवलकरांचे समर्थन होणे शक्य नाही. १७।१८ ओळींच्या मजकुरानंतर अवधान सुटण्याइतके शेजवलकर बुद्धीचे कमकुवत नव्हते. गांधीजींना दंश करण्याचा मोह अनावर झाला हे कारण या बाबतीत जितके संभाव्य आहे, तितकेच पहिला मजकूर लिहिल्यानंतर मध्ये काही काळ लोटला असल्यास पूर्वी काय लिहिले त्याचा विसर पडला आणि रामदासांच्या उपदेशाची ओळख करून देताना महात्माजींवर टीका करण्याचा उद्देश जागृत राहिला, हे कारण देखील संभाव्य आहे.

दासबोधासंबंधीचे भरकट

१९२९ सालापासून शिवसमर्थसंबंधाचा जो वाद महाराष्ट्रात कित्येक वर्षे टिकून राहिला होता त्यातल्या एका पक्षाने स्वीकारलेल्या मताला शेजवलकरांनी मान्यता दिली असली तरी दुसऱ्या पक्षाची कित्येक मते शेजवलकरांच्या लेखनात शिरल्याचे आढळते. दासबोधाच्या ६ व्या समासात कलियुगाची तो समास लिहिला त्यावेळेपर्यंतची वर्षसंख्या आलेली आहे. ती संख्या शक १५८१ व ई. सन १६५९ अशी वर्षे निदर्शनास आणणारी आहे. तिचे महत्त्व त्या समासापुरतेच आहे. समग्र दासबोध रचनेच्या दृष्टीने नाही, असे पूर्वी वादाच्या काळी दाखविण्यात आले असता सन १६५९ मध्ये दासबोध लिहिला जात होता, हे विधान ग्राह्य ठरणारे नाही. तो लिहिण्यासाठी दहावर्षे शिवथरघळीच्या एकांतवासात रामदास रहाणार आहेत, असे एक पत्र संशोधनाने बाहेर आलेले आहे. त्या पत्राचे वर्ष १६५९ पेक्षा निराळे आहे, शिवाय आपल्या दशवार्षिक एकान्तवासाच्या संकल्पाला थोड्या अवधीतच स्वतः रामदासांनी झुगारून दिल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

दशवार्षिक एकान्तवासाचा उल्लेख ज्या पत्रात आहे तेथे दासबोधाचे नावही नाही. आणखी हे लक्षात ठेवणे अवश्य आहे की, रामदास आपल्या सर्व लहान मोठ्या वाङ्मयाला दासबोध हेच नाव देतात तेव्हा एकांतवासात ते काय लिहिणार होते, याचा निश्चित निर्णय करण्याला आधार नसता रामदास दोनशे समासी वीस दशकी दासबोध लिहिण्याकरिता दहा वर्षे एकान्तवासात जाणार होते हा शेजवलकरांचा ग्रह कुचकामाचा आहे व तो ग्रह त्यांनी जुन्या मताच्या लोकांचा थोडा संतोष साधण्यासाठी आपल्या या प्रस्तावनेत सोडून दिला असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जुन्या मताचा संतोष साधण्याच्या इच्छेची आणखी बरीच विधाने आहेत.

आजवर रामदासी शिकवणीच्या रहस्याचे कितीतरी पर्याय जगापुढे आले. शेजवलकरांनी त्यात आपल्या मनसोक्ताची भर टाकली आहे. त्यांच्या एका मनसोक्ताची भरारी दाखविली की जिज्ञासूला त्या विषयी कल्पना येईल. दासबोधाच्या एका समासात 'ब्राह्मणाने आपले बालबोध अक्षर घडसून सुंदर करावे' असे वचन आहे. त्यावरून तेव्हांच्या ब्राह्मणांचे अक्षर चांगले नव्हते, या तर्काच्या आहारी जाऊन रामदासांच्या शिकवणीचा कटाक्ष ब्राह्मणवर्गाला सुधारण्याचा-त्या वर्गाचा अभिमान होता म्हणून नव्हे तर तो वर्ग शास्त्रनुसार सर्व समाजात श्रेष्ठ टरला असल्यामुळे ते श्रेष्ठत्व त्यांच्या ठिकाणी उदयास आणावे म्हणून सुधारण्याचा होता, असे भाष्य केले आहे. शेजवलकरांची अर्थनिष्पादनाची ही पद्धत अंगीकारल्यास शेकडो ओव्यांच्या द्वारे रामदासकालीन सामाजिक अधोगतीची विविध पण वस्तुस्थितीशी विसंगत ठरणारी चित्रे रेखाटता येतील. मूर्खाच्या लक्षणात जे करावे असे रामदासांनी म्हटले ते तेव्हा लोकांच्या आचार व्यवहारात नव्हते व जे करू नये म्हणून सांगितले ते प्रत्येकजण हटकून करीत होता, असे शेजवलकराच्या अर्थनिष्पादनशास्त्राने सिद्ध करणे कठिण नाही. माणसाने कीर्ति मिळवावी —कालपटावर आपले नांव नोंदावे— ही रामदासी वचने घेऊन शेजवलकरांनी कीर्तिसंपादनाचा आग्रह दुसऱ्या कोणत्याही संताच्या ग्रंथात नाही, असा सिद्धांत ठोकून दिला आहे हा रामदासपूर्वकालीन संतवाङ्मय

अनुक्रमणिका

त्यांनी न वाचल्याचा पुरावा आहे. रामदासांची या नाही त्या उपायांनी थोरवी उभारू पहाणारे बहुतेक सर्वजण रामदासपूर्व संतवाङ्मयासंबंधात अज्ञ असल्याचा अनुभव आहे. शेजवलकर त्याच दावणीत वरच्यासारख्या अर्थनिष्पादनक्रियेने बांधले जातात. रामदासांना आपल्या विवेचनात एका ठिकाणी शेजवलकरांनी यथेच्छ भरकटणारे लेखक म्हटले आहे. रामदास तसे आहेत की नाहीत या वादात न शिरता शेजवलकर बेफाम भरकटणारे आहेत, असे निःशंकपणे म्हटल्यास अतिशयोक्ति होण्याचे भय नाही.

शिवचरित्र परामर्शाच्या निमित्ताने प्रकट झालेले अस्ताव्यस्त अंतरंग

साधारणपणे प्रस्तावनेच्या ५२व्या पानापासून शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचे व चारित्र्याचे विवेचन सुरू केले आहे. त्यात शेजवलकरांना जे जे वाटले ते सर्व आहे. महाराजांना देशकालवर्तमानाचे अचूक ज्ञान होते. (वर्तमानज्ञानाने बरीच पाने अडविली आहेत.) महाराजांची राज्यपद्धति, प्राचीन शास्त्रोक्तानुसार महाराजांच्या राज्याची सप्तांगे—त्यात हेरांची कामगिरी सांगताना माधवराव पेशवे आणि नाना फडणीस याना चिमटा, कुठे जाता जाता गांधी-नेहरूंना थप्पड, भारताच्या भवितव्याची काळजी, जिजामातेचे सोंगट्या खेळणे व महाराजांच्या नोकरीत विश्वासू मित्र निपजणे हे त्या खेळाचे फळ अशी विविधता आहे. मध्येच शहाजी डोके वर काढतो व काही पाने अडवतो. महाराजांची व त्यांच्या पित्याची तुलना व उभयतांच्या योग्यायोग्यतेची छाननी, महाराज घोड्यावर नेहमी बसत होते की पालखीतून संचार त्याना प्रिय होता; महाराजांच्या कीर्तीचे नीतिदृष्ट्या मूल्यमापन, महाराज अगतिकतेने किंवा तसाच भीषण प्रसंग असेल तर साहसाला प्रवृत्त होत, एरवी जीवाला जपत, हत्तीवरून ते स्वारीवर (लढाईला) जात नसत, त्याना छापखाने माहीत नव्हते. शिवकालात कागदाऐवजी कापडावर लिहीत असत, वगैरे वगैरे वेदान्तामधील प्रकृतीच्या विकृतीप्रमाणे शिवचरित्रलेखनाच्या निमित्ताने शेजवलकरांच्या अंतरंगातले विश्व ५२ ते ९८ अशा सेहेचाळीस पानातून प्रकटले आहे. वेदान्तामधील प्रकृतीच्या विकृतीला नियमबद्धता आहे. शेजवलकर हे स्वतः शिवछत्रपतींचे विधाते असल्यामुळे त्यांनी नियम धाब्यावर बसविले आहेत.

घोडा, हत्ती व हबेलंडी

शिवकर्तृत्वाच्या शेजवलकरी विवेचनात सुसंगतीचा धरबंध नाही तोच कित्ता गिरवून सहजगत्या समोर येईल तो भाग वाचकांना दाखवीत गेल्यास कसलाच प्रमाद घडणार नाही, या समजुतीने प्रथम घोडा, पालखी, हत्ती याकडे लक्ष देणे युक्त ठरेल. राजा रविवर्म्याने काढलेली शिवाजीमहाराजांची अश्वारूढ तसबीर आणि आज मोठ्या समारंभाने अनेक स्थळी उभे केले जाणारे महाराजांचे अश्वारूढ पुतळे पाहून महाराज सदैव घोड्यावर बसत असल्याचा भ्रम लोकात फैलावण्याच्या भीतीने शेज०कर तसबीर व पुतळ्यांचा निर्देश करून पुकारतात की (पान ६७) शिवाजी नेहमी घोड्यावर स्वार होऊन दूरवर जाई ही समजूत सर्वदा खरी नाही. (या वाक्यांतील सर्वदा हा शब्द नजरबंदीचा आहे. दूरवर हा शब्दसुद्धा त्याच मासल्याचा आहे.) या पुढील वाक्याचा मागील वाक्याशी संबंध नाही, हे वाचकांनी पाहावे. घोड्यावर बसण्याचा दुसरा उल्लेख पान ९२ मध्ये आहे. ' शिवाजीने हत्तीवर बसून स्वारी केल्याचे नमूद नाही. तो घोड्यावर बसून युद्ध करी व विश्रांतीसाठी मेणा वापरी. यावरून शेज०करी पद्धतीने बोध होतो की, लढाई चालू असेल तोवरच पायामध्ये घोडा व लढाई संपताच घोड्याजवळच असणाऱ्या पालखीत ताबडतोब विश्रांति, अशी महाराजांची संवय होती. या दुसऱ्या उल्लेखात रविवर्मा नाही. हत्तीचा निर्देश पेशव्यांची पानिपतावर जी हबेलंडी उडाली ती हत्तीमुळे हे निदर्शनास आणण्यासाठी म्हणजे पेशव्यांना चिमटा काढण्यासाठी केलेला आहे. पानिपतच्या लढाईत हत्तीचा उपयोग दोघा पेशव्यांपुरता— सदाशिवरावभाऊ आणि विश्वासराव यांच्यापुरता— आहे. हत्ती लढाईतल्या तोफा बंदुकांच्या माराने बिथरून पिसाळून उलटला व मराठ्यांचे लष्कर तुडवीत पळू लागला असता तर हबेलंडी उडाली असे म्हणणे उचित ठरले असते. विश्वासरावाला गोळी लागल्यावर सुद्धा हत्तीने जागा सोडून धाव आरंभल्याचा जोवर पुरावा नाही तोवर ' हबेलंडी' उडाली हे विधान शेज०करांनी पेशव्यांविषयीचा आपल्या मनातील तिरस्कार

अनुक्रमणिका

दाखविण्यासाठी लिहिले असेच मानणे भाग आहे. पेशव्यावद्दलचा तिरस्कार आक्षेपार्ह नाही. तो व्यक्त करण्यासाठी शेज०करानी धरलेली असत्याची कास निश्चित आक्षेपार्ह आहे. पानपतावरील हत्ती खरा, हवेलेंडी देखील खरी पण 'हत्तीमुळेच हबेलेंडी' हा कारण-कार्य भाव मात्र सपशेल खोटा. शिवाजी जीवाला जपणारा, हा सिद्धान्त वाचकांना रुचणार नाही, यासाठी त्यानी काहीसा निंदाव्यंजक अर्थाच्या सुचविण्याऱ्या वाक्यांच्या मागेपुढे जी मखला-शीची वाक्ये जोडली आहेत, ती दृष्टीखाली घातल्याने खुलासा होईल.

वहारीची असंबद्धता

गळबतात बसून महाराज एकदाच बसरूरच्या स्वारीस गेले. ही स्वारी उण्यापुऱ्या आठवड्यात संपली. "त्यांची स्वारी हिवाळयात, समुद्र शांत असल्यावेळी झाली पण या एकाच स्वारीच्या अनुभवाने त्याला सागरी स्वारीतील अडचणी व संभाव्य धोके यांचे ज्ञान होऊन त्याबद्दल (म्हणजे कशाबद्दल ?) त्याची खात्री पटलेली दिसते. पुनः कधी तो त्या फंदात पडला नाही." नंतर महाराज अकारण जीव धोक्यात घालण्याचे टाळीत असत, या पालुपदावर येऊन शेज०करांनी 'यात त्यांचा शहाणपणा व सावधगिरी उत्तम दिग्दर्शित होतात' या सर्टिफिकेटाने आपली बाजू सावरण्याचा यत्न केला आहे; तरी या शहाणपणाचा व सावधगिरीचा दुष्परिणाम, "मराठ्यांना सागरी प्रवासाची आवड निर्माण होणे त्यामुळे मागे पडले." याप्रमाणे सांगण्याला न कचरता आपल्याच सर्टिफिकेटाला त्यांनी मातीमोल ठरविले आहे. या परिच्छेदाचा शेवट वहारीच्या असंबद्धतेने केला आहे. इंग्रज एकदा सिंध प्रदेशात आरमाराने गेले म्हणून त्यांना साम्राज्य स्थापन करता आले (सिंध प्रांतात आरमाराने जाणे व इंग्रजांचे देशभर साम्राज्य स्थापन होणे या दोन घटनात कारण कार्यसंबंध नाही) असे सांगून शेज०करांनी जो व्यंबकटोला मारला आहे तो अनुभवून कोणीही वाचक अपार आश्चर्यात पडेल. "मराठे त्या आधी (इंग्रज आरमाराने सिंध प्रांतात घुसण्यापूर्वी) शंभर वर्षे पेशावरपर्यंत दौड करून आले पण त्यांना पंजाबावर सुद्धा राज्य करता आले नाही याचे कारण हे आरमारी वैगुण्यच होय." इतिहासाचे थोडे ज्ञान असणारा कोणीही शेज०करांच्या सदर टीकेचा असंबद्धपणाच नव्हे तर पोकळपणा दाखवू शकेल. मराठ्यांच्या आधीचे मुस्लिम सुलतान व बादशहा जे पंजाबावर राज्य करीत होते त्यांच्या पराक्रमाशी आरमारी सामर्थ्याचा संबंध नव्हता. फक्त इंग्रजांनी व तोही एकदांच आरमाराचा उपयोग केला. आधी ते देशभर पसरलेलेच होते. फक्त एका वेळी त्यांना राजकीय अडचणीसाठी आरमाराचे साह्य घेणे भाग पडले. शेजवलकरांना तेवढेच कारण मराठ्यांवर तोंड टाकायला पुरले. पण खरा प्रश्न शिवाजीमहाराजांच्या चरित्रात इंग्रजांच्या भारतीय इतिहासातील पेशवाई कायमची निमाल्यानंतरचा हा प्रसंग घुसडण्याची गरज काय होती हा आहे. याचे उत्तर शेजवलकरांची बलीयसी लहर याखेरीज दुसरे नाही.

शेजवलकरांचे तर्कटतारू

महाराजांनी बसरूर हे संपन्न स्थळ आरमारातून जाऊन लुटले. परत येताना शंभर मैल अलीकडे उतरले. यावरून शेजवलकरांचे तर्कटतारू 'महाराज समुद्राच्या हालण्याने व्यथित झाले असण्याच्या संभवाकडे वळले आहे' (पूर्वीच्या विधानातील शांत समुद्र त्यावेळी ११६ व्या पानात हालू लागला.) पुढच्या (११७ व्या) पानात पुनः महाराजांनी जलप्रवास सोसला नाही म्हणून तो मध्येच थांबविला असे सुचविले आहे. पान ११९ वर शेजवलकरांनी महाराज मध्येच का उतरले याचे खरे संयुक्तिक कारण उघड केले आहे. ते म्हणजे मिर्झा राजा जयसिंग याची शिवराज्यावरील स्वारी. बसरूरची स्वारी फेब्रुवारी १६६५ च्या पहिल्या आठवड्यातली. महाराज स्वराज्यात येऊन दाखल झाले ते त्या महिन्याच्या शेवटी. मिर्झाराजा ३ मार्चला पोचला व ३० मार्चला त्याने पुरंदरचा वेढा सुरू केला. जयसिंगाच्या स्वारीबद्दल 'हफ्त अंजुमान' हा फारसी इतिहासकार असे सांगतो. याप्रमाणे शेज०करांनी आधार नमूद केला आहे. (जयसिंगाने औरंगजेबाला व इतरांना पाठविलेल्या पत्रांच्या संग्रहाला हफ्त अंजुमन हे नाव आहे, हे संग्रहाचे नाव आहे, इतिहासकाराचे नाही, असे अवधान वाचकांनी राखावे.) जयसिंगाच्या तडफदार स्वारीवर तोड काढण्याकरिता शिवरायांनी आरमार मध्येच सोडले व त्यांनी स्वराज्य गाठले, या

कारणाकडे लक्ष देऊन आपल्या मनाचे चांचल्य दाबणे शेज०करांना शक्य होते, परंतु स्वभावापुढे ते तरी काय करणार ?

महाराज, गांधी, नेहरू व टिळक

शिवराय देशकालवर्तमानाच्या ज्ञानात पक्के होते, या प्रतिपादनात शेज०करांनी गांधीजींना लेखणीने भोसकले आहे. वर्तमानाचा विचार सोडून अनीती, अधर्म, अनाचार, पापकर्म (जे आपल्या) डोळ्यासमोर ठेवतात ते तोंडघशी पडतात. आणि सज्जन माणसे बहुधा अकर्तबगार असतात: "गांधी ... अंशतया या कोटीतील म्हणून अयशस्वी झाले. ते सर्वलोकांच्या दृष्टीने नीतिमान किंवा राजकारणी दोन्ही ठरले नाहीत! त्यांचे प्रतिस्पर्धी त्यावर इतिहासात मात करून गेले! एवढे फलित गांधींच्या वाट्यास आले. हिंदुस्थानचेही त्यात कधीही भरून न येण्याइतके नुकसान झाले." महाराज आणि महात्माजी यांची तुलना करण्याची शेज०करांना गरज नव्हती. महाराजांच्या कर्तृत्वाचा नवा पैलू चर्चेस घेताना गांधी नेहरू, चालू स्वराज्याचे सूत्रधार यांचे काही व्यंग दाखविणे शक्य आहे की नाही, याचा शेजवलकर अगोदर तपास करीत असावे, अशी वाचकांची समजूत होण्याजोगा हा त्यांच्या टीकेचा प्रकार आहे. राज्याची अंगे सात या प्राचीन सिद्धान्ताचा परामर्श करताना 'राजा हे मुख्य अंग' हा मुद्दा शेजवलकरांनी छेडला. त्याबद्दल सांगण्यासारखे विशेष नसल्यामुळे काही वाक्ये शिवप्रशंसेत खर्चून शेवटी "इतिहास म्हणजे काय हे गांधी आणि नेहरू याना तरी कळत होते की नाही याची शंका पाकिस्ताननिर्मिति व चिनी संकट या घटनावरून जेथे घेता येते तेथे या पामर साहित्यिकांचा विचार तो काय ?" (पान ९३) मूळचा परिच्छेद वाचताना गांधी नेहरूंना का गोवले याचा बोध होणार नाही.

९४ पानावर पुनः आरमार आणून त्यात आरमारापेक्षा रामचंद्रपंत अमात्य व त्याचा भाऊ यांचीच माहिती जास्त आहे. शिवाजी महाराजांनी आरमार या राज्यांगाकडे लक्ष दिले, औरंगजेबाने दिले नाही. 'अखिल जगाला ग्रासणाऱ्या या संकटाविरुद्ध उपयोगी पडण्यासारखी कार्यक्षम तरतूद त्याना (महाराजांना) करता आली नाही एवढे खरे.' महाराजांचा हा कमीपणा येथेच नव्हे तर पूर्वी अनेकदा दाखविला आहे व वाचकांना बोचू नये यासाठी काही कारण योजून शेजवलकर सारवासारव करतात. येथे 'दुर्दैवाने त्यांचे लक्ष आणि अपुरी शक्ति हिंदु संस्कृति स्वतंत्र राखण्याच्या उद्योगातच खर्ची पडली.' या खुलाशाने महाराजांचा उणेपणा दुर्दैवा आड ढकलण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. नंतर औरंगजेबाच्या आरमारीबाबतीतील दुर्लक्षाचा निर्देश करून शेजवलकरांना प्रचलित राजकारणाचा समाचार घेण्याची हुक्की आली आणि लिहीत सुटले– "आजही कालौघ न समजता स्वतःचाच हट्ट चालविणारे औरंगजेबाचे वंशज तसाच अडथळा निर्माण करीत आहेत. त्यांतून भारत या खेपेस सहीसलामत सुटणार की साम्यवादाच्या भोवऱ्यात गडप होणार हे सागणे कठिण आहे. जगाचे हित वा अहित करणारे अखेर थोडे, हाताच्या बोटावर मोजण्याइतके काळपुरुष असतात अशी इतिहासाची अखंड घाटणी प्रत्ययास येते." आणखी थोडे पुढे गेले की, फिरून टिळक गांधी भेटतात विवेचन आहे महाराजांच्या अधिकाऱ्यांबद्दल. प्रसंगोपात्त महाराजांना आपल्या अधिकाऱ्याची गय करावी लागे. कारण "कोणतेही राज्य समाजाच्या उंचीपेक्षा वर वाढू शकणार नाही. हे कायम सत्य आहे. समाजाची उंची वाढविण्याचा प्रयत्न करण्यास शिवाजीला राजकारणापुढे केव्हाच उसंत मिळाली नाही. टिळकांचेही असेच झाले व गांधीही या जंजाळातून कधी सुटले नाहीत. यावरून एक दिसून येते की ऐतिहासिक पुरुष सुद्धा सर्व इष्ट गोष्टी एकदम करू शकत नाहीत." (९५ पान) या मजकुरानंतरची उलट सुलट विधाने वाचकांनी मुळात पाहावी.

महाराज दुर्दैवी

सप्तांगराज्याच्या विवरणात (पान ८७) दैव आणि पुरुषपराक्रम या विषयांना अवकाश देऊन शेज०करांनी म्हटले आहे की, "पुरुषपराक्रमाशिवाय, राज्याच्या स्वयंकर्तृत्वाभावी कोणतीच गोष्ट केवळ दैवाने सिद्ध होते हे म्हणणे म्हणजे डोळ्यासमोर दिसणाऱ्या गोष्टींना खरे न मानणे होय. पराक्रमाशिवाय दैव उघडणे अशी गोष्टच व्यवहारात नाही." यापुढे (पान ८७) दैववाद पुरुषार्थवादाचा पसारा मांडून हा वाद सोडला व शेज०करांनी महाराजांच्या मित्रांची चर्चा मांडली. त्यात दैव-पराक्रमाचे द्वंद्व घुसले त्याचा व्याख्यानरुपाने

थोडा धुराळा उडवून पुनः मित्रांकडे शेजवलकर वळले आहेत. चमत्कार आहे तो हा की त्यानी ८७ पानावर आधीच "देशकालवर्तनामुळेच शिवाजीची धाडसे बहुशः यशस्वी झाली. पण अखेर दैवापुढे त्यालाही हात टेकावे लागले. शिवाजीबाबत विचार करता असे दिसते की, त्याच्याकडे अधिष्ठान, कर्ता, करण व त्याकडून होणाऱ्या चेष्टा व्यवस्थित असून फक्त दैवच त्याला अखेर फटका देऊन गेले. सृष्टीची व्यवस्था ही अशीच चालत आल्याचे इतिहासावरून प्रत्ययास येते. शेजवलकर बहुधा प्रत्येक परिच्छेदाच्या शेवटी मेघदूतकाव्याच्या धर्तीवर सुभाषितप्राय वाक्य ठेवतात. "सृष्टीची व्यवस्था . . ." हे वाक्य त्यापैकी एक आहे. संभाजी हे महाराजांचे दुर्दैव असे त्यानी अनेकदा दर्शविले आहे. घरच्या भानगडी असेही क्वचित् नमूद केले आहे, परंतु संभाजीखेरीज इतर भानगडी कोणत्या याचे स्पष्टीकरण सांपडत नाही.

जिजाबाईचा सोंगट्याचा खेळ

महाराजांच्या उद्योगाने महाराष्ट्रात दिसू लागलेले स्थित्यंतर वर्णिताना एकदम त्यांना जिजाबाई आठवली. "तिचा माहेराकडे वऱ्हाडपर्यंत ओढा होता (माहेराकडे वऱ्हाडपर्यंत हे शब्द मुद्दाम लक्ष देण्याजोगे आहेत.) यामुळे तेथपर्यंतची उपयोगी व कर्तबगार माणसे शिवाजीच्या पदरी जमा झाली. यामुळे सहजच त्याच्या कार्याला अखिल महाराष्ट्राचा आकार प्राप्त होत गेला. शिवाजी दक्षिणेकडे जाता तर असे होणे दुरापास्त होते." (महाराज दक्षिणेकडे जाते तर जिजाबाईचे माहेरचे स्थळ देखील बदलणार होते की काय ? शहाजीने वऱ्हाडच्या माणसावर बहिष्कार तर घातला नव्हता ना ?) यापुढे आजच्या समाज टीकाकाराचे स्वयंकल्पित अज्ञान उद्धरून शेज०करानी 'जिजाबाई रायगडच्या राजदरबारी बाहेरच्या ओटीवर पुरुषांशी सोंगट्या खेळत असे' ही आपल्या सर्वसंग्राहक झोळण्यातील एक गोष्ट बाहेर काढली आहे ती विलक्षण आहे. रायगडच्या राजदरबाराबाहेर ओटी व तेथे जिजाबाईचा पुरुषांशी सोंगट्याचा खेळ. शेज०करांना मोहात लोटणाऱ्या या गोष्टीचा तपशील खूप ताणून जे तात्पर्य त्यांनी विणून काढले आहे, ते सदर गोष्टीसारखेच आहे. माहेरचा गोमाजी, एखादा ब्राह्मण प्रधान, एखादी ब्राह्मण बाई व इतरही स्पृश्य जातीचे लोक त्या खेळात भाग घेत, वा खेळ पाहात बसत. दरबाराबाहेरची ओटी, ती दहापंधरा स्त्रीपुरुषांचा फड समावून घेण्याइतकी प्रशस्त असलीच पाहिजे. हा घरगुती खेळीमेळीचा प्रसंग महाराजांच्या कारभाराला उपयोगी पडावा याकरिता शेज०करांची केलेली मल्लिनाथी अविश्वसनीय वाटली तरी वाचनीय ठरते. सोंगट्यांचे खेळाडू किंवा प्रेक्षक आपण नोकर हा संबंध विसरणारे नव्हते. "धन्याचे ऐकावयाचे हे सर्वांना अवगत होते व त्याप्रमाणे ते कोणतीही खळखळ न करता वागत" असे होते म्हणूनच शिवाजीच्या कारकुनांतून (खेळाडू व प्रेक्षकांच्या यादीत कारकून नाही, कदाचित् यादीतील ब्राह्मण प्रधान हा कारकुनाचा प्रधान झालेला असेल) केवळ मुलकी प्रधानच नव्हेत तर सैन्ये घेऊन परमुलखात जाणारे सेनापती, अंगावर सर्व भार घेऊन राज्ये (एकट्या शिवाजी महाराजांचे राज्य नव्हे) चालविणारे मुत्सद्दी व अडचणीच्या वेळी काही साधन उरत नसे तेव्हा हे आपलेच राज्य आहे असे समजून पडेल ते सर्व धाडस करणारे देशभक्त निर्माण होऊ शकत. (एकूण राजमातेचा सोंगट्यांचा खेळ हा वरून दिसायला खेळ असला तरी तो राज्याला प्रधान मुत्सद्दी, सेनापती व देशभक्त पुरविणारा आखाडा होता म्हणायचा) खेळावर बसविलेली शक्कल आटपून शेज०कर परिच्छेदाअंती सिद्धान्त फेकतात की, "अशी एकीची भावना आजच्या शिकलेल्या पढविल्या जाणाऱ्या व शब्दांची समानता निर्माण करणाऱ्या काळातही कोठे दृष्टोत्पत्तीस येत नाही; व म्हणूनच भारत सर्व बाजूंनी संकटात पडले आहे." (वाचकांनी सोंगट्यांच्या खेळातून निपजणारे कर्तबगार खरे न मानण्याची काळजी घ्यावी.)

[तानाजीच्या पोवाड्यात जिजाबाई–शिवाजीमहाराजांच्या सोंगट्यांचा खेळ सांगितला आहे. पण तेथें खेळाची जागा प्रतापगड आहे, शेजवलकरांचा रायगड नाही. त्या खेळाच्या वेळी खेळाडू मायलेकांच्या आजूबाजूस इतर कोणी होते, असा उल्लेख नाही. महाराज खेळात हरले तेव्हा लेकाने काय मागशील ते देईन असे म्हटल्यावरून आईने मोगलांच्या ताब्यातला सिंहगड मागितला, असे त्या खेळाचे पर्यवसान पोवाड्यात आहे. पुरंदरे दप्तर भाग ३ पान १४० मध्ये

गोमाजी नाईक (पानसंबळ) हा सोंगट्या खेळत असल्याची माहिती आहे. परंतु खेळाची जागा राजगड असून खेळगड्यात जिजाबाईंचे नाव नाही. शेजवलकरांनी या खेळाची हकीकत कोठून घेतली हे सांगितले नसल्याने मूळ किती व शेजवलकरांचे कल्पना कौतुक किती याची शहानिशा करता येत नाही.]

येथवर दिलेल्या माहितीवरून शेजवलकरांच्या विचारसरणीचे व लेखनपद्धतीचे ज्ञान वाचकांना होईल. पुनरुक्ति, चर्वितचर्वण आणि विषयान्तर वगैरे प्रकार टाळण्याची खबरदारी घेऊन प्रत्येक मुद्द्याचे विवेचन अवश्य तेवढेच दिले असते तर प्रस्तावना, महत्त्वाचे काही न गळू देता, निम्म्या पानात संपली असती. शेजवलकरांचे लेखन सैरावैरा थाटाचे असले तरी त्यांनी लेखनार्थ केलेले परिश्रम वाखाणण्यासारखे आहेत व तेच शिवचरित्राच्या भावी अभ्यासकांना मार्गदर्शक होतील. शिवकालीन व्यक्तींच्या स्थळांचा कालक्रम न सोडता केलेल्या याद्या व त्यांत घातलेला संदर्भग्रंथातील मजकूर, तदनुसार काही अल्पचर्चा, हे काम त्यांच्या परिश्रमाची साक्ष पटविणारे निःसंशय आहे. त्याबद्दल शेज०करांना व प्रकाशकांना मुक्तकंठाने धन्यवाद देणे अवश्य आहे. इतक्या परिश्रमाने जे चरित्र लिहिले जाणार होते ते समाधानकारक वठण्याचा संभव नसल्याचा त्यांच्या प्रस्तावनेवरून व चरित्राची जी प्रकरणे छापली आहेत त्यावरून सहज अंदाज करता येईल. या अंदाजाला त्यांची पूर्वीची पुस्तके दुजोरा देणारी आहेत. शेजवलकरांबद्दल त्यांच्या मृत्यूनंतर विरोधाने लिहिणे योग्य नव्हे असे कित्येकांचे मत असेल परंतु त्यांच्या उद्योगाची त्यांचे भक्त जी एकतर्फी प्रशंसा गात आहेत ती ऐकून किंवा पाहून शेजवलकरांच्या ज्ञानाची, विचाराची व लेखनाची खरी तऱ्हा निदर्शनास आणण्याची जबाबदारी कोणीतरी स्वीकारणे भाग होते. ही जबाबदारी वैमनस्याची किंवा वैराची दर्शक आहे असे मानावयाचे असेल त्यांनी खुशाल मानावे.

अनुक्रमणिका

श्री. सुरेश भृगुवार

प्राचीन मराठी साहित्यातील काळरात्र : १४ वे व १५ वे शतक

– १ –

' इये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळु ' करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी आपल्या तेजाने प्रकाशित केलेला ' ज्ञानेश्वरी ' रुपी पौर्णिमेचा चंद्र आपल्या मधुर आणि नयनरम्य चांदण्यांचे शीतल शिडकावे सारस्वत भक्तांना देत असतानाच पौर्णिमेची रात्र संपून जावी, आणि सृष्टिक्रमानुसार कृष्णपक्षातील प्रतिपदा, द्वितीया येत येत अखेर अमावास्येच्या पूर्ण काळरात्रीने आपल्या भेसूर हास्याने आमच्या डोळ्यापुढे अंधारी आणीत, काळोखाची काळिमा अधिकच गडद करावी, हा केवढा दैवदुर्विलास ! प्राचीन मराठी साहित्याकडे दृष्टि टाकताना सुवर्णाक्षरांनी टिपलेल्या मुक्तामालेत हा एक काळा मणी सापडावा ही सत्य दुर्घटना ! प्राचीन मराठी साहित्याला दृष्ट लागू नये म्हणून लावलेले गालबोट नव्हे हे ! तर इस्लामी आक्रमणाने मराठी मनाला दिलेल्या जबरदस्त धक्क्याचे, आणि मराठी साहित्याला डिवचलेल्या दुर्भाग्याचे हे कलंकमय प्रतीक आहे.

या भीषण अंधकारात आज जाणीवपूर्वक, शोधक बुद्धीने, डोळसपणाने प्रवेश करून या दुर्घटनांची अपरिहार्यता व त्याच संदर्भात हिंदूचेही अंगभूत दोष पाहून योग्य तो धडा घ्यावयाचा आहे.

१४व्या व १५व्या शतकातील मराठी साहित्याचा विचार करण्यापूर्वी तत्कालीन सामाजिक घडामोडी व राजकीय परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल. या द्विशतकातील मराठी साहित्य अळणी, निस्तेज, नाउमेद होण्याची कारणे तत्कालीन परिस्थितीत सापडतात.

ऐतिहासिक परिस्थिति

१४ व्या शतकातील मोठे स्थित्यंतर म्हणजे मुसलमानी अमलाची प्रस्थापना होऊन तो दृढमूल झाला होता. स्वकीय राजसत्ता नामशेष होऊन परकीय सत्ता वृद्धिंगत होत होती. शके १४०२ मध्ये मुसलमानी -ब्रहामनीराज्याचे पांच तुकडे झाले. ब्रहामनी राज्यात अरबस्तान इराण येथून इस्लाम येत व येथेच पाय रोवीत. कालांतराने **दक्षिणी पक्ष व परदेशी पक्ष** असे दोन तट पडले. ब्रहामनी राज्यातील पांच शाखातील परस्परातील लढाया, व दक्षिणी पक्ष आणि परदेशी पक्ष याच्यांतीलही भांडणे हिंदू जनतेला फारच त्रासदायक होत. परकीय मुसलमान संख्येने फारच थोडे असल्यामुळे हिंदूच हिंदूविरुद्ध लढत असत. दोन्हीकडील सैन्यात हिंदूंचा भरणा जास्त असे.

१४ व्या शतकाच्या अखेरीस हिंदूंचे धर्मदृष्ट्या दैन्य वाढविणारे आणखी दोन जबरदस्त तडाखे बसले. शके १४८७ मध्ये विजयनगरचे हिंदू राज्य धुळीस मिळाले. व शके १४८९ मध्ये उदेपूर चितोडचा स्वाभिमान अकबराने धुळीस मिळविला. ही दोन बलाढ्य साम्राज्ये हिंदूंचा आधार होता आणि हा आधारच नाहीसा झाल्यावर हिंदूंना डोके वर काढण्यास जागाच राहिली नाही.

दैवी आपत्ति

हिंदूंच्या स्वत्वाची जणू काय परीक्षाच पाहावयाची असे काळानेही ठरविले असावे. परकीय सत्तेच्या अंमलाबरोबरच दुसऱ्या दैवी आपत्तीला तोंड देणे भाग पडले. ती म्हणजे सर्वव्यापी भयंकर दुर्गादेवीचा दुष्काळ. हा दुष्काळ थोडीथोडकी नव्हे, तर एकसारखा बारा वर्षे चालला. आकाश कोरडे झाले. जमिनी करपून गेल्या, शहरे उजाड झाली, अनेक लोक 'अन्नान्न' करून मरण पावले, व उरलेले प्रांत सोडून निघून गेले. ' दुष्काळ ही नैसर्गीक आपत्ति खरीच, पण त्याची पुनरावृत्ति म्हणजे अराजक आणि आर्थिक दुरवस्था याचीच लक्षणे होत ' तसेच दुष्काळाची होणारी पुनरावृत्ति शेतीच्या धंद्याची (हिंदूंची कृषिप्रधान संस्कृति,) हेळसांड

अनुक्रमणिका

व निकृष्ट अवस्था दर्शवितात. या मोठ्या दुष्काळाचे महाराष्ट्राच्या राहणीवर, भाषेवर व विचारसरणीवरही फार खोलवर परिणाम झाले.

सामाजिक घडामोडी

तेराव्या शतकापूर्वी व नंतरही आजतागायत चातुर्वर्ण्य नाहीसे करण्यासाठी व सर्व जाती मोडून एक करण्यासाठी अनेक यत्न झाले. बौद्ध वातावरण व जैन मतप्रसार यांचा परिणाम निःसंशय मराठी मनावर व मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथरचनेवर झाला. महाराष्ट्रात महानुभाव पंथ चांगलाच स्थिर झाला होता. बसवेश्वराच्या नेतृत्वाखाली इ. स. ११६० साली स्थापन झालेला लिंगायत पंथ मराठीत ग्रंथरचना करू लागलेला होता बौद्ध, जैन, महानुभाव, लिंगायत, नाथ वगैरे पंथांनी चातुर्वर्ण्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केला. शेवटल्या वर्तुळातील जातीतल्या लोकांची मने यांच्या शिकवणीने हुरळून जाऊ लागली.

परिणाम– इस्लामी संस्कृतीने घडविलेले परिवर्तन

वर विवेचिलेल्या घडामोडींचा मराठी मनोवृत्ति, मराठी संस्कृति व मराठी भाषा यावर फार परिणाम झाला.

(१) हिन्दूंची मूर्तिपूजा, देवस्थाने, धार्मिक प्रामाण्ये व त्यांच्या परंपरा इत्यादींचा उच्छेद इस्लामने करून टाकला. हिंदूंच्या चातुर्वर्ण्याला तर त्याने फारच तडाखे दिले. ब्राह्मण विशेषतः पुरोहितवर्गाचे आणि क्षत्रियांचे समाजातील वर्चस्व आणि त्यांचे अढळस्थान इस्लामने नष्ट करून टाकले.

(२) व्यापारात मुसलमानांचे प्राबल्य. हिंदूंचा पैसा मुसलमानांच्या हाती जाऊ लागला.

(३) ब्राह्मणांकडून होणाऱ्या उपेक्षेला कंटाळलेल्या हीन, शूद्र जातीतील असंख्य लोकांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता. आर्य धर्माचा चाहता **हॅवेल** म्हणतो, "खालच्या वर्गात धर्मांतर फार लवकर होत असे. धर्मांतराने शूद्र वर्गाच्या शृंखला तोडल्या जाऊन त्याला ब्राह्मणांच्या बरोबरीचे स्थान मिळण्याची संधी निर्माण करून दिली. युरोपातील पुनरुज्जीवनाच्या चळवळीप्रमाणे इस्लाम ही प्रधानतः नागरी संस्कृति होती. आनंदमय विकासाला[1] प्रारंभ या काळातच झाला" (Aryan rule in India by Havell)

"सर्व समाज विनाश व विघटना यांच्या चक्रात सापडला होता. आणि दलित जनता सामाजिक समता व स्वातंत्र्य देणाऱ्या इस्लामी धर्माच्या झेंड्याखाली गोळा झाली ... कनिष्ठ वर्ग निराशाग्रस्त होते. व वरिष्ठ वर्ग पतित झाले होते."[2]

कनिष्ठ वर्ग तर हतबुद्ध झाले होतेच, पण श्रेष्ठ समजला जाणारा ब्राह्मणवर्गही इस्लामी आक्रमणाला नमून वागू लागला. मुसलमानी राज्यकर्ते हिन्दूंनी शांतपणे पत्करले हे एकनाथ व खुद्द त्यांचे गुरु जनार्दनस्वामी यांच्या व्यवसायावरून दिसून येईल. बहामनी राज्य फुटल्यावर शाखा राज्यांतून सैनिक, सेनापति, खास पागेचे अधिकारी, मुत्सद्दी, कारकून, हिशेब ठेवणारे व आप्तस्वकीय अशा हरएक नात्याने मराठ्यांचा राजदरबारात प्रवेश झाला. व ते आपल्या गुणांनी महत्त्व पावले. 'सारस्वत'कार लिहितात, "एका हातात कुराण आणि एका हातात समशेर घेऊन सर्व देश महंमदी करू पाहणाऱ्या क्रूर लोकांपुढे आमची सात्त्विक मंडळी बरीच मावळली, असे दिसते." जेत्यांचे सारे काही उच्च दर्जाचे आणि चांगले, अशी हिंदूंचीही भावना झाली. राज्यकर्त्यांची भाषा सफाईने बोलणे व लिहिणे ही एक थोरपणाची व अभिमानाची गोष्ट वाटून वरच्या दर्जाचे लोक मुसलमानी भाषेचा अभ्यास जारीने करू लागले.

आणखी एक हिंदुवरील संकट म्हणजे दरगे होय. फकीर, अवलियांची महती राज्यकर्त्यांमध्ये इतकी वाढली की, त्यांचे शिष्यत्व स्वीकारून राज्यकर्त्यांची कृपा गुरुबंधुत्वाच्या नात्याने संपादन करावयास 'दरबारी हिंदू' टपलेले असत. उघड उघड देवळे पाडण्यापेक्षा ही अवलियाची पद्धत जास्त घातक होती. अवलिया,

१. हॅवेलला हा 'आनंदमय विकासाचा प्रारंभ' वाटतो. हे लक्षात घेण्यासारखे आहे.

२. इ. स. १४७० ते ७४ च्या दरम्यान हिन्दुस्थानात भ्रमण करून गेलेला **निकितन** नावाचा रशियन प्रवासी म्हणतो, "प्रजा अत्यंत गरीब झाली असून राजा व सरदार अत्यंत श्रीमान व चैनी बनले आहेत." (ज्ञानकोश खंड २१).

पीर यांच्या भक्तीचे स्तोम किती माजले याचे गमक म्हणजे दत्त ही देवता मुसलमान फकीराच्या रूपाने आपल्या भक्तांना दर्शन देत असल्याच्या कथा भक्तिमार्गाच्या मराठी वाङ्मयात पुष्कळ असून एकनाथांनासुद्धा तशा स्वरूपात दर्शन घडले असे म्हणतात. दत्ताच्या मूर्तीऐवजी पावलांचे ठसे, अगर त्या आकाराचे दगड ठेवलेले आढळतात. (इस्लामांच्या भीतीचीच ही प्रतिक्रिया !)

भाषा व संस्कृतीची सळमिसळ

मुसलमानांची सत्ता इकडे पसरू लागल्यानंतर त्यांची भाषा, त्यांचा धर्म व त्यांचे रीतिरिवाज हे सर्व ते इकडे जबरीने पसरवू लागले. सरकार-दरबारात फारशी भाषा सुरू झाली. व हळू हळू सरकार-कामासंबंधी सर्व कागदपत्र फारशीत सुरू झाले. फिर्यादी, फैसला, इन्साफ, मोकदम, बिन, शिलेदार, सरदार, हवालदार वगैरे शब्द सरसहा रूढ झालेत. पण राजकारणापासून अलिप्त अशा लोकांवर ही परकी छाया कमी पडली. शहरांपासून किंवा शिष्ट लोकांपासून जितके जितके अंतर जास्त तितके तितके अस्सल हिंदु वळण जास्त टिकून राहिले. दरबारी लेखात व शिष्टांच्या पत्रव्यवहारात मुसलमानी शब्दांचा व प्रयोगांचा खडकून भरणा असलेली भाषा रूढ झाली, तरीही गोंधळ, कथा, कीर्तने वगैरे सारख्या धार्मिक बाबतीत व धर्मग्रंथात मराठी बरीच स्वच्छ राहिली. (उदा. विठ्ठल गलंडूचा 'रत्नदीप' हा ग्रंथ.) परकी अंमल बायकांच्या राज्यप्रांतात फारसा प्रवेश करू शकला नाही. त्यांच्या अंगीं मुरलेल्या पुराणप्रियत्वामुळे व त्यांच्या विचाराशी एकजीव झालेल्या धर्मसमजुतीमुळे त्यांच्या व्यवहारात मराठी वळणाचे आणि मराठी भाषेचे स्वरूप बरेच कायम राहिले.

प्रतिक्रिया

मुसलमानी अंमलाखाली भक्तिसंप्रदाय वाढीस लागला. त्याचा परिणाम त्या संप्रदायावर झाल्याशिवाय राहिला नाही. इस्लाम धर्मातील काही गोष्टी वारकरी संप्रदायाने आत्मसात केल्या. (१) वर्षातून दोन वेळा वारी करणे– वारकरी संप्रदायाची दीक्षा घेणाऱ्याने कोणत्या तरी एकादशीस पंढरपूरला वारी करण्याचा नियम पत्करावाच लागतो. (२) प्रचाराचे साधन म्हणून कीर्तनाचे महत्त्व वाढले. इस्लामी आक्रमणाची प्रतिक्रिया म्हणून अशा साधनांचा अवलंब होणे अवश्य होते. (३) इस्लाम धर्मात पुरोहितवर्गाला स्थान नाही. त्या धर्माप्रमाणे देव आणि मनुष्य यांच्यात मध्यस्थ लागत नाही. याबाबतीत भागवतधर्माशी साम्य "भक्तिमार्ग हा मूलतः वैदिक पौरोहित्य आणि यज्ञविधि यांना विरोधक म्हणून जन्माला आला आहे."[३] ... संतांनी पुरोहितवर्गाला काढले व गुरूला आणून बसविले. (४) मुसलमानी धर्मातील काही आचारविचार संतसंप्रदायात शिरले, तसेच मुसलमानधर्मियांनीही संतसंप्रदायाचा स्वीकार केला. बहिरा पिसा वैतागून मुसलमान झाला व नंतर पुन्हा वारकरी संप्रदायात शिरला. 'मृत्युंजय' ऊर्फ बामनी मुंतोजी हा बेदरच्या राजघराण्यातील पुरुष. शेख महंमद, शेख फरीद, शेख सुलतान, शेख सय्यद वगैरे कित्येक विठ्ठलभक्त होऊन गेले. शेख महंमदाचे मराठीत चार काव्यग्रंथ उपलब्ध आहेत. चांद बोधले याचा गुरू व रेणुका तेलीण याची भक्तीण. शेख महंमदाने मुसलमानात वारकरी पंथाचा बराच प्रसार केला असावा.

असो १४ व्या व १५ व्या शतकातील राजकीय व सामाजिक घडामोडी, त्याचे मराठी संस्कृति व मराठी जीवनप्रणालि आणि भाषा यावर जे इष्टानिष्ट परिणाम झाले त्याचा येथपावेतो विस्ताराने परामर्श घेतला. या द्विशतकात निर्माण झालेल्या वाङ्मयाचे अंतर्बाह्य स्वरूप व व्याप्ति याची कारणमीमांसा तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करणे सत्यशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळेच पार्श्वभूमी थोडी विस्तारिली.

अशाही परिस्थितीत मराठी साहित्याची जमेल ती सेवा करून मराठी सारस्वत परंपरा खंडित न पडू देण्याची ईर्ष्या बाळगणारे जे काही थोडे ग्रंथकार या काळात झाले, त्यांचे कार्य फार मोठे मानावे लागेल. प्राचीन मराठी साहित्यातील या काळरात्रीत, मधून मधून आपल्या मंदमधुर तेजाने लुकलुकत राहून आपले अस्तित्व दाखविणाऱ्या तारकांचे सौंदर्य आणि कलात्मक महत्तता कोण नाकबूल करील ? अशा या सारस्वतभक्तांचा व त्यांच्या कलाकृतींचा विचार आपणास या ठिकाणी करावयाचा आहे.

३. 'History of Indian philosophy' – बेलवलकर व रानडे.

अनुक्रमणिका

– २ –

इस्लामी संस्कृति आणि इतर अनेक पंथ यांच्या रगाड्यातून आपला जुना धर्म व संस्थाही कायम ठेवण्याचा प्रयत्न या काळात झाला. सर्वसाधारण लोक, जे चट्कन मनाला भुरळ पडून इतर पंथांत जात. अशांना वेदान्तपर तत्त्वचर्चेत कितीशी चव असेल ? नामदेवाने वेदान्तापेक्षा भक्तिमाहात्म्य व नाममाहात्म्य या सुलभ व हृदयाला जाऊन भिडणाऱ्या साधनेवर जोर देऊन बहुजनसमाजाचे चित्त पाहता पाहता खेचून घेतले. तीर्थयात्रेत नामदेवाची गोड वाणी ऐकताना श्रोते देहभान हरपलेले पाहून ज्ञानोबाही रसिकतेने त्यातील मर्म ओळखून 'हरिमुखे म्हणा, हरि मुखे म्हणा' यासारखे श्रोत्यांच्या अंतःकरणाला तात्काळ हेलावून टाकणारे अभंग गाऊ लागले.

पण नुसत्या नामसंकीर्तनानेही फार काळ डुलत ठेवणे कठीण आहे, हे लक्षात आल्यावर नामदेवाने ' श्रीकृष्णचरित्र ' गावयास प्रारंभ केला. सामान्य श्रोत्यांची ही भावना लक्षात घेऊन पुढील कवींनी आख्यानावरच अधिक भर दिला. (' इस्लामी धर्माची प्रतिक्रिया म्हणून कीर्तनाचे महत्त्व वाढले, हे वर विवेचिलेच आहे.)

१४ व्या शतकातील कवींच्या कृतींचा आढावा घेतल्यास भागवताच्या दशमस्कंधाच्या आधारे श्रीकृष्ण-चरित्राचे गुणगान करण्याची वृत्ति दिसून येते. याच संदर्भात काही कवींचा विचार करताना सर्वप्रथम बहिरा जातवेदाची आठवण होते.

बहिरा जातवेद

बहिरा जातवेद ऊर्फ बहिरंभट हा भागवत दशम स्कंधाच्या आधारे सविस्तर वर्णन करणारा नामदेवाच्या पुढील पिढीतला कवि होय. याने दशमस्कंधावर मोठ्या प्रेमळ व रसाळ भाषेत ९० अध्याय व २५८०६ श्लोक अशी प्रदीर्घ ' **भैरवी** ' नावाची टीका लिहिली आहे. संस्कृत कवि श्रीधराचे पावलावर पाऊल टाकून आपण जात आहोत, असे कवि स्वतः सांगतो. परंतु अनेक प्रसंगी (उदा० रुक्मिणीस्वयंवर, विवाहवर्णन इ०) विस्तार आहे. ' भैरवी ' तील कवीच्या काव्य-गुणांचा ओझरता परिचय करून घेऊ–

यशोदा मातेने बाळाच्या कानात फुंकर घालून त्याला गोपींच्या हाती दिल्यावर, कवि गातो की, त्या गोपींनी–

एकी कृष्ण पाऊले दोन्ही । लाविली आपुल्या वदनी ।
एकी हृदय स्पर्शुनि । कुचावरी ॥
एकी चुंबिता कृष्णस्तन । तो खदखदा हास्यवदन ॥

कृष्ण बघायला तरी केवढी धावपळ !

आता गोपिकांची लाहाकी । शृंगारू करती एकीमेकी
चाला चाला गे नवल की । यशोदेसी पुत्रु ॥
लौकरी चाला गे साजणी । पुत्रेसी ओवाळु बाळंतिणी
नेत्रीं सूदले आंजण । पहावया यशोदेचे निधान ॥

गुरुच्या स्तवनाला काही ओव्या वाहणे ही ज्ञानेश्वरांनी रूढ केलेली प्रथा पुढील सर्व कवींनी ताजी ठेवलेली आहे. बहिरोबाने आपला गुरु जो चिंतामणि त्याच्याच प्रसादाने काव्य लिहितो आहे, असे सांगितले आहे. कवि स्वतःच आपल्या काव्याचे वर्णन करतो–

श्रीभागवत दशमस्कंध देखा ।
त्यावरील केली महाराष्ट्र टीका
त्या सप्रेम ओव्या अमोलिका ।
ऐकता पाविल निजसुख ॥

आणिक पदपदांतरी शेवटी । काव्य रचिले बहिरंभटी
दूरिते पळती उठाउठी । कर्णसंपुटी ऐकता ॥

बहिरा जातवेदाविषयी अनेक वाद आहेत. त्याच्या नावापासून तर भैरवीतील ओवीसंख्येपर्यंत सारेच विद्वानात मतभेद आहेत. परंतु या वादात पडण्याचे आपणास काहीच कारण नाही. व प्रस्तुत लेखाच्या विषयानुरोधाने त्याला महत्त्वही नाही.

असाच वादविषय झालेला या शतकातील दुसरा कवि **चोंभा,** आणि त्याचे मनोहर काव्य **' उषाहरण. '** उषाहरणाची कथा अगोदरच फार आकर्षक व सांगितलीही तितक्याच रसाळ शैलीत. मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या वेदान्तमय लिखाणानंतर पुढील कवींनी सामान्य जनतेला आस्वाद घेता येईल असे कथाकाव्य रचिले. यातलाच एक कवि **चोंभा** होय.

याचे कवन नेहमीच्या प्रचाराबाहेरचे. ओवीछंदाचा उपयोग, पण ओवींचा प्रकारही निराळा. १, ३ व ४ चरणांच्या अन्ती यमक व २ रा चरण निर्यमक असतो. पण हाही क्रम चोंभा नेहमी पाळतोच असे नाही.

अनुक्रमणिका

उपलब्ध प्रकरणातील काही ओव्या–

बाणासुर व कृष्ण यांच्या युद्धप्रसंगी, कवि गातो–

शैवा आणि वैष्णवासी । जाले हरिहर मिसळले
बाप झुंज विपरीत । आपण आपणेया रसले ॥

(अलीकडील उपलब्ध ओव्यातून)

बाणासूर अनिरुद्धाला उषेच्या महालात पाहून संतापतो–

" कुमरी नव्हेरे पापिणी । आपबुद्धि परद्वारिणी
कुळा लांछन लाविले । उदरीं जन्मली वैरिणी ॥

बाणासूर अनिरुद्धाला म्हणतो–

राऊळीं रिगालासि चोरू । नेऊं आदरिलें लेकरू ।

'उषाहरण' कर्त्याविषयी बनहट्टी म्हणतात, " स्वकालीन लौकिक व्यवहारातील तपशिलाची भर घालून कथेचा विस्तार वाढविण्याची याची हातोटी आहे... हिचेच ठळक स्वरूप मुक्तेश्वरात दिसते.[४] "

कान्होपात्रा

या कालात संतकवयित्रीत कान्होपात्रा हे नाव विशेष लक्षात येते. हिच्या जन्ममृत्यूचे शक उपलब्ध नाहीत; पण ती १४ व्या शतकाच्या अखेरीस होऊन गेली असावी असा समज आहे. ही मंगळवेढ्यातील **शामा** नावाच्या नायकिणीची मुलगी, भक्तिपंथात शिरली व विठ्ठलचरणी देह ठेविला. कान्होपात्रेचे थोडे अभंग उपलब्ध असून ते आर्त जनाबाईची आठवण करून देणारे आहेत.

त्रि-पाठक

वडवानळ नागेशाच्या शिष्यवर्गात पाठक मंडळींचा वारंवार उल्लेख येतो. त्यापैकीं तीन पाठक प्रसिद्ध आहेत. कान्हो पाठक, नामा पाठक व निर्मळ पाठक. यापैकी निर्मळ पाठकाचे ओवीबद्ध पंचतंत्र उपलब्ध आहे.[५] याचे शेवटी–

' पूर्वी प्रति होती मोकळी । ते वोवीबंधे संकळली
महासाक्षेपे निपजविली । म्हणे निर्मळ पाठकु ॥'

–असा उल्लेख आहे.

नामा पाठकाची बरीच कृति उपलब्ध आहे. 'नामरत्नमाला', 'भरतभेट' वगैरे सारख्या लहान लहान प्रकरणांशिवाय व पदाशिवाय याचा **'अश्वमेध'** हा मोठा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे ९५ प्रसंग आहेत. भाषा व रचना अगदी साधारण प्रतीची आहे. " पोतदारांना मिळालेल्या 'एका मराठी अश्वमेधाची काही जीर्ण पाने' याच कवीच्या अश्वमेधापैकी असावी " असा डॉ. तुळपुळ्यांचा तर्क आहे.

या नामा पाठकाचा आजा तोच **कान्हो पाठक**[६] याचा विचार प्रस्तुत निबंधात करण्याचे वास्तविक कारण नाही. पण तुळपुळयांना त्याचे ज्ञानेश्वरसमकालीनत्व संशयित वाटते. (' जर **कान्हो पाठक** व **कान्हो त्रिमलदास** एक असतील तर...शं. गो. तु.) म्हणून कान्होचा फक्त निर्देश केला आहे.

तत्त्वज्ञानपर ग्रंथ

या शतकात एक वडवाळसिद्ध नागेश व दुसरा अज्ञानसिद्ध नागेश असे दोन कवि आढळतात. वडवाळसिद्ध नागेशाची[७] काही पदे व थोडेसे अभंग, आणि ' संकटहरणी शिवग्रंथ[८] ' एवढीच कृति उपलब्ध आहे. हा ज्ञानेश्वर समकालीन असावा, ही रूढ समजूत आहे.

अज्ञानसिद्ध नागेश वरील नागेशाचा शिष्य दिसतो. याच्याविषयी प्रा. आवळीकर यांनी 'नागेशलीलामृत[९]'

४. ' महाराष्ट्रजीवन ' खंड २ रा. - संपादक गं. बा. सरदार.

५. १३ व १४ व्या शतकातील उपलब्ध मराठी भाषेतील पंचतंत्रे गद्यात असून त्याची भाषा साधी व सोपी आहे. या गद्यपंचतंत्रावरून निर्मळ पाठकाने ओवीबद्ध पंचतंत्र अनुवादिले आहे.

६. **कान्हो पाठक**- " हा श्रीज्ञानेश्वर महाराजांचा समकालीन ... नागनाथाचा शिष्य असून नागनाथही ज्ञानेश्वरसमकालीन असावा असे म्हणणे भाग पडते." – वि. ल. भावे.

७. काळ– शके १२९० ते १३४०.

८. काळ– शके १३१३.

९. या ग्रंथाचा काळ चेंद्रे यांच्या मते इ. स. १९३४ असून, आवळीकर हा काळ इ. स. १८३४ च्या आसपास ठरवितात.

अनुक्रमणिका

या अप्रसिद्ध ग्रंथाच्या आधारे बरीच माहिती दिली आहे. या ग्रंथकाराच्या मते, अज्ञानसिद्ध नागेश हे नाथसंप्रदायी नसून चैतन्यसंप्रदायी आहेत. त्यांचे 'वरदनागेश', तत्त्वबोध, जीवब्रह्माभेदलक्षण, पृच्छापत्र व कालज्ञान असे पांच ग्रंथ आहेत. 'संकटहरणी' हाही ग्रंथ त्याचाच असण्याची शक्यता डॉ. तुळपुळे दर्शवितात. याशिवाय त्याच्या नावावर गुरुशिष्यसंवाद, कालज्ञान व पंचीकरणप्रमेय इतके ग्रंथ आढळतात. पैकी अखेरचा ग्रंथ अविधभाषेत असल्यामुळे या कवीचा काळ १४ व्या शतकाच्या अखेरीस यावा, असा 'सूचि'कारांचा तर्क आहे. या दोन कवींविषयी विश्वसनीय माहिती अद्याप उपलब्ध नाही.

महानुभावीय वाङ्मय

हे शतक महानुभावीय काव्यासाठी नव्हे तर पंथीय तत्त्वज्ञान विशद करणाऱ्या तात्त्विक स्वरूपाच्या वाङ्मयासाठी प्रसिद्ध आहे. चक्रधराच्या शिकवणुकीचे व तत्त्वज्ञानाचे निबंधन करण्याचा उद्योग **आनेराजबास** आणि **परशराम बास** यांनी पुढे चालविला. आणि त्याची परिणति प्रस्तुत शतकात **गुर्जरशिवव्यास** व **सिद्धान्ते हरिव्यास** या विद्वद्वर्यांच्या कृतीत झाली. या दोघांनी मिळून चक्रधरोक्त सूत्रातील 'लक्षण, आचार व विचार' या तिन्ही स्थळांची बांधणी शके १३२५ च्या सुमारास पूर्ण केली. गुर्जर शिवव्यास हे कवीश्वराम्नायातील अचळ मुरारी याचे शिष्य. गुर्जर शिवव्यासास 'तिन्ही स्थळांची बांधणी' करावयास उपाध्याम्नायातील धाराशिवकर ओंकार व्यास यांचे शिष्य सिद्धान्ते हरिव्यास यांचे साहाय्य झाले.

नवरसनारायण–

या महानुभावीय ग्रंथकाराचे महाभारत आहे. याने कृष्णकथा बदलून सांगितली आहे. याचे खरे नांव शार्ङ्गधर पंडित व उपनाव भोजने ?[१०] याच्या ग्रंथातील फक्त **शल्यपर्व** उपलब्ध आहे. मूळ कथांचा क्रमभंग हा याच्या रचनेतील मुख्य दोष आहे. शल्यपर्वातील काही ओव्यावरून नवरसनारायणाने संपूर्ण महाभारत मराठीत आणले असे डॉ. यू. म. पठाण ठरवितात.

महानुभाव ग्रंथकारात या नवरसनारायणापेक्षा विशेष विद्वान् असे दोन ग्रंथकार या काळात होऊन गेले.

एल्हण

एल्हण कवि ब्रह्मविद्येच्या किंवा मोक्षसाधनेच्या फारसा नादी न लागता त्याने कृष्णचरित्राचे प्रवचन केले आहे. याचा '**अष्टविवाह**' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे संपूर्ण नाव 'श्रीकृष्ण षोडशसहस्र विवाह अष्टस्वयंवर वर्णन' असे आहे. याचे एकंदर १२ भाग किंवा प्रसंग आहेत. दहा भागापर्यंत आठ नायिकांचे विवाह, अकराव्या प्रसंगात १६००० राज्यकन्यांशी विवाह याविषयी वर्णन आले आहे. बाराव्या प्रसंगात या सर्व कांतासह श्रीकृष्णाने वसंतक्रीडा केल्याचे वर्णन आहे. क्रीडावनात विहाराच्या वेळचे वर्णन कवीच्या शृंगाररसपूर्ण शैलीचे प्रत्यय आणून देणारे आहे. पुढील काही ओव्या कवीच्या रसानुकूल लेखणीतून बाहेर पडल्या आहेत —

की तेथ ऋतुरायाचा विवाहकाळीं :
वनश्री नोवरी केळावली
तेथ वऱ्हाडणी अफावणी केली : राजगृहींचिया ॥
कीं अश्वगतीचे वारे सुटले :
तेथ बुंथीचें आभाळु वितुळलें
आतुल गोरें रूपचंद्र झळकले : लावण्यकळासीं ॥
मुखचंद्र उगवलें दिसती शुभ्रगोरें :
बखलें उद्यानदारिचें अंधारें
सुस्मित हास्याचें चांदिणें विखुरें :
आंगीचिया शृंगारावरी ॥

क्रीडावनातील त्या मोकळ्या वातावरणात आल्यावर स्त्रियांचे लज्जासुलभ भाव लोपून त्याही कशा मोकळ्या झाल्या, याचे कवी मोठे मोहक वर्णन करतो.

लज्जाछादिले स्त्रीत्वाचे भाव : ते पडिले बाहेरी ॥
तिये उघडी कामिनीरूपे बियाळे :
देखोनि पक्षिये मदनमातावळे
झाडा उपजति डोहाळे : प्रमदामुखाचे
... ... संयोगाचिया लालसेपणा :
वरी लावण्ये निरवावेयाची कामना
कैसिया सळे चालिल्या मृगनयना : त्रैलोक्यनाथावरी

---

१०. हे वि. ल. भाव्यांचे मत शार्ङ्गधर भोजने हा नवरसनारायणाचा गुरू असे शं. गो. तुळपुळे ठरवितात. व हेच मत प्रा. आवळीकर व डॉ. पठाण यांनी व्यक्त केले आहे.

–' झाडां उपजति डोहाळे, प्रमदासुखाचे' ही कविकल्पना त्याच्या अभिजात रसिकतेची द्योतक आहे. वरील अगदी मोजक्या ओव्यांवरूनही एखाद्या रसिकाला पूर्ण ग्रंथच वाचावासा वाटेल, यात काय संशय ?

या एल्हणपंडितापेक्षा **चाल्हण** पंडित विशेष विद्वान होता. याचे ' सत्त्वानुवाद ', ' ज्ञानप्रकाश ', ' शास्त्रसंबोधिनी टीका ' असे तीन ग्रंथ आहेत. हा स्वतःच्या ग्रंथरचनेपेक्षा नृसिंहाच्या (याचा शिष्य) ग्रंथरचनेमुळे अधिक प्रसिद्ध झाला. चाल्हणाच्या नावावर नृसिंहाने ' संकेतगीता ' लिहिली आहे, असे म्हणतात.

याचकाळी **भीष्माचार्य** नावाचा विद्वान ग्रंथकार होऊन गेला. (याच नावाचे तीन ग्रंथकार आहेत.) याची ग्रंथरचना विविध आहे. नाममाला, स्मरणमाला, प्रसादमाला, मूर्तिज्ञान वगैरे भक्तिपर रचनाही याने केली आहे. जयदेवकृत ' गीतगोविंदा' वर ' महाराष्ट्र सुबोधिनी ' या नावाची टीका याने लिहिली आहे. परंतु हा **' पंचवार्तिक '** कार भीष्माचार्य म्हणून अधिक ओळखला जातो. ' पंचवार्तिक ' हा भाषाशास्त्रावरील एक लहानसा निबंध आहे. यात सूत्रलक्षण, सूत्रप्रकृति, सूत्रकारक, सूत्रव्याख्यान व सूत्रस्वरूप अशी पाच प्रकरणे आहेत. यात भाषाशास्त्राच्या निरनिराळया भागाचे नियम सांगितले आहेत. वचन, वाक्य, महावाक्य, प्रकरण, समास वगैरेच्या व्याख्या व विस्तृत सोदाहरण स्पष्टीकरण आढळते. १४व्या शतकातील मराठीचा व्याकरणविषयक असा हा ग्रंथ मराठियांना निःसंशय अभिमानाचा वाटेल. ' मराठीतले पहिले व्याकरण' म्हणून ' पंचवार्तिका 'ला वाङ्मयेतिहासात महत्त्व आहे.

१४ व्या शतकाच्या अखेरचा महानुभावीय ग्रंथकार **डिंभ**[११] होय. महानुभावीय सर्व ग्रंथकारांची माहिती या **डिंभ** (किंवा कृष्णमुनि) याने रचिलेल्या एका 'अन्वयस्थळा'त मिळते. हा कवि दामोदर-सिवराज-बह्लाळ-कृष्णमुनि याप्रमाणे परंपरा देऊन स्वतःस कवि डिंभ म्हणवितो. याचे ' अन्वयस्थळ ' वाङ्मयेतिहासदृष्टया महत्त्वाचे आहे.

सारांश १४ व्या व १५ व्या शतकातील महानुभावांचे कार्य फार महत्त्वाचे आहे. गुर्जरशिवव्यास ते डिंभपर्यंतचे सात ग्रंथकार अंधकारातील लुकलुकणाऱ्या तारकातील सप्तर्षी ठरावेत.

पंधरावे शतक

चौदाव्या शतकातील बहुतेक वाङ्मय पद्यमय व विशेषतः ओवीबद्ध आढळते. परंतु पंधराव्या शतकारंभी लिहिला गेलेला **गद्यग्रंथ** अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. तो म्हणजे केशवाचार्यांनी लिहिलेली प्रसिद्ध **' महिकावतीची बखर**[१२] **'** केशवाचार्य हा मराठीतला पहिला बखरकार होय. बखरीच्या सहा प्रकरणापैकी दुसरे व तिसरे प्रकरण गद्य असून त्याचा लेखक **केशवाचार्य** आहे. बाकीची पद्यमय रचना **भगवान दत्त** नामक कवीने केलेली आहे. शके १०६० ते १३७० पर्यंतचा भाग या बखरीत देत आहे, असे बखरकार म्हणतो. तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब यात पडलेले दिसते. केशवाचार्य लिहितो, "याउपर राज्य हे तुरकाण फार बळकट जाले ॥... जर पुढे भविष्योत्तर पुराणीचे संमत असे की हे वर्ण फार पीडतील ॥ वर्णावर्ण ओळख जाईल ॥ तेधवा ब्राह्मण आपला अभिमान धरून या लेखाचा संग्रह ठेवतील ... "

भगवान दत्त

याने लिहिलेली प्रकरणे शके १५०० ते १५१६ मधील असावीत, असे राजवाड्यांचे मत आहे. भगवान दत्ताचीं प्रकरणे त्याच्या मनोवृत्तीची नीट साक्ष देतात. अनेक ओव्यातून कवीच्या वृत्तीचा दुबळेपणा, भोळसट वृत्ति व भेदरटपणा दिसून येतो. उदा०–

चौथ्या ' चिंतामणिकौस्तुभपुराणा'तील ऐतिहासिक असे, ज्ञानेश्वरकालीन रामराजाच्या काळच्या म्लेंच्छ आक्रमणाविषयीचे कवीचे मत–

तेथ माहामद प्रश्न अवतार । स्थिरावला जैसा डोंगर
तेथ प्रधान गेला सत्वर । पत्र दीधले तयासी ॥ २७

११. डिंभ– काळ शके १४०० च्या सुमारास. डिंभ हें व्यक्तीचे नांव नसून कुलाचे आहे. असे ' निरूक्तशेषा 'च्या आधारे श्री. कानोले म्हणतात.

१२. ' महिकावतीच्या बखरीतील. केशवाचार्याने लिहिलेला **गद्यभाग** शके १३७७ मधील आहे, असे राजवाड्यांचे मत आहे. बनहट्टींना हे मत मान्य नाही.

अल्लाउद्दिनास 'ब्रह्मावतार' म्हणणारा हा भगवान दत्त 'लोकहितवादीं'चा पूर्वज असावा, असे वाटते. गंमत ही की, या अल्लाउद्दीनापुढे कुलदेवीचे काही चालत नाही. ती म्हणते–

माझे न चले काही बळ । म्लेंच्छाकडे तोहि गोपाळ
होईल हलकल्लोळ ! अशुद्ध वाहे भडभडा ॥ ४४ ॥

आता 'गोपाळ'च यवनाला जाऊन मिळाला (कालयवनाच्या वेळचे वैर विसरून !) तर रामदेवराव कसा बरे विजयी होईल ? [१३]

बखरकार शेवटी समारोप करतो की, यादवांचा नाश होणार हे नियतच होते.

"ऋषिभाषित यथार्थ । भविष्योत्तरी कथिलें सत्यार्थ
ऋषि वक्ता पूण्यमूर्त । यथानुक्रमे ॥"

राक्षसतागडीचा संग्राम–

या बखरीविषयी द. वि. आपटे यांनी 'इतिहास-मंजिरी'त विस्तृत विवेचन व उतारे दिले आहेत. विस्तारभयास्तव, नमुन्यादाखल एकदोन वाक्ये उद्धृत करतो. "... अलि येदलशाहा व बऱ्हाडदेश पादशहा हे दोघेजण एकाएकी राजभुवरावरी (रामराजावरी) घोडे केला (हल्ला केला) पाउष्यादे लोक रोटिपोळे करून घेत होते. तो येही जाऊन सभा पडोन खत्म केले ..."

या काळातील वरील पद्यगद्यावरून नामदेव ते एकनाथ या मध्यंतरीच्या इस्लामी तमोयुगातही मराठी साहित्यिकांनी आपल्या मंदतेजाने साहित्याची प्रकाश-रेखा अखंड तेवत ठेवली हे दिसून येते. या युगातील धार्मिक आक्रमणाविरुद्ध अतिरेकी प्रतिक्रिया म्हणून सोवळया ओवळयाच्या कडक पथ्याचा पुरस्कार करणाऱ्या 'गुरुचरित्र' ह्या शेवटच्या ग्रंथाचे अवलोकन करून समारोप करू.

श्रीगुरुचरित्र

सोलापूरच्या पुढे कर्नाटक सीमेवरील गाणगापुरात (शके १३०५ ते १३८०) या कालात 'नृसिंह सरस्वती' हा प्रभावी संत होऊन गेला. याचा चरित्रपर ग्रंथ शके १४६० च्या सुमारास, याचाच शिष्य सरस्वती गंगाधर याने रचिला. हेच ते गुरुचरित्र.

हा ग्रंथ दत्तभक्तगणात अद्वितीय मानला जातो. अद्भुत शक्तीवर जनतेचा विश्वास दृढ व्हावा, अशी या ग्रंथाची एकंदर रचना आहे. सोवळया–ओवळयावर व जातीच्या जन्मजात वरिष्ठ-कनिष्ठपणावर भर देणारा असा हा गुरुचरित्रकाराने वर्णिलेला नृसिंहसरस्वती संप्रदाय होता.

तत्कालीन हिंदु मनोवृत्तीचे चित्रण या ग्रंथात पहावयास मिळते. उदाहरणादाखल ग्रंथाचे धावते दर्शन घेऊ–

सप्ताह करणारांना आश्वासन–

रोग नाही तया भवनी । सदा संतुष्ट गुरूकृपेकरोनी
निःसंदेह सातदिनी । ऐकता बंधन तुटे जाय ॥

कलीचें वर्णन. (अध्याय २ रा)

वामहाती धरोनी शिश्न । येत ब्रह्मया सन्मुख

कलीचे कुलगोत्र–

परद्रव्यहारक परस्त्रीरत । हे दोघे माझे भ्रात
प्रपंच, मत्सर, दंभक । प्राणसखे माझे असती

ब्रह्मदेव कलीला भरतखंडांत पाठवितो व त्याच्या चरितार्थाची व्यवस्था करतो. "तूं जातासि भूमीसी । तुझे ईच्छे रहाटतील" इति ब्रह्म ते कलि ! पण लगेच 'जो गुरुसेवा करील तो तुला वश होणार नाही' असे गुरुभक्तीचे तुणतुणे वाजविले आहे.

चरित्रवचनाचा महिमा–

"जैं भक्तीने सप्तक एक । पठति ऐकोन भक्तलोक
काम्य, होति तात्कालिक । निपुत्रिका पुत्र होती ॥

यानंतर भस्माचे माहात्म्य, ते कुठे, कसे लावावे याविषयी सुमारे, २५० ओव्या खर्ची घातल्या आहेत. पन्नासाव्या अध्ययात, गुरूने राजाचा फोड बरा केल्यावर त्या म्लेंच्छ राजाने,

महासिंहासनस्थानी । शृंगारू केला अतिगहनी
जगद्गुरुते नेऊनी । सिंहासनी बैसविले ॥
[मात्र राज्य यवनांचेच !]

आणि नंतर काय चमत्कार !

पुढे येतिल दुर्दिन । राजा असे यवन
अनाचारी विषयासक्त जन । म्हणोनि गुप्त राहिले ॥

हिंदूंच्या भेकड, भोळसट मनोवृत्तीचे, परधार्जिण्या वृत्तीचे व दैन्यावस्थेचे, स्वतःच्या अस्मितेची जाणीव

१३. महिकावतीच्या बखरीतील ऐतिहासिक चूक, 'रामरायासी वधिले महामुदे' ॥ २८ ॥

नष्ट झाल्याचे उदाहरण म्हणून, या ग्रंथाचे एवढे विवेचन केले. परकीयांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक या सर्वच बाबतीत आम्हाला जिंकून घेतले व आमची मने किती दुबळी केली, याचे हे भयानक दर्शन. 'गुरुचरित्रा'च्या नवव्या अध्यायात गुरू एका धोब्याला 'म्लेंच्छ हो' असा आशीर्वाद देतात, ही घटनाही ह्या संदर्भात चरित्रकाराच्या दुबळ्या मनोवृत्तीची द्योतक ठरावी.

सिंहावलोकन

'प्राचीन मराठी साहित्यातील काळरात्र' ठरणाऱ्या १४ व्या व १५ व्या शतकातील ग्रंथनिर्मिति पाहिली. आणि मुसलमानी आक्रमणानंतरची दोन शतके वाङ्मयनिष्पत्तीच्या दृष्टीने शून्य, ओसाड गेली, ही जी सर्वसाधारण समजूत आहे, ती सर्वांशी खरी नाही, हेच आपणाला दिसून आले. अमाप ग्रंथनिर्मितीची अपेक्षा या कालाकडून करणे शक्यच नव्हते. शिवाय या काळातील अनेक ग्रंथ अद्याप उपलब्ध नसल्यामुळेच हे द्विशतक 'मराठी साहित्यातील काळरात्र' आहे, असे आपण म्हणतो.

परंतु उपलब्ध वाङ्मयाचे सूक्ष्मावलोकन केल्यानंतर आणखी एका वेगळ्या अर्थाने 'काळरात्र' हे नामाभिधान सार्थ ठरते. 'तमोयुगा'तील ह्या समग्र वाङ्मयावर, एवढेच नव्हे तर वाङ्मयबाह्य क्षेत्रातही, इस्लामी संस्कृतीची जबरदस्त छाप उमटलेली दिसते. रामकथा व कृष्णकथांना या काळात बराच ऊत आला होता. पण त्याही कथा अनेकदा सत्यस्थितीचा अपलाप करून लिहिलेल्या. राधाविलास, चंद्रावळीवर्णन, वगैरे शृंगारिक आख्याने, गोपींच्या लीला वगैरे कृष्णचरित्रातील भाग विशेष रंगवून सांगण्याची प्रवृत्ति वाढली होती. 'नाचू कीर्तनाचे 'रंगी' एवढेच लक्षात राहिले आणि 'ज्ञानदीप लावूं जगीं'चा पूर्ण विसर पडला. महानुभाव पंथाने आपले तत्त्वज्ञान व चक्रधराचे मोठेपण पटवून देणारे ग्रंथलेखन केले. मराठी मनाला इस्लामी धर्माच्या प्रतिकारार्थ सिद्ध करण्याच्या कामी याचा कुठला उपयोग होणार होता. प्रत्यक्ष 'हाती शस्त्र घेऊन रणांगणावर जा' असे सांगणारा संदेश द्यायला हवा असे नाही. मराठी अस्मितेची बूज राखून, मराठी मनुजाला स्वत्वाची, आत्मतेजाची ओळख करून देण्याचे कार्य करायला हवे असते. कमीत कमी स्वतःला हे साधले नाही, तर ज्या संतश्रेष्ठांनी हे सांगून ठेवले आहे, त्यांच्या ग्रंथांची तरी योग्य जपणूक झाली काय ? ज्ञानेश्वरीनंतर अवघ्या २०० वर्षांच्या काळात नाथांना शुद्ध प्रत तयार करणे कठीण जावे, याचा अर्थ काय ? 'गुरुचरित्रा'चा सप्ताह पाळायला सांगणाऱ्यांनी 'ज्ञानेश्वरी'चे एकदा तरी पारायण करावे असे सांगितले आहे काय ? 'महिकावतीच्या बखरी'तील पत्रकार भगवान दत्त, किंवा गुरुचरित्रकार सरस्वती-गंगाधर यांचे तर उद्गार वाचून चीड यायला लागते. स्वतः कमकुवत झालेली मने लेखन करू लागली, तर त्यांच्या लेखनातून मराठी जनतेला कुठला दिलासा मिळणार होता ?

श्रीगुरुचरित्र या ग्रंथाविषयी द. के. केळकर लिहितात, "....(सद्‌गुरु) मृताला जीवन देण्याचे अद्‌भुत चमत्कार सहज करीत पण परधर्मीय आक्रमणाविरुद्ध जनतेला जागृत करण्याऐवजी "प्रगट झाली बहुख्याति । आता रहावे गुप्तरूपे ॥" असे म्हणत गुप्त होत. मुसलमान पवित्र व जागृत मानलेल्या मूर्तींची मस्तके उडवीत तेथे ती मस्तके पुन्हा बसविण्याचा अद्‌भुत चमत्कार मात्र कोठेही चमकला नाही..."

महिकावतीची बखर घ्या, गुरुचरित्र घ्या, दोन्हीतही एकतर अद्‌भुत चमत्कार, दृष्टान्त, स्वप्ने यांचा सुळसुळाट, नाही तर व्रतवैकल्ये, उपास-तापास किती करावे. भस्म अंगाला किती वेळा चोपडावे, याचीच जंत्री दिसते.

आपल्या संस्कृतीवर, आचारविचारावर ज्यांच्या संस्कृतीची विलक्षण छाप पडली आहे. त्या संस्कृतीचा मुळापासून शोध घेण्याची गरज कुणालाही भासली नाही. एका हातात कुराण व दुसऱ्या हातात तलवार घेऊन इथे पाऊल टाकून हा हा म्हणता देश पादाक्रांत करणाऱ्या इस्लामियांचा आपण केवळ दुबळा द्वेषच करीत आलो. आपल्या उच्च परिणत व सखोल सहिष्णु हिंदु संस्कृतीवर कशाच्या बळावर त्यांनी छाप मारण्याचे धाष्टर्य करावे, हेही कुतूहल आम्ही जागृत होऊ दिले नाही.

अनुक्रमणिका

या सर्वांचे मूळ आपल्या धर्माकडे आपणच विकृत दृष्टीने पाहू लागलो, यांत आहे. " सर्वधर्मसहिष्णुतेच्या व्यापक दृष्टिकोनात विरोधाची भावनाच उद्भवू शकली नसेल, परंतु याहिंपेक्षा दाट शक्यता आपली संस्कृति ज्या पायावर उभारली गेली आहे त्या पूर्वकर्मसिद्धान्ताचा, लौकिकाबद्दलच्या उदासीनतेचा व वैयक्तिक मोक्षसाधनेचा हा परिणाम असल्याची आहे. " अशी शक्यता व्यक्त करून आपले धार्मिक अधिष्ठानच चुकीच्या मूल्यावर अधिष्ठित आहे. असाही एकांगी निष्कर्ष काही विद्वान काढताना आढळतात. परंतु यात धर्माचा दोष नसून धर्माकडे पाहणाऱ्या तत्कालीन समाजाचा हा दोष आहे. ' सकल लोकसंस्था ' ठरलेला व ' ततो युद्धाय युज्यस्व ' असा संदेश देणारा धर्म ' अहिंसा '-वादी व ' व्यक्तिवादी ' कसा ? ज्ञानेश्वरांनी ' सकल लोकसंस्था ' म्हणून जे धर्माचे सामाजिक स्वरूप व संघटित महत्त्व विषद केले, त्याचे मर्म काही प्रमाणात एकनाथांनी व पुढे पूर्णांशाने रामदासांनीच ओळखले. ' ज्ञानेश्वरी'तील शिकवण अवघ्या ५० वर्षातच, आपल्याच लोकांकडून दुर्लक्षित झाली हा दोष कुणाचा ?

इस्लामी संस्कृतीशी आपला निकटचा संबंध आला होता. त्यांच्या अंगी जे समष्टीरूपाने संघर्ष करण्याचे बीज रुजले, त्याकडे आम्ही जाणीवपूर्वक लक्ष द्यायला हवे होते. त्यांची दृष्टि सतत लौकिकावर खिळली होती. '.ह्याच जन्मी, ह्याच पृथ्वीतलावर आम्ही स्वर्ग मिळवू' ही त्यांची जिद्द होती, एकेश्वरवादाचे निश्चित तत्त्वज्ञान हाताशी, सामूहिकतेच्या प्रबल भावनेमुळे अंगी आलेले विलक्षण सामर्थ्य, लौकिकावर दृढबद्ध झालेली तीक्ष्ण नजर व देशपर्यटणामुळे गाठीशी आलेले मानवी स्वभावपरीक्षेच्या अनुभवाचे भांडवल ! ही मुसलमानांची वैशिष्ट्ये, त्यांची कडवी धर्मनिष्ठा आम्ही लक्षात घेतली नाही. आत्मसात केला त्यांचा रंगेलपणा, त्याची विलासी वृत्ति, त्यांचे ' इष्क ' !

' कर्मसिद्धांता'विषयी आपली चुकीची समजूतही आपल्याला नडली. जी कर्मे गेल्या जन्मी केली, त्याची फळे या जन्मी भोगल्यावाचून सुटका नाही. ह्या दृढ समजुतीमुळे हिंदु माणसांमध्ये एक प्रकारची निष्क्रीय निराश, बेभरवशाची वृत्ति बाणली गेली. त्याचमुळे आजच्या जन्माची फळे पश्चात्जन्मी आपल्यासाठी तयारच असल्यामुळे, आपला ' उद्या ' आपण आपल्या हातानी घडवू शकतो, ही आशा व ईर्ष्या मुळातच मावळते. किंबहुना, ती जन्मच पावू शकत नाही.

ह्या ' पूर्वकर्मसिद्धांता ' बरोबरच सामूहिकतेचे महत्त्व आपण जाणले नाही. देवळांचा विध्वंस, हिंदु स्त्रियांचे अपहरण ह्यासारखे भ्रष्टाचार घडल्यावर, अनेक हिंदूचे धर्मांतर झाल्यावर, पुन्हा त्या स्त्रियांना व धर्मभ्रष्ट लोकांना आपल्या धर्मात घेण्याची दक्षता धर्ममार्तंडांनी घेतली नाही. हिंदू धर्मांतर करून परधर्मात जातात म्हणजे आपल्या धर्मातील लोकसंख्या घटते हा साधा विचार का लक्षात येऊ नये ? अपहृत स्त्रियांना परत आपल्या धर्मांत न घेतल्यामुळे, त्या ' परधर्म'च आपला समजतात, व त्यानंतर त्यांची मुलेही इस्लामधर्मी होतात व इस्लामधर्माच्या प्रतिष्ठेसाठी भारतीयांशी लढतात, हे ऐतिहासिक सत्य आहे.

असो. परकीय आक्रमणाला थोपवून धरण्याचे सामर्थ्य आपल्यात असतानासुद्धा प्रत्येकदा आपण अडलो. आपले अंगभूत दोषच आपल्या घातास कारणीभूत ठरलेत. परकीय आक्रमण आणि परकीय अंमल जिवांची भाषा, आचारविचार, मनोवृत्ति व संस्कृतीलाच उलथून पाडू शकते, हे आपण विसरलो. सैन्यबलाने गेलेले राज्य परत मिळविणे कठीण नाही, पण ' मेलेली मने ' पुन्हा जिवंत कशी होणार ? १४ व्या व १५ व्या शतकात, हिंदु मनोवृत्तीत गुलामी वृत्तीचे बीज पक्के रुजलेले दिसते. अर्थात्, एकाएकी परकीय आक्रमण आल्यानंतर काही काळ दिङ्मूढ अवस्था निर्माण होते, ही गोष्ट खरी. ' किं कर्म किमकर्मेति ' असा प्रश्न सर्वसामान्यांनाच नव्हे तर बुद्धिवंतानाही पडतो. परंतु ही अवस्था दीर्घकाळ असणे राष्ट्रहिताला घातक ठरते. अशा अवस्थेत समाजाला योग्य वळण लावणारा एखादा महापुरुष हवा असतो. १४व्या व १५ व्या शतकात असा एकही द्रष्टा निर्माण झाला नाही, हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य नव्हे काय ? आणि म्हणूनच मूढ जनता अशा अवस्थेत अंधारात चाचपडत गेली.

परकीय आक्रमणानंतर जित्यांचे संपूर्ण जीवनच बदलून जाऊ शकते आणि त्याचाच परिणाम वाङ्मयातील प्रवृत्तीवर दिसून येतो, याचे या लेखातून दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न. १४व्या व १५ व्या शतकात म्हणजे दोनशे वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत हा परिणाम टिकून राहावा व सकस वाङ्मयनिर्मितीच्या अभावी मोठी पोकळी निर्माण व्हावी, ही भीषण दुर्घटना. ज्ञानेश्वर –नामदेवांनी देशभर यात्रा करून भक्तिपंथाचा प्रसार केला व सांस्कृतिक पुनरुज्जीवन घडविले. परन्तु नामदेवानंतर ही परंपरा खंडित झाली. दोनशे वर्षेपर्यंत महाराष्ट्रात निश्चित ध्येयदृष्टीचा अभाव जाणवतो.

असो 'काळरात्र' असली तरी रात्रीनंतर उषःकाल येणारच! आणि या काळरात्रीच्या गर्भातच, एकनाथस्वामी परत प्रतिपदेच्या चंद्रकोरीसारखे येत असल्याची 'उषास्वप्ने' पाहता येतात, ही काय कमी समाधानाची गोष्ट?

'भाष्यकाराते वाट पुसतु'

१. महाराष्ट्र सारस्वत : वि. ल. भावे आवृत्ति ५ वी. [पुरवणी– शं. गो. तुळपुळे]
२. एकनाथ : व्यक्ति आणि वाङ्मय – न. र. फाटक
३. महाराष्ट्र धर्माचे प्रणेते - मुंबई नभोवाणी प्रकाशन (पु. मं. लाड व्याख्यानमाला)
४. मराठी संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य– बा. रं. सुंठणकर
५. महाराष्ट्र जीवन खंड १ व २ संपादक गं. बा. सरदार
६. मराठी वाङ्मयाचा परामर्श– गं. भा. निरंतर
७. संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति – गं. बा. सरदार
८. महानुभावीय मराठी गद्य– डॉ. य. खु. देशपांडे
९. मराठी साहित्याचे सिंहावलोकन. द. के. केळकर

[ऐतिहासिक घटनांचे कालनिर्देश रा. वि. ओतुरकरांचे ग्राह्य मानले आहेत. व ग्रंथलेखनाचे कालनिर्देश शं. गो. तुळपुळ्यांचे (म. सा. पुरवणी. आवृत्ति ५ वी) ग्राह्य मानले आहेत.]

अनुक्रमणिका

वाचकांचा पत्रव्यवहार --

ज्ञानेश्वरीतील एका शब्दकोड्याचा उलगडा

'ज्ञानेश्वरीतील एक शब्दकोडे' या शीर्षकाखाली एक परिशीलनात्मक लेख प्रा. म. वा. धोंड यांनी 'सत्यकथा' मासिकात आगस्ट आणि सप्टेंबर १९६४ या दोन अंकातून लिहिला आहे. त्या लेखातील विचाराचे पृथक्करण करून प्रा. मंगरूळकर आणि श्रीयुत वि. मो कुलकर्णी यांनी आपलाही दृष्टिकोण मांडलेला आहे. त्याच हेतूने मीही "नाना वसोवा घातला चारू। माथां तुरंबिला बुरू। न करी प्रत्योपकारु। जेयापरी ॥ १७-२८० ॥ या विवाद्य ओवीचा किंचित् वेगळा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत आहे. 'एक तरी ओवी अनुभवण्याचे' हे विनम्र धाष्टर्य आहे.

'ऊर्णानैष बिभर्ति नैष विषयो दोहस्य वाहस्य वा' वगैरे पंक्तींचे एका संस्कृत सुभाषितात उंटाचे वर्णन आहे. हे सुभाषित वरील ओवी लिहिताना ज्ञानेश्वरांच्या डोळयापुढे असणे असंभवनीय नाही. या सुभाषितातील अर्थध्वनि आणि बुरुणूस किंवा बुरणूस या शब्दार्थात प्रतीत होणारा निर्जीव लोकरीचा- केसांचा गुंताडा यांचा मेळ घातला तर ज्ञानेश्वरीच्या वरील ओवीचा अर्थ चांगला लागेल असे वाटते.

ओवीचा अर्थ अधिक सुगम होण्यासाठी एक धार्मिक रूढीही विचारात घेणे जरूर आहे. खंडोबाच्या मुरळया आणि यल्लमादेवीच्या जोगतिणी या आपल्या केसांच्या जटा वाढवतात. त्या चांगल्या लांबरुद आणि बुरुणुसासारख्याच असतात. किंबहुना आपल्या देवदासी-त्वाची ती एक निशाणीच आहे अशी त्यांची भावना असते. स्त्रियांप्रमाणे पुरुषही अशा केसाच्या जटा राखतात. असल्या बुरशा निर्जीव केसांच्या झुंबाड्याला अनुलक्षूनच ज्ञानेश्वरांनी वरील ओवीतील 'बुरु' असा शब्द वापरलेला असावा. स्वतःच्या स्वाभाविक केसाशी गंगावनाला कितीही तेलपाणी केले तरी ते चमक-दारपणे जमत नाही. त्यातील निस्तेज निर्जीवता उघडी पडते हा रोजच्या पाहण्यातला विषय आहे. तेव्हा नैसर्गिक काळयाभोर जिवंत केसाशी सर्वस्वी विसदृश असा घाणेरडा 'बुरू' डोक्यावर धारण केला तर तो डोक्याला शोभा आणणार नाही की मुखाचे सौंदर्य वाढवणार नाही, साहजिकच देवाला सोडलेल्या घुळी (पोळा) प्रमाणेच संन्यासी स्त्रीपुरुषांना प्रत्युपकारी कदापि होणारा नाही. देवाचा वसोवा ज्याप्रमाणे 'दोहस्य वाहस्य वा' कामी न येता खायला काळ असतो त्याप्रमाणे डोक्यावर घेतलेला हा निर्जीव केसाचा गुंताडा शिराला भार आणि शोभेला काळ होतो. हा 'बूरू' प्रत्योपकारू नव्हेच नव्हे. ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांनी शब्दाची ओढाताण करून जे निरनिराळे पाचचार अर्थ लावले आहेत त्यातच हाही एक अर्थ जमा झाला तरी या टिपणाचे सार्थक झाले.

याच ओवीच्या संदर्भात 'तुरंबणे आणि तुरुंबिणे' या शब्दाविषयी थोडे लिहिले तर अप्रासंगिक ठरणार नाही. 'तृप् (म्प्) या संस्कृत शब्दावरून या शब्दाची व्युत्पत्ति शोधण्यात आलेली आहे. परंतु ज्ञानेश्वरीत आलेल्या अनेक कानडी शब्दाप्रमाणेच हा शब्ददेखील मूळ 'तुरुबु किंवा तुरुंबु' या कन्नड शब्दावरूनच मराठीत आलेला असावा. केटलच्या कन्नड-इंग्रजी कोशात याचा अर्थ To insert, to tuck in to stick in as flowers in the hair असा दिलेला आहे. तेथे 'हुंगणे' अर्थाला जागा नाही आणि तो अर्थ ज्ञानेश्वरीतील कोणत्याही ओवीत अनिर्वाह्य आहे असे दिसत नाही.

वास्तविक मराठीतील 'तुरंबिणे किंवा तुरुंबिणे' हे दोन्ही शब्द वरील कन्नडभाषीय शब्दावरून साधले आहेत-घेतले आहेत असे दिसते. परंतु प्रा. मंगरूळकर यानी बारकाईने पाहून त्याचा वेगळा अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि 'तुरुंबिणे' या शब्दाच्या खजिन्यात 'हुंगणे' हा अर्थ टाकून वाटणी केली आहे. ते म्हणतात "परिमले काइ तुरुंबावे ९·११ येथे तुरुंबावे = हुंगावे हाच अर्थ घेतला पाहिजे, हे परिमले या पदाने सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे." असे मुळीच नाही. परिमळाने वास घेता येईल असे काय धारण करावे? असा अर्थ करण्यात 'विरोध चमत्कृति आणि तज्जन्य असंभाव्यता' याना धक्का पोचण्याचे कारण नाही आणि ओवीच्या पुढील भागाशीही तो अर्थ सुसंगत ठरणारा वाटतो. त्याचप्रमाणे ओ. ९·३८० मध्येही दिसेल. भक्ती म्हणून एखादे

फूल मला हरिजनाने वाहिले तर मी ते माझ्या कंठी अथवा शिरी धारण करावे की नाही ? पण त्याच्या भक्तीने भान हरपून मी ते फूल तोंडातच घातले. या कृतीत फुलाचा गोड वास, मधुरसपूर्ण मार्दव आणि रंगदार माधुर्य ही अधिक उत्कटत्वाने प्रतीत होतात हे बाजूला ठेवले तरी भक्तीचा अतःकरणाशी संबंध असल्यामुळे फूल मुखात घालणे अधिक जवळिकेचे वाटणार नाही का ? हुंगण्यासाठी हातात घेतलेले फूल (पुढे ते निर्माल्य ठरते या भावनेकडे लक्ष देता) तितका दूरीभावच व्यक्त करीत नाही काय ? तसले आस्वादनही कमी प्रतीचेच ठरणारे नाही काय ? ओवी १०·१८६ मध्ये तर चंदन तरूची फुले धारण केली म्हणण्याने 'हुंगण्याचा' संबंधसुद्धा येत नाही. नादाला स्वरूप प्राप्त होण्यात जी विरोधचमत्कृति आहे ती चंदन फुलण्यात आणि त्या चंदन– फुलांचा वापर करण्यातही निःसंशय आहे. आणि अर्थदृष्ट्या ओवी १५.५५ 'हुंगणे' याच अर्थाला वाचकाला खिळवून ठेवील अशी शक्ति तीत नाही. कारण भूक निवारण्या-साठी काही खावे म्हटले तर ज्याला फळ नाही. निदान फूलमाळ करून प्रसन्नमन व्हावे म्हटले तर ज्याला फूल नाही असा हा ऊर्ध्वमूलमधःशाख अश्वत्थ 'नुसता नावाचा वृक्ष आहे' असा 'संदर्भोपयुक्त' अर्थ सहज ओघाने येणारा आहे.

तात्पर्य 'धारण करणे, खोवणे, माळणे' हा कन्नड तुरुंबु' शब्दाचा अर्थच ज्ञानेश्वरीतील 'तुरंबणे किंवा तुरुंबिणे' या शब्दांनी सर्वत्र प्रतिबिंबित झाला आहे, हे उघड आहे.

– कृ. बा. मराठे

सारसंकलन

केनियातील आमचा माणूस– जामो केनियाटा

'बुड्ढ्या केनियाटाला मुक्त केल्यास मला केनिया सोडून जावे लागेल' असे उद्‌गार १९६० साली केनियातील एका गोऱ्या शेतकऱ्याने काढले होते. परंतु १९६५ साली हाच शेतकरी म्हणतो की, 'केनियाटा गेल्यास मी पण जाईन.' दुष्ट नजरेच्या या माऊमाऊंच्या पुढाऱ्यात काही बदल झाला की, त्याचेकडे पहाणारांचा दृष्टिकोण बदलला ? केनियाचा अध्यक्ष, पिताश्री जामो केनियाटा हा केनियाच्या स्वातंत्र्य-संग्रामात सर्वांचे आशास्थान बनला आहे. २९ एप्रिल रोजी या पिताश्रींनी रशियाकडून मिळत असलेली जहाजभर शस्त्रे, ती केनियाच्या आधुनिक लष्कराच्या मानाने जुनाट आहेत असे सांगून नाकारली. यामुळे वॉशिंग्टनमधील केनियाटाचा भाव भलताच वाढला !

माऊमाऊ चळवळीचे दिवसातही केनियाटा हा राष्ट्रवादी नेता होता व आजही तो तसाच आहे. त्याचे ध्येय बदललेले नाही. शासनातील वरिष्ठ जागा लवकरात लवकर आफ्रिकी लोकांना कशा मिळवून देता येतील हा त्याचे पुढील प्रश्न आहे. कारण त्या-शिवाय केनियाला खरेखुरे स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येणार नाही. बहुतेक सर्व आफ्रिकी नेते पूर्वेकडे आकृष्ट झालेले दिसत आहेत. पौर्वात्यांनी देऊ केलेली कोणतीही गोष्ट ते चटकन् स्वीकारतात. केनियाटासुद्धा फार दिवस याला अपवाद ठरेल असे वाटत नाही. आफ्रिकी नेत्यातील जास्त समजुतदार व सुसंस्कृत त्यांना मात्र एका वसाहतवादाची जागा दुसऱ्याने घ्यावी ही गोष्ट पसंत नाही.

केनियाचा उपाध्यक्ष ओगिंगा ओडिंगा याचा कल कम्युनिझमकडे आहे हे उघड आहे. कम्युनिस्टांची मदत घेण्यास तो उत्सुक आहे. अठरामहिन्यापूर्वी ब्रिटिश वसाहत असलेल्या राष्ट्राने समतोलता राखण्या-साठीतरी पौर्वात्यांकडे झुकले पाहिजे, म्हणजेच तटस्थ-तेचे धोरण अमलात येईल असे त्याचे म्हणणे आहे. आणि ओडिंगा हा माणूस साधासुधा नसून चांगला कणखर आहे. त्याचे केनियाटाशी भांडण पूर्व-पश्चिम वादावर नसून वैयक्तिक व टोळीवादी आहे आणि म्हणूनच तो जास्त धोकेबाज माणूस आहे.

कम्युनिझमचा प्रभाव

कम्युनिझमला खरा पाठिंबा सुशिक्षित बेकारांचा आहे. आफ्रिकेतील तरुणपिढी रशिया व चीन यांचे वर्चस्वाखाली येत आहे असे दिसते. अनेक आफ्रिकी-राष्ट्रीय पुढाऱ्यांना क्रान्तीपासून आपला बचाव करण्या-करता या गटापुढे मान तुकवावी लागत आहे. घानाचे डॉ. अंक्रुमा याच गटाच्या कारवायांना बळी पडले. केनियाटा अजूनतरी या दबावास बळी पडलेले नाहीत व त्यातच त्याचे मोठेपण आहे.

या धोरणाचा मोबदलाही त्यांना मिळाला आहे. अर्थमंत्री श्री. जेम्स गिचुरु मार्चमहिन्याचे शेवटी आपला युरोपचा दौरा संपवून परत आले. अनेक युरोपिअन राष्ट्रे व अमेरिका यांनी त्यांना भरपूर मदत देण्याचे कबूल केले आहे. ४१० लक्ष पौंडाच्या मदतीची आश्वासने त्याना मिळाली आहेत. स्वतःच्या वसाहतीखेरीज दुसऱ्या आफ्रिकी राष्ट्रांची दखल न घेणाऱ्या फ्रान्सनेसुद्धा आर्थिक मदतीसंबंधी विचार करण्याचे कबूल केले आहे. केनियात असलेल्या राजकीय स्थैर्याचा हा परिणाम आहे असे वाटते. कदाचित् खरे कारण राजकीय अस्वास्थ्याचे वातावरण संपूर्ण नाहीसें न करता काबूत मात्र ठेवण्यात येत आहे व पाश्चात्त्य राष्ट्रास स्फोटाची भीती वाटत आहे हेही असण्याची शक्यता आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांचा सध्याचे राज्यकर्त्यावर विश्वास बसावा असे प्रकार गेल्या महिन्यात मुद्दाम घडवून आणण्यात आले हे सर्वास माहीत आहे.

रशियातील बाकू विद्यापीठातून ५ एप्रिल रोजी २९ विद्यार्थी परत आले. त्यांच्या अनुभवाचा उपयोग, प्रचारकार्यास भरपूर होत आहे. अतोनात थंडी भूकमार, वंशभेद व खालावलेला शैक्षणिक दर्जा या सर्वांचा या विद्यार्थ्यांना अनुभव कम्युनिझमविरुद्ध वापरता येत आहे. उपअर्थमंत्री टॉम ओकिलो आडिंगो यांचे 'केनियाने पौर्वात्त्य राष्ट्राकडे जास्त झुकावे' या

म्हणण्यावर नियोजनमंत्री टॉम म्बोया यांनी उघड उघड व कडाडून हल्ला चढविला. तर केनियाटा यांनी माऊ-माऊ चळवळीतील आपले एक सहकारी बिल्दाद कागिआ यांना आळशीपणाबद्दल त्यांचेच प्रदेशात जाऊन बडतर्फ केले. घाना, इजिप्त व अल्जेरिया यांचे धोरण केनियाला पसंत नसून आपण त्याचा अवलंब करणार नाही असेही टॉम म्बोया यांनी घोषित केले. या सर्वांवर कळस म्हणून अध्यक्ष केनियाटा यांनी रशियन शस्त्रे व तंत्रज्ञ यांना परत पाठवून दिले.

लोकशाही आफ्रिकी समाजवाद

त्याच आठवड्यात 'लोकशाही आफ्रिकी समाजवादा' वर केनिया सरकारने एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून नव्याने स्वतंत्र झालेल्या आफ्रिकी राष्ट्रांच्या दृष्टीने समाजवाद कसा उपयुक्त आहे ते स्पष्ट केले आहे. याच तत्त्वानुसार तीन ब्रिटीश कंपन्यांचे (वीज निर्माण करणारी, रस्ते बांधणारी व वहातूक चालवणारी आणि सोडा बनवणारी) राष्ट्रीयीकरण होणे शक्य आहे. करवाढ व तीही मुख्यत्वेकरून देश सोडून जाणाऱ्या नागरिकांसाठी करण्यात येईल. राष्ट्रीयीकरण केल्या जाणाऱ्या उद्योगधंद्यास मोबदला देण्यात येईल व जेव्हा त्याची खास गरज असेल तेव्हांच राष्ट्रीयीकरण करण्यात येईल. सरकारी प्रयत्नाने बांधकाम खाते व प्रवासी खाते सुरू करण्यात येणार आहे.

खाजगी किंवा सामाजिक मालकीचा दुरुपयोग कसा होऊ शकतो याबर श्वेतपत्रिकेत भाष्य केले आहे. राष्ट्रीयीकरणाने उत्पन्न हमखास वाढेल असेही सांगता येत नाही. या मुद्याचे सविस्तर विवेचन श्वेतपत्रिकेत केले आहे. सर्व खाजगी कंपन्यांचे सहकार्याने नोकऱ्यांचे आफ्रिकीकरण करण्यात येईल. परदेशी लॉटऱ्या बंद करण्यात येतील. नायरोबीतील लुमुंबु संस्थेचे पार्लमेंटच्या कायद्याने राष्ट्रीयीकरण करण्यात येणार आहे (रशियाला मोबदला मिळणार काय?) ही संस्था नवा आफ्रिकी समाजवाद स्वीकारणार नाही. त्यातील विद्यार्थ्यांनी पार्लमेंटचा निषेध करण्यास सुरवात केली आहे. अशा तऱ्हेच्या अनेक प्रकारांना केनियाटा याना तोंड द्यावे लागणार आहे. त्यात त्याना यश मिळेल. काही-वेळा अपयशही पदरी पडेल. परंतु केनियाटा आपला माणूस आहे असा भ्रम आपण ठेवता कामा नये. केनियाटा आपला नाही, कोणाचाही नाही, तो केनियाचाच आहे.

– दि इकॉनॉमिस्ट, लंडन, ८ मे १९६५

जपान व चीन डावा उजवा हात

पेकिंगशी व्यापार करणे जपानी सरकारच्या दृष्टीने गुंतागुंतीचे झाले आहे. दोन्ही देशातील व्यापार जवळ जवळ ११०० लक्ष पौंडांचा आहे. परंतु या व्यापारास जपानने अधिकृत कर्ज देण्याचे नाकारल्यामुळे भांडण होण्याची वेळ आली आहे. अमेरिका व फोर्मोसा यांचे दबावामुळे आपल्या आयात-निर्यात बँकेतून कर्ज देणे जपानी सरकारने नाकारले आहे. आयकेडा मंत्रीमंडळाने फोर्मोसाला, कम्युनिस्टांना मदत देणार नाही असे लेखी आश्वासन १९६४ सालीच दिले होते. त्यावेळी पेकिंगपेक्षा फोर्मोसाशी होणारा व्यापार जास्त महत्त्वाचा होता.

नवे पंतप्रधान साटो हे आयकेडाच्या पत्राने बांधले गेले आहेत. जानेवारी महिन्यात एका मोठ्या रासायनिक कारखान्यास लागणारे सर्व सामान पाठवण्याचे कबूल करून त्यासाठी लागणारे कर्ज मात्र खाजगी स्वरूपाचे असेल असे त्यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे हिताची कंपनीस मिळालेल्या मालवाहू जहाजाकरता लागणारे कर्ज देण्यास पण त्यांनी नकार दिला.

चीन व जपान यांचेतील स्वाभाविक व्यापारात अडथळा निर्माण करण्याचा जपानी सरकारवर आरोप करून पेकिंगने १८ लक्ष पौंडाची आपली एक मागणी रद्द करून टाकली. मालवाहू जहाज बांधण्याचे कंत्राट पण रद्द करण्यात आले. रासायनिक कारखान्याबाबत पण तेच धोरण पुढे चालवून चीनने मेच्या सुमारास ती मागणीपण रद्द केली. फोर्मोसा व अमेरिका यांचे नादी लागल्याबद्दल पीपल्स डेली या पत्राने संपादकीय लिहून जपानला भरपूर शिव्या देऊन घेतल्या.

या सर्वांचा परिणाम जपानी व्यापारीमंडळीवर व निर्यातव्यापार-मंत्रीमंडळावर झाल्याखेरीज राहिला नाही. चीनचा सर्व व्यापार युरोपिअन राष्ट्रे काबीज करतील अशी जपानला भीती वाटत आहे. चीनला लागणारी सर्व जहाजबांधणी आपण करू शकू, अनेक प्रकारची निरनिराळी कमित कमी चाळीस कंत्राटे पण मिळवू शकू असे निर्यातव्यापार मंत्रीमंडळास वाटत आहे.

चीनच्या बाबतीत राजकारण व व्यापार यांची गल्लत न करण्याचे आपले धोरण सोडून दिल्यामुळे साटो हे अडचणीत सापडले आहेत. बांडुंग परिषदेच्या दहाव्या वाढदिवसाचे वेळी जपानी राज्यकर्त्या पक्षाचे उपाध्यक्ष काशिआमा यांनी चाऊ-एन-लाय यांची भेट घेतली. लहान सहान बातम्यांनासुद्धा प्रसिद्धी देण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या न्यु चायना न्यूज एजन्सीने या गोष्टीची दखलसुद्धा घेतली नाही. या भेटीतून विशेष काही निष्पन्न झालेले दिसत नाही. जूनमध्ये होणाऱ्या अल्जेर्स-मधील आफ्रो-आशिआयी परिषदेच्या वेळी मतांची देवाण घेवाण करण्याचे ठरले.

जपानी सरकारचे या बाबतीतील स्वातंत्र्य मर्यादित आहे. फोर्मोसाच्या बाजूच्या मंडळीस जपानने आशियातील कम्युनिस्ट विरोधी आघाडीत सामील व्हावे असे वाटते. तर व्यापारासाठी आसुसलेल्या, व समाजवादी व साम्यवादी मंडळींना त्याचप्रमाणे साटो यांच्या विरोधी पक्षाचे नेते साको गाकी यांना पेकिंग राजवटीस ताबडतोब मान्यता द्यावी असे वाटते. आणि लोकमत त्यांचेच बाजूस जाईल असे वाटते. परंतु परराष्ट्र धोरण व व्यापार यात असलेले अमेरिकन वर्चस्व ही गोष्ट करू देणार नाही.

अधिकारारूढ झाल्यानंतर साटो यांचेवर पेकिंगने अनेक हल्ले चढविले. वाशिंग्टन भेट, दक्षिण कोरियाशी वाटाघाटी, व्यापारातील अडथळे व अनेक चिनी शिष्ट मंडळांना नाकारलेले प्रवेश या सर्वांबद्दल त्यांना दोष लावण्यात आला. अल्जेर्स येथे होणाऱ्या बोलण्याचे यशापयश चीन राजकीय अभिमान व व्यापारी निकड यातील रेषा ओळखू शकते की नाही यावर अवलंबून आहे असे म्हणावे लागते.

– दि इकॉनॉमिस्ट, लंडन ८ मे १९६५.

ब्रिटनमधील लक्षावधी काळे :

' इंग्लिश माणूस हा अतिशय सहिष्णु आहे, असहिष्णुतेबद्दलसुद्धा तो सहिष्णु आहे ' असे एका समाजशास्त्रज्ञाचे मत आहे. परंतु त्यालाही मर्यादा आहेत असे दिसते. कारण गेल्याच आठवड्यात ब्रिटनमधील वाढत्या काळ्या लोकसंख्येबद्दल दरघडी दाखविण्यात येणाऱ्या असहिष्णुतेवर पार्लमेंटमध्ये टीका करण्यात आली. खानावळी, हॉटेल्स, पब्ज्, नाट्य वा सिनेमागृहे व सार्वजनिक जागा यांचेत प्रवेश करणाऱ्या माणसात रंग, वंश किंवा राष्ट्रीयत्व यासंबंधी भेदाभेद केल्यास (खाजगी रहाण्याच्या जागा व नोकऱ्या यांचा यात समावेश नाही) २८० डॉलर्स दंड करण्यात येईल व अशा भेदाभेदास भाषणाने किंवा लिखाणाने प्रोत्साहन दिल्यास २८०० डॉलर्स दंड किंवा दोन वर्षे कारावास किंवा दोन्हीही भोगावी लागतील असा कायदा २६१ विरुद्ध २४९ मतांनी पास करण्यात आला.

गृहखात्याचे चिटणीस फ्रँक सोस्कीस पार्लमेंटपुढे या कायद्याचा मसूदा ठेवताना म्हणाले की, " सर्वांना सारखी वागणूक व दुसऱ्याच्या हक्काविषयी व व्यक्तिमत्त्वाविषयी आदर ही आपली परंपरा आहे. ती सोडून पहिल्या प्रतीचे व दुसऱ्या प्रतीचे नागरिक असा फरक करणे आपल्याला शोभत नाही. " ब्रिटिश जास्तित जास्त वर्ग जाणीव असलेले लोक आहेत. परंतु सोस्कीस ब्रिटनमध्ये न जन्मलेल्या एका नव्याच अभागी वर्गाबद्दल बोलत होते. हा कायदा म्हणजे अमेरिकेप्रमाणे ब्रिटनमध्येही वांशिक प्रश्न कायम स्वरूपाचा निर्माण झाला आहे याची अप्रत्यक्ष कबुली आहे. हा प्रश्न पूर्वीच हाताळावयास पाहिजे होता. नव्या येणाऱ्या लोकांना आत्मसात करण्यासाठी मागेच यंत्रणा उभी करावयास पाहिजे होती. तसे न करता हा प्रश्न आमचे पुढे नाहीच अशी स्वप्नजगातील भूमिका आम्ही घेऊन बसलो ही चूक झाली असेही कित्येकांचे म्हणणे आहे.

ज्यावेळी मोजके भारतीय किंवा आफ्रिकी विद्यार्थी ऑक्सफोर्ड किंवा केंब्रिजला शिकण्याकरता येत किंवा थोडेफार व्यापारी चहा विकण्याकरता लंडनला येत तेव्हा ब्रिटिश साम्राज्याचे वैभव म्हणून त्यांचेकडे बोटे दाखविली जात. भारतीय किंवा जमेकन भाषा फक्त दूरवरच्या बंदरातून ऐकू येत असे. १९५० नंतर मात्र आशियातील अनेक देशातून, आफ्रिकेतून व वेस्ट इंडीजमधून लोकांचे थवेच्या थवे ब्रिटनमध्ये गर्दी करू लागले. सुरवातीस ब्रिटनमध्ये थोडीफार माया मजा करून कराचीला परत जाऊन एखादा उंट घेण्याची किंवा बारबाडोजमध्ये जाऊन एखादी मच्छीमारी बोट विकत घेण्याची या लोकांची मनीषा होती. परंतु आता हे लोक परत जातील असे मात्र वाटत नाही.

अनुक्रमणिका

ही गर्दी आता वाढू लागली आहे. कुटुंबेच्या कुटुंबे ब्रिटनमध्ये स्थिर होऊ लागली आहेत. १९६२ साली ब्रिटनमधील प्रवेशाबद्दलचा कायदा पार्लमेंटला करावा लागला. त्यानुसार नवागतांचे संख्येवर नियंत्रण घालण्यात आले. परंतु त्यामुळे गर्दी थांबली नाही. त्यातच या लोकांतील वाढत्या जन्मसंख्येमुळे ही लोकवस्ती भरमसाट वाढू लागली आहे. १९६२ नंतर ती दुप्पट झाली आहे. यांचेतील निम्मे म्हणजे जवळजवळ साडेचार लाख वेस्ट इंडीज असून राहिलेली निम्मी संख्या भारतीय, पाकिस्तानी व आफ्रिकन यांचेत सारखी विभागलेली आहे. या शतकाचे शेवटी ही लोकसंख्या ४० ते ५० लाखावर जाईल अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. काही वर्षांनी आम्ही चाकोलेट रंगाचे आफ्रोआशियायी वंशाचे राष्ट्र बनू असेही बोलण्यास अनेकांनी सुरवात केली आहे.

गौरेतर लोकांची ब्रिटनमधील संख्या लोकसंख्येच्या दोन टक्के आहे. म्हणजे अमेरिकेप्रमाणे ब्रिटिश समाज संमिश्र आहे असे म्हणता येणार नाही. परंतु आतापर्यंत हा समाज अठरापगड लोकांचे राष्ट्र नसून एकजिनसी होता. अमेरिकेतील भेदाभेद इथे दिसत नव्हते. व त्यामुळे ही दोन टक्के काळी जनता सुद्धा इथे चटकन उठून दिसते. गोऱ्या लोकांना नको असलेल्या निकृष्ट पगाराच्या व हलक्या प्रतीच्या नोकऱ्यातून यांचा भरणा होत आहे. मध्यरात्रीच्या कारखान्यातील पाळ्या, राष्ट्रीयीकरण झालेली वहातुक संघटणा व दवाखाने या ब्रिटनमधील सगळ्यात कमी पगाराच्या नोकऱ्या म्हणून गणल्या जातात. व त्यात काळ्या लोकांचाच मुख्यत्वेकरून भरणा होत असलेला दिसून येतो.

ब्रिटनमध्ये एकही काळा आदमी पार्लमेंटचा सभासद, पोलिस किंवा फायरमन नाही. बीबीसीने अलिकडेच बातमीदार म्हणून एका निग्रोची नियुक्ती केली आहे. परंतु ब्रिटिश हॉस्पिटल्समधून वॉर्डबॉईज किंवा तत्सम काम करणाऱ्यात ४० टक्के काळे आहेत. १७ टक्के नर्सेसच्या मदतनीस (आया) काळ्या आहेत तर लंडन व बर्मिंगहॅम शहरातील बसवहातूक व भूमिगत रेल्वे यांचे कर्मचाऱ्यात २० ते ४० टक्के काळे आदमी आहेत. वेस्ट इंडीजमधील काळे क्रिकेट ' हिरोज ' इंग्लिश लीग क्रिकेट खेळतात व इंग्लिश आई व जमेकन बाप असलेल्या २।३ मुली गायिका म्हणून आज लंडनमध्ये प्रसिद्ध आहेत.

परंतु काळ्या लोकांचे खरे प्रश्न रहात्या वस्त्यातून (Residential quarters) पुढे येतात. त्यांच्या मुलांना संमिश्र शाळातून प्रवेश मिळतो परंतु रहाण्याच्या जागेच्या बाबतीत मात्र त्यांचा नंबर शेवटी लागतो. खाजगी घरातून किंवा बोर्डिंग हाऊसेस मध्ये त्याना प्रवेश मिळत नाही व मिळाल्यास जवळजवळ १० टक्के भाडे जास्त द्यावे लागते. जुन्या मोडकळीस आलेल्या वस्तीतून हे लोक दाटीदाटीने एकत्र रहातात. लंडनमधील अस्सल इंग्लिश रस्त्यात साड्या दिसू लागल्या आहेत तर काही काही बारीक बारीक गल्ल्यातून मुसलमान खाटिकांची दुकाने, उर्दु चित्रपटगृहे, वेस्टइंडीज मच्छिबाजार व शीख देवळेही दिसू लागली आहेत.

गोरे नागरिक या काळ्या लोकांच्या घाणेरड्या सवयीबद्दल सारखे कुरकुरत असतात. दुधाच्या बाटल्या संडासात टमरेलासारख्या वापरून न धुता परत करणे, रस्त्यातून थुंकणे वगैरे प्रकार नेहमी होतात, इतरही अनेक गुन्ह्याबद्दलच्या तक्रारी येत असतात. पोलिसांनी लक्ष द्यावे असे गुन्हे मात्र या वस्त्यातून वाढलेले नाहीत असे पोलिसखात्याचे म्हणणे आहे.

१९५८ साली ब्रिटनमधील काळ्यांची संख्या दोन लक्ष होती. परंतु त्यावेळी बेकारी बरीच वाढलेली असल्यामुळे वांशिक दंगेधोपे काही ठिकाणी झाले. त्यानंतर उघडउघड दंगे मात्र पुन्हा झाले नसले तरी काळ्या वस्त्यांचे आसपास वातावरण नेहमीच तंग असते. दोन्ही राजकीय पक्ष आपल्या ९८ टक्के मतदारांना दुखवण्यास तयार नाही. १९६२ साली मजूरपक्षाने ब्रिटनमधील प्रवेशाबाबतच्या हुजूर पक्षाच्या बिलास कसून विरोध केला. परंतु स्वतः सत्तारूढ झाल्यावर मात्र त्या कायद्याची मुदत वाढवली. गेल्या आठवड्यात पार्लमेंटपुढे आलेल्या बिलास विरोध करण्यास हुजूरपक्ष तर टपूनच बसला होता. ब्रिटीश लोक नेतृत्व स्वीकारण्यास तयार असले तरी जबरदस्ती सहन करणार नाहीत असा इषारा मजूर पक्षाला मिळाला आहे तर वंशभेदाचा कायदा मोडणाऱ्याविरुद्ध क्रिमिनल कायदा न लावता सिव्हिल कायदा

करावा ही हुजूरपक्षाची सूचना विचारार्ह आहे असे सोस्कीस यांनी तावडतोब कबूल केले.

टाइम- न्यूयॉर्क– १४ मे १९६५

रशियाचे त्रासदायक नागरिक :

स्टालिनच्या कारकीर्दीत बंदिस्त केलेल्या अनेक राजबंद्यांची मुक्तता करताना रशियात रहाणे फक्त वेड्या लोकानाच आवडणार नाही अशी निकिता क्रुश्चेव्हने घोषणा केली. व त्यामुळे त्याचे कारकीर्दीत जे कोणी बुद्धिवादी, टीकाकार त्यांचेविरुद्ध बोलू किंवा लिहू लागले त्यांची उचलबांगडी तुरुंगात न करता वेड्यांच्या इस्पितळात झाली. अनेक लेखक, कलाकार, कम्युनिझमचे बुद्धिनिष्ठ टीकाकार यांची मॉस्कोच्या वेड्यांचे दवाखान्यात रवानगी करण्यात आली. पोलिसांची जागा सफेत कपड्यातील डॉक्टर्सनी घेतली.

या घटनेचा वृत्तांत ' वार्ड ७ ' या व्हॅलरी टार्सिस या रशियन लेखकाच्या कादंबरीत पहिल्याने वाचावयास मिळतो. हे लिखाण गेल्यावर्षी रशियातून गुप्तपणे लंडनला पाठविण्यात आले व तेथेच ते प्रसिद्ध झाले. ही कादंबरी म्हणजे कम्युनिझमवर कडाडून टीका आहे; व पन्नास वर्षांच्या कम्युनिस्ट राजवटीच्या व प्रचाराच्या तडाख्यातूनसुद्धा शिल्लक राहिलेल्या रशियन लोकांच्या स्वातंत्र्यप्रेमाचे द्योतक आहे.

एक पेशंट

टार्सिस यांची कादंबरी म्हणजे एक आत्मवृत्तकथन आहे. कारण या कादंबरीचा नायक व्हॅलेंटाइन अलमेझॉव्ह म्हणजेच स्वतः लेखक टार्सिस आहे अलमेझॉव्ह हा लेखक असून आपले लिखाण रशियाबाहेर गुप्त रीतीने पाठवण्याच्या वेडाबद्दल मॉस्कोतील एका वेड्यांच्या दवाखान्याच्या ७ नंबरच्या वॉर्ड मध्ये त्याला दाखल केलेले असते. क्रुश्चेव्हच्या रशियात बुद्धिमंताची होणारी कुचंबणा या विषयावर लिहिलेली ' ब्ल्यु बॉटल ' नावाची कादंबरी गुप्तपणे बाहेर पाठवल्याबद्दल टार्सिस हा स्वतः मॉस्कोच्या काश्चेंको वेड्याच्या दवाखान्यात सहा महिने राहून आला आहे. तेथून सुटल्यावर या ५९ वर्षे वयाच्या लेखकाने ' वॉर्ड नंबर ७ ' ही आपल्या अनुभवावर आधारलेली कादंबरी स्वतःच्या नावावरच प्रसिद्ध केली आहे.

सात नंबरच्या वॉर्डमध्ये एकंदर १५० पेशंट असतात. या सर्वात खराखुरा पेशंट एकच असतो. राहिलेले १४९ पेशंट तीन प्रकारचे होते. पहिल्या प्रकारात आत्महत्त्या करण्यात अयशस्वी झालेले लोक होते. कारण सोव्हिएट स्वर्गास कंटाळलेले लोक वेडेच असले पाहिजेत असे डॉक्टर्स, राजकारणी व विचारवन्तांचे मत आहे. दुसरा प्रकार अमेरिकन लोकांचा म्हणजे ज्या लोकांनी परदेशी वकीलातींशी संधान बांधण्याचा प्रयत्न करून रशियाबाहेर पडण्याचा प्रयत्न केला त्यांचा व तिसरा प्रकार म्हणजे ज्या तरुण लोकांना रशियन जीवन विशेष पसंत नसल्यामुळे समाजातील आपली जबाबदारी उचलण्यास असमर्थ ठरलेल्या मंडळींचा.

मोजमाप

या सर्व पेशंटना व डॉक्टर्सना वॉर्ड नंबर ७ मध्ये कोणी खरे पेशंटसही नाहीत व त्यांना डॉक्टर्सची जरूरीही नाही हे पूर्णपणे माहीत होते. परंतु त्रासदायक नागरिकांना सांभाळणारे तुरुंगाधिकारी म्हणजेच डॉक्टर्स होते. आपणा सर्वांना या कैदखान्यात ठेवण्याचे कारण ' आपण समाजवादाच्या चौकटीत बसत नाही; आपण गुलामी मनोवृत्तीचे नाही ' हे पण सर्वांना माहीत आहे.

चेकॉव्हच्या वॉर्डनंबर सहा या पुस्तकावरूनच टार्सिसला वॉर्डनंबर सात हे नाव सुचले. वॉर्ड नंबर सहा ही कादंबरी चेकॉव्हने रशियातील वेड्यांच्या दवाखान्यांची शोचनीय स्थिती चव्हाट्यावर मांडण्याकरता लिहिली. परंतु वार्ड नंबर ७ ची परिस्थिती बाहेरच्या परिस्थितीच्या मानाने कितीतरी सुखावह आहे असे अनेकांचे मत आहे. एक पेशंट अलमेझोव्हला म्हणतो " मी इथे अगदी सुखात आहे. मला खायला-प्यायला मिळते कपडेलत्ते मिळतात. इथे कोणीही कम्युनिझमचा प्रचार करीत नाही. इथे पाहिजे ते बोलता येते दुसरीकडे हे शक्य आहे का ? "

परंतु अलमेझॉव्हला ते आवडत नाही. तुरुंगवासाबद्दल अशी गुळमुळीत प्रतिक्रिया त्याला खपत नाही. त्याच्या अनेक इतर सहकाऱ्यांप्रमाणे त्याचेत स्वत्वाचा न आटणारा जिवंत झरा शिल्लक आहे. व त्यामुळेच

तो स्वतःला आपल्या देशाच्या अंधकारयुगातून मुक्त करण्याचे स्वप्न पहात असतो. स्वतंत्र जगातील मुसमुसणारे व दडपले न जाणारे स्वातंत्र्य त्याला पाहिजे असते. सौंदर्य तो व त्याचे मित्र स्वातंत्र्यानेच मोजू इच्छितात. तो म्हणतो 'व्यक्तिस्वातंत्र्य हे या पृथ्वीवरील वादातीत चांगली गोष्ट आहे. कम्युनिस्ट माणसाचे विरुद्ध समुदाय मानतात व्यक्तिविरुद्ध कळप मानतात. परंतु सर्व स्वतंत्र माणसाची व राष्ट्राची धडपड माणसाने पुन्हा कळपा कळपाने जगणाऱ्या वानर-योनीत जाऊ नये एवढ्या करताच आहे.''


परंतु अलमेझॉव्हला कम्युनिझम म्हणजे आपल्या आवडत्या जन्मभूमीला मिळालेला शाप वाटतो. "अशासारखे जगात दुसरे काहीही अस्तित्वात आले नाही. मला ते विसरून जावेसे वाटते. कारण त्यामुळे माझ्या जन्मदात्या भूमीचा मी द्वेष करू लागेन अशी मला भीती वाटते. माझ्या मायभूमीला मी शिव्या देईन असे वाटते.'' पण त्याचा आशावादही फार दांडगा आहे. आपले दुःख आवरून तो म्हणतो: "मला खात्री आहे की शेवटी माणसाचा विजय होईल, वानराचा नाही. नव्या शतकात प्रवेश करणारा रशिया व स्वातंत्र्य नव्या जोमाने प्रेरित झालेला असेल व कम्युनिझम म्हणजे आमच्या नातवंडाना दाखवले जाणारे बुजगावणे असेल अशी मला खात्री आहे.'' टार्सिस दुसऱ्या एका पात्राकरवी घोषित करतो की आमची संख्या वाढत आहे. "आम्ही आज हजार असलो तरी उद्या दहा लाख बनू. आम्ही आमची जाहिरात करीत नाही पण आमचे अस्तित्व आहे व त्याची आम्हाला जाणीवही आहे. आम्ही एकत्रित येऊन एवढी मोठी आग पेटवून देऊ की जगातील कोठलाही पोलिस ती विझवू शकणार नाही.''

हे सर्व स्वतःचे नावावर प्रसिद्ध करण्यातील टार्सिसचे धैर्य तर मोठेच परंतु विशेष म्हणजे स्वतःच्या बायकोला व मुलीला घेऊन आज तो मॉस्कोत रहात आहे व आपले लेखन चालू ठेवीत आहे हे होय. क्रुश्चेव्ह नंतरचे नेते लेखक व कलाकार याना जास्त चांगली वागणूक देत आहेत यांचे आणखी एक प्रत्यन्तर म्हणजे इव्हिग्ने इन्थ्युशेन्को या कवीला इटलीमध्ये जाऊन एक महिना काव्यवाचन करण्याची परवानगी मिळाली आहे व त्याप्रमाणे तो गेलाही आहे हे होय. १९६३ नंतर त्याला पुन्हा जावयास मिळाले आहे हेही विशेष होय.

—टाईम, न्युयॉर्क २१ मे १९६५


अनुक्रमणिका

महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांत विजेमुळे समृद्धीचा मार्ग खुला



विजेमुळें जीवनांत अनेक सुखसोयी उपलब्ध होतात. आतापर्यन्त फक्त शहरांतूनच असणाऱ्या अशा बऱ्याच सुखसोयी आज महाराष्ट्रांतील अनेक गांवांना मिळाल्या आहेत. विजेमुळें शेतमालाच्या उत्पादनांतहि वाढ करता येते, व ल्हान उद्योगांचा विकास करता येतो. तेव्हां ग्रामीण विभागांत वीज गेल्यानें समतोल अशी ग्रामीण अर्थरचना निर्माण करण्यास मदत होते.

महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात वीजपुरवठा करण्याच्या कामाची झालेली प्रगती उत्साहवर्धक आहे. पहिल्या महाराष्ट्र दिनी ५३२ गांवांना वीजपुरवठा करण्यात आला होता, तर ३१ डिसेंबर १९६४ रोजी या गांवांची संख्या २,६८७ इतकी वाढली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस आणखी ५८५ गांवांना वीजपुरवठा करण्यात यावयाचा आहे आणि अशा प्रकारे महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनांत क्रांती घडवून आणण्याचे काम चालू राहणार आहे.



प्रसिद्धी संचालक
महाराष्ट्र शासन
मुंबई

अनुक्रमणिका